वर्ष: 6 अंक: 23

1-15 जून, 2026 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार

12 वर्ष



आम्हाला फॉलो करा @NISPIBIndia

# विकासाचा दृष्टिकोन देशाचे ध्येय

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचा 12 वर्षांचा कार्यकाळ सेवा, सुशासन आणि विकासाचे नवे आयाम प्रस्थापित करणारा राहिला आहे. या काळात देशाने आत्मनिर्भरता, डिजिटल क्रांती, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि जागतिक मंचावर मजबूत ओळख निर्माण केली आहे...

ई-कॉपीसाठी क्यूआर स्कॅन करा.

जागतिक पर्यावरण दिन : 5 जून

# भारताच्या संस्कृतीत परंपराही आणि प्रगतीही

भारताच्या हजारो वर्षे जुन्या संस्कृतीत निसर्गाबरोबर प्रगती देखील दिसते. आपल्या पूर्वजांची इच्छा होती -"पृथ्वीः पूः च उर्वी भव" म्हणजेच, संपूर्ण पृथ्वी, संपूर्ण ब्रह्मांड आपणा सर्वांसाठी उत्तम राहो. हवामान बदलाच्या धोक्याचा सामना करण्यासाठी आज जे जागतिक प्रयत्न सुरु आहेत, त्यात भारत आशेचा एक किरण बनून उदयास आला आहे. हवामान बदल आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी राष्ट्र आणि नागरिक यांच्या संघटित प्रयत्नांतूनच आपण भावी पिढ्यांना सुरक्षित पर्यावरण देऊ शकू...

> *विकास आणि पर्यावरण यांमधील समतोल हा आपल्या प्राचीन परंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्याला आपण आत्मनिर्भर भारताची ताकद बनवत आहोत . जीव आणि निसर्ग यांच्यातील संबंधांचा समतोल, व्यष्टी आणि समष्टी यांचा समतोल, जीव आणि शिव यांचा समतोल हे आपल्या धर्मग्रंथांनी आपल्याला शिकवले आहे. आपण आपल्यासाठी जे काही करतो, त्याचा थेट परिणाम आपल्या पर्यावरणावरही होतो. म्हणूनच आपल्या संसाधनांच्या कार्यक्षमतेच्या बाबतीत भारत अधिकाधिक प्रयत्न करत आहे.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



न्यू इंडिया
समाचार
वर्ष: 6, अंक: 23 | 1-15 जून, 2026

प्रधान संपादक
धीरेंद्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय , नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादक
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
अभय गुप्ता
सत्यम सिंह



13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी येथे क्लिक करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचार बद्दल नियमित अपडेटसाठी फॉलो करा:-@NISPIBIndia

# आतील पानांवर..




12 वर्षांची संकल्प यात्रा

## विकसित भारताच्या प्रवासाचे एक नवयुग

लोकशाही प्रक्रियेत 2014 ते 2026 एका अशा युगाचा पर्याय बनले आहे, ज्याने संकल्प सिद्धीचा एक नवीन अध्याय लिहिला आहे. क्रांतीकारी परिवर्तनाचा तो साक्षीदार बनला आहे आणि आज देशातील प्रत्येक व्यक्ती या परिवर्तनांमध्ये स्वतः सहभागी झाल्याचे अनुभवत आहे...... | 8-68

व्यक्तिमत्व: दामोदर मेनन
ज्यांनी पत्रकारितेला शस्त्र बनवून लढली स्वातंत्र्याची लढाई | 4

खरीप पिकांच्या एमएसपी आणि दोन सेमीकंडक्टर प्रकल्पाना मंजुरी
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले अनेक महत्त्वाचे निर्णय | 5-7

बंगळूरूने अध्यात्म आणि आध्यात्मिक चेतनेला नव्या उंचीवर नेले
'द आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या स्थापना सोहळ्यात सहभागी झाले पंतप्रधान मोदी | 69

सोमनाथ मंदिराच्या पुनर्स्थापनेची 75 वर्षे

### सोमनाथ अमृत महोत्सव
भारताच्या अविचल भावनेचा उत्सव



गुजरात दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी यांनी वडोदरा येथील सरदारधाम वसतिगृहाचे केले उद्घाटन... | 72-74

### आधुनिक पायाभूत सुविधांची निर्मिती करत आहे भारत



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 10 मे रोजी तेलंगणाच्या हैदराबाद येथे सुमारे 9,400 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची केली पायाभरणी आणि उद्घाटन | 70-71

प्रकाशक : कंचन प्रसाद, महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो) पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता : खोली क्रमांक -1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. ईमेल - response-nis@pib.gov.in, आर. एन. आय. क्रमांक DELHIN/2020/78812

# संपादकांच्या लेखणीतून...

# सर्वांगीण- सर्वसमावेशक-सर्वस्पर्शी

# जनसेवा, जनविश्वास ,जनकल्याणाची 12 वर्षे

*सप्रेम नमस्कार ,*

*26 मे 2014 ची ती संध्याकाळ भारतीय लोकशाहीच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरली गेली, जेव्हा राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 9 जून 2024 रोजी शपथ घेतली होती. त्यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारची 12 वर्षे पूर्ण होत आहेत. हा केवळ एक राजकीय प्रवास नाही, तर नव्या भारताच्या निर्मितीचे एक व्यापक अभियान आहे. या वर्षांमध्ये शासनाच्या केंद्रस्थानी नेहमीच देशाचा नागरिक राहिला आणि गरीब, युवक, अन्नदाता आणि महिला शक्तीला विकासाची सर्वात मोठी शक्ती मानण्यात आले.*

योजना केवळ घोषणांपुरत्या मर्यादित न राहता, त्यांचे लाभ शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचतील हे सरकारने सुनिश्चित केले. 'विकसित भारत संकल्प यात्रा' हे देखील याचे एक उत्तम उदाहरण आहे.

सांस्कृतिक आणि आध्यात्मिक दृष्ट्या देखील हा कालखंड ऐतिहासिक राहिला. भारताच्या प्राचीन योग परंपरेला आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून मिळाली , जिचा आज संपूर्ण जगाने स्वीकार केला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रात सरकारने अनेक धाडसी निर्णय घेतले आहेत.

रोजगार आणि उद्यमशीलता क्षेत्रातही भारताने एक नवी ओळख निर्माण केली आहे. देशातील तरुण आता केवळ नोकरी शोधणारे नाहीत, तर ते नोकरी देणारे बनत आहेत. आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था आहे आणि मोबाईल उत्पादन करणारा जगातील दुसरा सर्वात मोठा देश बनला आहे. डिजिटल इंडियाने शासन कारभार पारदर्शक आणि सुलभ बनवला आहे. आज भारत जगात सर्वात वेगवान वास्तविक वेळेत डिजिटल पेमेंट करणारा देश बनला आहे. त्याचबरोबर, भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अनेक देशांचे सर्वोच्च नागरी सन्मान मिळाले आहेत, जे जागतिक स्तरावर भारताच्या वाढत्या प्रतिष्ठेचे प्रतीक आहेत.

या 12 वर्षांमध्ये, सरकारने केवळ पूर्वीच्या उणिवा दूर केल्या नाहीत, तर वर्तमानाला मजबूत करत देशासमोर 'विकसित भारत @2047' चे स्पष्ट ध्येय देखील ठेवले आहे. अशाप्रकारे, नागरिक देवो भवः या भावनेने केंद्र सरकार निरंतर 'जनसेवा, जनविश्वास आणि जनकल्याण'च्या मार्गावर वाटचाल करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा हा 12 वर्षांचा प्रवास यावेळची आपली मुखपृष्ठ कथा बनला आहे.

याशिवाय व्यक्तिमत्व या मालिकेत पत्रकारितेला शस्त्र बनवून स्वातंत्र्याची लढाई लढणारे दामोदर मेनन, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मागील पंधरा दिवसांमधील कार्यक्रम यात समाविष्ट केले आहेत. त्याचबरोबर, पाक्षिकाच्या आतल्या पानावर 5 जून रोजी साजरा केला जाणारा पर्यावरण दिन आणि मलपृष्ठावर राष्ट्रहितासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली 7 आवाहने यावर विशेष माहिती समाविष्ट आहे.

तुम्ही तुमच्या सूचना आम्हाला पाठवत रहा.

(धीरेंद्र ओझा)

**हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचा/डाउनलोड करा.**

**https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx**

# वाचकांच्या प्रतिक्रिया...




## पाक्षिकातून मिळते व्यापक माहिती

'न्यू इंडिया समाचार ' पाक्षिकाच्या 16-30 एप्रिल 2026 च्या अंकात 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन' वाचले आणि प्रेरित झालो. कारण पंतप्रधानांनी देशवासियांचे आरोग्य, समृद्धी आणि विकासासाठी प्रत्येक क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले आहे आणि यथोचित सल्ल्याद्वारे आपल्याला मार्गदर्शन देखील केले आहे. ही अतिशय महत्वाची बाब आहे. 'संपादकांच्या लेखणीतून' अंतर्गत 'भारतातून लाल दहशतवादाचा बीमोड ' बद्दल सविस्तर माहिती मिळाली जे मोदी सरकारचे खूप मोठे यश आहे. स्वातंत्र्यानंतर, सततच्या नक्षली हल्ल्यांमुळे आदिवासी भागाचा विकास थांबला होता आणि जीवित तसेच वित्त हानीबरोबरच मोठ्या संख्येने आपले  जवान मृत्युमुखी पडले. मोदी सरकारने योग्य निर्णय घेऊन मोहीम राबवली आणि भारताला नक्षलमुक्त बनवण्यात यश संपादन केले. म्हणूनच देशवासियांमध्ये मोदी सरकारची धोरणे आणि निर्णयाबाबत विश्वास वाढला आहे.

**बिर्ख खडका डुवर्सेली**

**birkhakd@gmail.com**

## आर्थिक धोरणांबाबत व्यापक विवेचन  अत्यंत माहितीपूर्ण

मी' न्यू इंडिया समाचार ' ची प्रशंसा करण्यासाठी हे पत्र लिहीत आहे. कार्यरत सनदी लेखापाल म्हणून मला या पत्रिकेत राष्ट्रीय विकास, सरकारी योजना आणि आर्थिक धोरणाबाबतचे  व्यापक विवेचन अत्यंत माहितीपूर्ण आणि माझ्या व्यावसायिक क्षेत्रासाठी अतिशय प्रासंगिक वाटतं. व्यावसायिक समुदायाला विस्तृत माहिती देण्याच्या  तुमच्या प्रयत्नांबद्दल धन्यवाद.

**धर्मेश बेलडिया**

**dbeladiya32@gmail.com**

## लोकांसाठी माहितीचे एक महत्वपूर्ण साधन

मी 'न्यू इंडिया समाचार'च्या माध्यमातून केल्या जात असलेल्या उत्तम कामासाठी तुम्हाला आणि तुमच्या संपूर्ण टीमला मनापासून धन्यवाद देऊ इच्छितो. हे खरोखरच एक सुंदर बातमीपत्र आहे, जे सर्व भारतीय भाषांमध्ये विशेषतः तमिळमध्ये उपलब्ध असल्यामुळे अधिकच खास झाले आहे. यामुळे देशभरातील लोक आपल्या सरकारचे आवश्यक उपक्रम, उपलब्धी आणि दृष्टिकोन सहजपणे समजून घेऊ शकतात आणि त्याच्याशी जोडले जाऊ शकतात. मी विशेषतः या गोष्टीसाठी प्रशंसा करतो की आपले पंतप्रधान आणि सरकारच्या विविध कार्यक्रमांशी संबंधित सर्व आवश्यक माहिती न्यू इंडिया समाचारच्या माध्यमातून एकाच मंचावर आणली जाते. हे लोकांसाठी माहितीचे  एक महत्त्वपूर्ण साधन बनत आहे. देशाला खऱ्या आणि प्रेरणा देणाऱ्या बातम्या देण्याप्रति तुमची समर्पित भावना आणि बांधीलकी अतिशय प्रशंसनीय आहे. मी तुम्हाला आणि तुमच्या संपूर्ण टीमला आगामी काळात सातत्यपूर्ण यशासाठी शुभेच्छा देतो.

**एस. राजेशकन्ना**

**kisanmorcha.gs@gmail.com**

## सरकारी धोरणे आणि उपक्रमांबाबत मिळते माहिती

मी 'न्यू इंडिया समाचार' पाक्षिक नियमितपणे वाचते. सरकारी धोरणे आणि उपक्रमांबाबत माहिती जाणून घेण्यासाठी मला हे पाक्षिक वाचण्यात अतिशय रस आहे. मी ही वाचलेली माहिती माझ्या आसपासच्या सर्व लोकांबरोबर सामायिक करत असते.

**पारुल शर्मा**

**ps308616@gmail.com**

## उत्तम पाक्षिक आहे 'न्यू इंडिया समाचार '

'न्यू इंडिया समाचार' उत्तम पाक्षिक आहे. आपण विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करत आहोत. ही प्रत्येक भारतवासियांसाठी गौरवाची बाब आहे.

**ओम लता अखौरी**

**omlata.akhouri@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता: खोली क्रमांक 1077,सूचना भवन, सीजीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003

**ईमेल- response-nis@pib.gov.in**



# ज्यांनी पत्रकारितेला शस्त्र बनवून लढली स्वातंत्र्याची लढाई

*जन्म : 10 जून 1906,मृत्यू : 1 नोव्हेंबर 1980*

*भारतातील प्रसिद्ध पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसेवक के. ए . दामोदर मेनन यांनी देशाच्या स्वातंत्र्यादरम्यान केवळ सक्रिय भूमिका बजावली नाही तर ब्रिटिश राजवटी विरोधात बुलंद आवाज देखील उठवला. दीर्घकाळापर्यंत मातृभूमी वृत्तपत्राशी निगडित राहून त्यांनी सामाजिक आणि राजकीय मुद्द्यांवर प्रभावशाली लेखन केले. पत्रकारितेत निर्भिडता, प्रामाणिकपणा, निष्पक्षता आणि लोकहिताप्रती समर्पण ही त्यांची ओळख होती, जिला स्वातंत्र्याच्या लढाईत त्यांनी आपले धारदार शस्त्र बनवले. स्वातंत्र्यानंतर राजकारणाशी जोडले गेल्यावर आणि लोकसेवेचे ध्येय घेऊन मार्गक्रमण करणाऱ्या दामोदर मेनन यांनी जनजागरण, शिक्षण आणि सामाजिक सुधारणा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले...*

ब्रिटिश राजवटी विरोधात निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता करणारे के. ए. दामोदर मेनन भारताच्या प्रमुख स्वातंत्र्य सैनिकांपैकी एक होते. 10 जून 1906 रोजी केरळ (आताचे केरलम) मधील करमलूर इथं जन्मलेल्या मेनन यांचे जीवन सत्य, निष्ठा आणि सेवाच्या मूल्यांचे प्रतीक होते. त्यांनी महाराजा कॉलेज, त्रिवेंद्रम आणि रंगून युनिव्हर्सिटी, बर्मा (सध्याचे म्यानमार) इथून शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी त्रिवेंद्रममधून कायद्याचे पदवी शिक्षण घेतले. शिक्षणानंतर त्यांचा ओढा सार्वजनिक कार्याबरोबरच पत्रकारितेत अधिक दिसू लागला. त्या परिस्थितीत त्यांनी महात्मा गांधींकडून प्रेरित होऊन स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून दिले.

दामोदर मेनन यांच्या जीवनावर महात्मा गांधी आणि त्यांच्या विचारांचा मोठा पगडा होता. त्यांनी महात्मा गांधींद्वारे चालवण्यात आलेल्या मिठाचा सत्याग्रह आणि सविनय अवज्ञा आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी तुरुंगवासही भोगला. त्यांनी भारत छोडो आंदोलनात केवळ भाग घेतला नाही तर त्या आंदोलनाच्या प्रमुख नेत्यांपैकी ते एक होते. यामुळेच इंग्रजांनी त्यांना पुन्हा एकदा अटक केली आणि ते 1942 ते 1945 पर्यंत कैदेत राहिले.

दामोदर मेनन यांनी 1948 पर्यंत प्रसिद्ध मल्याळम दैनिक मातृभूमीचे संपादक म्हणून जनजागृतीचे महत्वपूर्ण कार्य केले. या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी इंग्रजांद्वारे भारतीयांच्या शोषणावर टीका केली. एवढेच नाही तर त्यांनी वेगवेगळ्या कालखंडात समदर्शी, स्वतंत्र, कहालम आणि पावर शक्ती वृत्तपत्रांचे देखील संपादन केले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर देखील ते राष्ट्रहितासाठी काम करत राहिले. लोकसभा आणि विधानसभेवर देखील निवडून गेले.

केरळ विधानसभेचे सदस्य म्हणून निवड झाल्यानंतर ते राज्य सरकारमध्ये मंत्री देखील बनले. असे म्हटले जाते की त्यांचे आर्थिक विचार अतिशय उदारवादी होते. त्यांच्या मते धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब आहे. म्हणूनच ते आंतरजातीयच नव्हे तर भिन्न धर्मियांच्या विवाह संबंधांचे देखील समर्थक होते. 1 नोव्हेंबर 1980 रोजी त्यांचे निधन झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 18 मार्च 2022 रोजी मातृभूमी वृत्तपत्राच्या शताब्दी वर्ष सोहळ्याच्या उद्घाटन समारंभात दामोदर मेनन यांचे स्मरण केले होते आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण केली होती.

केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

# खरीप पिकांची एमएसपी
## आणि दोन सेमीकंडक्टर प्रकल्पाना मंजुरी



*देशभरातील शेतकऱ्यांच्या हितांचे रक्षण आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी केंद्र सरकार सातत्याने महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहे . याच अनुषंगाने केंद्रीय मंत्रिमंडळाने खरीप हंगाम 2026 साठी किमान हमीभाव (एमएसपी) मधील वाढीला मंजुरी दिली आहे. हा निर्णय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेतीला अधिक लाभदायक बनवणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. त्याचबरोबर मंत्रिमंडळाने भारत सेमीकंडक्टर मिशन (आय एस एम ) अंतर्गत आणखी दोन सेमीकंडक्टर प्रकल्पांसह अन्य अनेक महत्त्वपूर्ण प्रस्तावांना देखील मंजुरी दिली....*

**निर्णय : विपणन हंगाम 2026 -27 साठी 14 खरीप पिकांच्या एमएसपीला मंजुरी**

**प्रभाव :** केंद्र सरकारने वर्ष 2026-27 च्या विपणन हंगामासाठी खरीप पिकांच्या एमएसपी मध्ये वाढ केली आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी लाभदायक मूल्य मिळू शकेल. गेल्यावर्षीच्या तुलनेत एमएसपी मधील सर्वाधिक वाढ सूर्यफूल बिया (622 रुपये प्रतिक्विंटल), त्याखालोखाल कापूस (557 रुपये प्रतिक्विंटल), नायजर सीड (515 प्रति क्विंटल) आणि तिळासाठी (पाचशे रुपये प्रतिक्विंटल) करण्यात आली आहे .

**निर्णय : भारत सेमीकंडक्टर मिशन (आयएसएम) अंतर्गत आणखी दोन सेमी कंडक्टर प्रकल्पांना मंजुरी**

**प्रभाव :** मंजूर करण्यात आलेल्या दोन प्रस्तावांमुळे गुजरातमध्ये सुमारे 3936 कोटी रुपयांच्या एकूण गुंतवणुकीसह सेमीकंडक्टर उत्पादन युनिट स्थापन केलं जाईल. यामुळे कुशल व्यावसायिकांसाठी एकूण २230 रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे .

- या दोन्ही मंजुऱ्यांसह देशात सेमीकंडक्टर परिसंस्थेला महत्त्वपूर्ण चालना मिळेल कारण आयएसएम अंतर्गत एकूण मंजूर प्रकल्पांची संख्या 12 पर्यंत पोहोचेल, ज्यातील एकूण गुंतवणूक अंदाजे 1.64 लाख कोटी रुपये आहे.

- प्रकल्प देशात विकसित होत असलेल्या जागतिक दर्जाच्या चिप डिझाइन क्षमतांना पूरक ठरतील, ज्यामध्ये सरकारद्वारे 315 शैक्षणिक संस्था आणि 104 स्टार्ट-अप्सना पुरवण्यात आलेल्या डिझाइन पायाभूत सुविधा समर्थनामुळे गती मिळाली आहे.
- देशातील सेमीकंडक्टर परिसंस्थेला अधिकाधिक चालना मिळत असून यापूर्वी मंजूर झालेले दहा प्रकल्प सध्या अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर आहेत.

**निर्णय : आपत्कालीन कर्ज हमी योजना (ईसीएलजीएस) 5.0 ला मंजुरी**

**प्रभाव :** पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या आव्हानात्मक परिस्थितीत व्यवसायांना सावरण्यास सक्षम बनवणे हा या योजनेचा उद्देश आहे. या व्यतिरिक्त, यामुळे व्यवसायांना कामकाज सुरळीत राखणे, रोजगार टिकवणे आणि पुरवठा साखळ्या अबाधित राखण्यात मदत मिळेल अशी अपेक्षा आहे.

- प्रस्तावित कर्ज हमी योजना व्यवसाय, विशेषतः एमएसएमई आणि प्रवासी विमान कंपन्यांना बँका आणि वित्तीय संस्थांद्वारे त्यांच्या आवश्यक अतिरिक्त खेळत्या भांडवलाची गरज भागेल हे सुनिश्चित करण्यात मदत करण्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल आहे.
- वेळेवर पैसे उपलब्ध करून देऊन ही योजना व्यवसाय चालू ठेवेल आणि नोकऱ्यांचे नुकसान रोखेल.
- ही योजना निर्बाध देशांतर्गत उत्पादनाला चालना देईल आणि परिसंस्थेची लवचिकता टिकवून ठेवेल.

**निर्णय : आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने गुजरातच्या वडीनार येथे जहाज दुरुस्ती केंद्राच्या निर्मितीला मंजुरी दिली.**

**प्रभाव :** वडीनार जहाज दुरुस्ती केंद्र भारताच्या जहाज दुरुस्ती पायाभूत सुविधांमधील एक महत्त्वाची उणीव थेट दूर करेल. खरेतर, देशात सध्या 230 मीटरपेक्षा जास्त लांबीच्या मोठ्या जहाजांची दुरुस्ती करण्यासाठी देशांतर्गत पुरेशी क्षमता नाही. 300 मीटरपर्यंतच्या जहाजांची दुरुस्ती शक्य करून हे केंद्र भारतामध्येच मोठ्या जहाजांची खर्चिक दुरुस्ती शक्य करून दाखवेल. यामुळे परदेशी जहाजबांधणी केंद्रांवरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी होईल आणि परकीय चलनाची बचत होईल.

- या प्रकल्पामुळे जहाज दुरुस्ती, वाहतूक व्यवस्था आणि संलग्न उद्योगांमध्ये सुमारे 290 प्रत्यक्ष आणि सुमारे 1,100 अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच एका व्यापक सागरी औद्योगिक परिसंस्थेलाही चालना मिळेल.

**निर्णय : मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीने मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमधील 19 जिल्ह्यांचा समावेश असलेल्या तीन मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांना मंजुरी दिली.**

**प्रभाव :** यामुळे भारतीय रेल्वेचे सध्याचे जाळे सुमारे 901 किलोमीटरने वाढेल.या प्रकल्पांचा एकूण अंदाजे खर्च 23,437 कोटी रुपये आहे. हा प्रकल्प वर्ष 2030-31 पर्यंत पूर्ण होईल.

- प्रस्तावित मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पामुळे अंदाजे 83 लाख लोकसंख्या असलेल्या सुमारे 4,161 गावांची संपर्क व्यवस्था सुधारेल .

**या प्रकल्पांमध्ये समावेश**

नागदा – मथुरा तिसरी आणि चौथी लाईन

गुंटकल – वाडी तिसरी आणि चौथी लाईन

बुरहवाल – सीतापूर तिसरी आणि चौथी लाईन



**निर्णय : संसदेत सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक 2026, सादर करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी**

**प्रभाव :** याचा उद्देश सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) कायदा 1956 मध्ये सुधारणा करून सरन्यायाधीश वगळून भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या सध्याच्या 33 वरून वाढवून 37 करणे आहे.

- न्यायाधीशांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला अधिक कार्यक्षमपणे आणि प्रभावीपणे काम करणे शक्य होईल. यामुळे जलद न्याय मिळणे सुनिश्चित होईल.
- न्यायाधीश आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर सुविधांवरील खर्च भारताच्या एकत्रित निधीमधून केला जाईल.

**निर्णय : ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी वर्ष 2026-27 साखर उत्पादन हंगामासाठी 365 रुपये प्रति क्विंटल या वाजवी आणि किफायतशीर दराला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.**

**प्रभाव :** ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे 5 कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांबरोबरच साखर कारखाने आणि संबंधित पूरक कामांमध्ये काम करणाऱ्या 5 लाख मजुरांना लाभ होईल.

## निर्णय : नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उन्नतीकरण आणि आधुनिकीकरणाला मंत्रिमंडळाची मंजुरी

**प्रभाव :** नागपूर विमानतळासाठी नागपूरमध्ये 'मल्टी-मोडल इंटरनॅशनल कार्गो हब आणि एअरपोर्ट ' (मिहान) प्रकल्पांतर्गत प्रादेशिक विमान वाहतूक केंद्र बनण्याच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. खाजगी क्षेत्राची कार्यक्षमता आणि सरकारी देखरेखीबरोबरच, विमानतळात लक्षणीय गुंतवणूक, आधुनिकीकरण आणि सुधारित प्रवासी व मालवाहतूक सेवा अपेक्षित आहेत.

- टप्प्याटप्प्याने विकास करून याची अंतिम क्षमता वार्षिक 3 कोटी प्रवासी हाताळण्याची योजना आहे, ज्यामुळे हे विमानतळ मध्य भारतातील एक प्रमुख विमानतळांपैकी एक बनेल.
- या परिवर्तनामुळे केवळ विदर्भ प्रांतातील संपर्क व्यवस्था विस्तारणार नाही, तर तेथील आर्थिक पायाभूत सुविधाही मजबूत होतील. माल हाताळणी क्षमतेतही उल्लेखनीय वाढ होईल.



मंत्रिमंडळ निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

### निर्णय : 37,500 कोटी रुपये खर्चासह भूपृष्ठीय कोळसा / लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रकल्पांच्या प्रोत्साहन योजनेला मंजुरी.

**प्रभाव :** ही योजना भारताच्या कोळसा/लिग्नाइट गॅसिफिकेशन कार्यक्रमाला गती देण्यासाठी, 2030 पर्यंत 100 दशलक्ष टन कोळशाचे गॅसिफिकेशन करण्याचे राष्ट्रीय लक्ष्य साध्य करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे.

- त्याचबरोबर, ऊर्जा सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि द्रवीकृत नैसर्गिक वायू-एलएनजी (50% पेक्षा अधिक आयात), युरिया (20% आयात), अमोनिया (100% आयात) आणि मिथेनॉल (80-90 % आयात) यांसारख्या प्रमुख उत्पादनांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत करेल.

### निर्णय : गुजरातच्या अहमदाबाद जिल्ह्याचा समावेश असलेल्या एका नवीन प्रकल्पाला मंजुरी दिली.

**प्रभाव :** या प्रकल्पामुळे भारतीय रेल्वेचे सध्याचे जाळे सुमारे 134 किलोमीटरने वाढणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे 20,667 कोटी रुपये आहे. हा 2030-31 पर्यंत पूर्ण होईल.

- या प्रकल्पामुळे अहमदाबाद, धोलेरा एसआयआर, आगामी धोलेरा विमानतळ आणि लोथल राष्ट्रीय सागरी वारसा संकुल (एनएचएमसी) यांच्यात उत्तम संपर्क सुविधा स्थापित होईल.
- अहमदाबादला धोलेराशी जोडल्याने प्रवाशांच्या प्रवासाचा वेळ कमी होऊन दैनंदिन प्रवास आरामदायी होईल तसेच त्याच दिवशी परतीचा प्रवासही शक्य होईल.
- ही सेमी हाय-स्पीड रेल्वे केवळ दोन शहरांना जवळ आणणार नाही, तर शेकडो किलोमीटर अंतरावर राहणाऱ्या लोकांनाही एकमेकांच्या जवळ आणेल.

### निर्णय : 2030-31 पर्यंत कापूस उत्पादनात स्वयंपूर्णता आणि जागतिक वस्त्रोद्योग बाजारपेठेत स्पर्धात्मकता साध्य करण्यासाठी 5659.22 कोटी रुपयांच्या तरतुदीसह "कापूस उत्पादकता अभियानाला" मंजुरी दिली.

**प्रभाव :** हे अभियान भारत सरकारच्या 5 एफ (शेती ते धागा ते कारखाना ते फॅशन ते विदेश) या संकल्पनेशी सुसंगत आहे.

- या अभियानाचा उद्देश रोग आणि कीड-प्रतिरोधक अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांच्या बियाण्यांच्या विकासाद्वारे कापसाची उत्पादकता वाढवणे, राज्य सरकारे, कृषी विज्ञान केंद्रे आणि राज्य कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून विद्यमान आणि नवीन पीक उत्पादन तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि अवलंब करून विस्तार करणे हा आहे.
- त्याचबरोबर, उद्योगाला कमीत कमी दूषित कापसाचा पुरवठा सुनिश्चित करणे आणि उच्च-गुणवत्तेच्या कापसाच्या निर्यातीला प्रोत्साहन देणे आहे. ■




12 वर्षीय संकल्प यात्रा

# विकसित भारताच्या प्रवासाचे एक नवयुग




**लोकशाही प्रक्रियेत 2014 ते 2026 हा काळ संकल्पांच्या पूर्ततेत एक नवा अध्याय लिहिणाऱ्या युगाचा समानार्थी पर्याय बनला आहे. या काळात क्रांतिकारक बदल घडले असून आज देशातील प्रत्येक नागरिक या बदलांचा एक भाग असल्याचे अनुभवत आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील 12 वर्षांची कामगिरी म्हणजे घोर तपश्चर्येतून प्राप्त झालेले अमृत आहे ज्याने या अमृत काळात भारताला एक विकसित राष्ट्र बनवण्याचा दृढ संकल्प करून पुनर्रचनेच्या मार्गावर वाटचाल सुरू केली आहे...**

मुखपृष्ठ कथा

# विकास यात्रेची 12 वर्ष

**राष्ट्राच्या विकासाच्या प्रवासात एक वेळ अशी येते जेव्हा देश स्वतःची पुनर्व्याख्या स्थापित करतो. तो नवीन संकल्प करतो, यशाचा मार्ग शोधतो आणि अढळ इच्छाशक्तीने ते साकार करण्यासाठी मार्गक्रमण करतो. इथूनच त्या बदलांची सुरुवात होते जे युगानु युगं लोकांच्या स्मृतीचा भाग बनतात. 2014 मध्ये देशाच्या राजकारणाला एक कलाटणी मिळाली. देशाने एका अशा पहाटेचा अनुभव घेतला जिथून त्याचा विकासाचा प्रवास आजपर्यंत अव्याहत सुरू आहे. विकसित भारताच्या भव्य संकल्पाने पुढे वाटचाल करणारा राष्ट्राच्या पुनर्बांधणीच्या या प्रवासाला 9 जून रोजी 12 वर्षे पूर्ण होत आहेत. भारतीय संस्कृतीत आणि विविध धर्मांच्या धर्मग्रंथांमध्ये 12 या अंकाला विशेष महत्त्व आहे. धर्मग्रंथात 12 वर्षांच्या तपश्चर्येचा उद्देश साधकाला आध्यात्मिक ज्ञान आणि आत्म साक्षात्कार प्राप्त करण्यास मदत करणे हा आहे. 12 वर्षांची तपश्चर्या एक कठोर आणि आव्हानात्मक प्रक्रिया आहे आणि प्रत्येक जण ती करण्यास सक्षम नसतो हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील 12 वर्षांचा विकास प्रवास केवळ तात्काळ गरजांवरच नव्हे तर एका दूरगामी आणि सुविचारीत दृष्टिकोनावरही आधारित राहिला आहे.**

खरोखरच, गेल्या 12 वर्षात सेवेप्रती असलेली निष्ठा आणि कर्तव्यनिष्ठेने जुन्या कल्पनांना मोडीत काढले आहे आणि विकासाचा एक नवीन मार्ग तयार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शेवटच्या व्यक्तीपर्यंत लाभ पोहोचवण्यासाठी आणि स्वातंत्र्याची खरी जाणीव करून देण्यासाठी हाती घेतलेल्या उपक्रमांनी स्वातंत्र्याच्या अमृत काळापासून ते सुवर्ण काळापर्यंत एका नव्या भारताचे भवितव्य घडवत एक नवा मार्ग सुकर केला आहे. हा एक असा नवा भारत आहे जो तरुणांच्या स्वप्नांना नवे पंख देत आहे, महिलांच्या आकांक्षा पूर्ण करत आहे, गरिबांना प्रगतीसाठी भरपूर संधी उपलब्ध करून देत आहे आणि मध्यमवर्गाच्या आकांक्षा उंचावत आहे. अर्थव्यवस्था जलद गतीने वाढत आहे. गेल्या 12 वर्षात सुरू केलेल्या असंख्य योजनांचे लाभ लाखो गरीबाच्या घरांपर्यंत पोहोचले आहेत. देशातील प्रत्येक गरीब व्यक्तीला उज्वला आणि आयुष्मान भारताचे सामर्थ्य लक्षात येत आहे. आज सरकारी योजनांचा वेग वाढला आहे आणि ठरवलेली उद्दिष्टे साध्य होत आहेत. देश पूर्वीपेक्षा खूप वेगाने प्रगती करत आहे. पण हा प्रवास येथेच संपन्न होत नाही. देशाला परिपूर्णता गाठायची आहे. याच संकल्पाने भारताने अमृत काळाच्या प्रवासाला सुरुवात केली आहे. जेथे शंभर टक्के गावांमध्ये रस्ते असतील, शंभर टक्के कुटुंबाची बँक खाती असतील,

शंभर टक्के पात्र व्यक्तींकडे आयुष्मान भारत कार्ड असेल, शंभर टक्के पात्र व्यक्तींकडे उज्वला योजनेअंतर्गत गॅस जोडणी असेल, सरकारी विमा योजना, निवृत्ती वेतन योजना असो अथवा गृहनिर्माण योजना असतील. प्रत्येक पात्र व्यक्तीला या योजनांशी जोडले गेले पाहिजे. स्वनिधी योजनेद्वारे पदपथावरील विक्रेत्यांना बँकिंग प्रणालीशी जोडले जात आहे. देश प्रत्येक घरापर्यंत नळाचे पाणी या जल अभियानाच्या दिशेने वेगाने काम करत आहे. सर्वांगीण-सर्वसमावेशक-सर्वस्पर्शी विकासाच्या दूरदृष्टीने केंद्र सरकार हे सुनिश्चित करीत आहे की समाजाच्या विकासाच्या प्रवासात कोणतीही व्यक्ती, कोणताही वर्ग, कोणताही प्रदेश, देशाचा कोणताही कोपरा पिछाडीवर राहणार नाही. मग त्या महिला असोत, तरुण असोत, शेतकरी असोत किंवा गरीब आणि वंचित असोत, विकास सर्वांगीण असला पाहिजे केवळ हीच दूरदृष्टी आहे. गेल्या 12 वर्षांपासून देशाच्या या भागांना पुढे नेण्याचे प्रयत्न केले जात आहेत. पूर्व भारत, ईशान्य भारत, जम्मू आणि काश्मीर, लडाख सह संपूर्ण हिमालयीन प्रदेश, किना रपट्टीचे भाग आणि आदिवासी भाग हे भारताच्या भावी विकासाचे प्रमुख आधारस्तंभ बनत आहेत. या सर्वांसाठी बहुमताच्या विचाराऐवजी सहमतीला प्रोत्साहन देणारा सुशासनाचा एक मंत्र असायला हवा आणि "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास" हे त्याचे ब्रीदवाक्य बनले आहे. देश गरीबी, अस्वच्छता, भ्रष्टाचार, दहशतवाद, जातीयवाद आणि सांप्रदायिकता यापासून मुक्त भारताच्या उभारण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

## विकसित भारताचा सशक्त होत असणारा मार्ग

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीपासून ते असंख्य व्यासपीठांपर्यंत स्वातंत्र्याच्या सुरुवातीच्या काळात पूर्ण व्हायला हवी होती अशा कामांची यादी दिली आहे. तथापि याबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी दूरदृष्टीचा अवलंब केला गेला नाही. परिणामी सध्याच्या नेतृत्वाखाली सात दशकांपासून प्रलंबित किंवा अपूर्ण राहिलेल्या प्रकल्पांची पूर्तता होताना देश पाहत आहे. आता नशिबावर अवलंबून राहण्याऐवजी स्पष्ट दृष्टीकोन, दीर्घकालिक धोरणे आणि चिरस्थायी तोडग्यांच्या दूरदृष्टीने विकासाच्या नव्या परंपरा प्रस्थापित केल्या जात आहेत. यातूनच एका नव्या उदयोन्मुख भारताला आकार मिळत आहे. गेल्या 12 वर्षात भारताने केवळ आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार दुप्पट केला नाही तर आधुनिक पायाभूत सुविधांमुळे विकासही वेगाने झाला आहे. गेल्या 12 वर्षात रेल्वे, रस्ते, विमानतळ, बंदरे, वीज, पाणी आणि गॅस पाईपलाईन यांसारख्या पायाभूत सुविधांसाठीच्या अर्थसंकल्पात जवळपास 6 पटींनी वाढ करण्यात आली आहे. देशभरात आज मोठ्या प्रकल्पांची प्रगती वेगाने होत आहे. उत्तरेकडे पाहिल्यास जम्मू आणि



काश्मीरमध्ये जगातील सर्वात उंच रेल्वे पुलांपैकी एक असलेला चिनाब पूल साकारला गेला आहे. पश्चिमेकडे पाहिल्यास मुंबईत देशातील सर्वात लांब सागरी पूल अटल सेतू बनला आहे. पूर्वेकडे पाहिल्यास आसाममध्ये बोगीबिल पूल दिसेल. दक्षिणेकडे पाहिल्यास जगातील काही मोजक्या अनुलंबित उत्तन पुलांपैकी एक असलेल्या पंबन पुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे पूर्व आणि पश्चिम समर्पित मालवाहू मार्गिकेचे कामही पूर्ण होत आहे. देशातील पहिल्या बुलेट ट्रेनचे काम वेगाने सुरू आहे. वंदे भारत, अमृत भारत आणि नमो भारत यांसारख्या आधुनिक रेल्वेगाड्या रेल्वेचे जाळे आणखी आधुनिक बनवत आहेत. या विकासामागे एक दूरदृष्टी आहे. जेव्हा भारताचा प्रत्येक प्रदेश आपापसात जोडला जातो तेव्हा विकसित राष्ट्र बनण्याचा मार्ग अधिक मजबूत होतो. नवीन संसद भवन आणि सेंट्रल विस्टा हे आत्मनिर्भर भारताच्या मूलभूत दूरदृष्टीचे प्रतिबिंब आहेत. संसदेत आणि विधानसभेत महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय म्हणजे या नवीन इमारतीत मंजूर झालेले पहिले विधेयक होते. त्याचप्रमाणे 34 वर्षानंतर नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण सादर करण्यात आले जे जागतिक ज्ञानात महासत्ता बनवण्याच्या दिशेने भारताची प्रगती दर्शवते. तिहेरी तलाक, राम मंदिर, बोडो करार आणि कलम 370 यांसारख्या अनेक निर्णयांमुळे शांतता आणि सलोखा प्रस्थापित झाला आहे. अनेक दशकांपासून प्रलंबित असलेले आणि कायमस्वरूपी समस्या मानले जाणारे निर्णय पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली सोडवले गेले आहेत आणि नव्या भारताचा उदय होत आहे.

## तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बदलाचे नवे युग

भविष्यासाठी सज्ज दृष्टिकोन ठेवून तंत्रज्ञान धोरणे तयार करण्यात आघाडीवर असलेल्या काही मोजक्या देशांपैकी भारत एक आहे. तंत्रज्ञानाचा अनेक क्षेत्रांवर महत्त्वपूर्ण परिणाम झाला आहे. तंत्रज्ञानाने पारदर्शकतेचे एक नवीन युग आणले आहे. भारताच्या शहरी भागापेक्षा ग्रामीण भारतात आज अधिक इंटरनेट डेटा वापर जात आहे. कोविड 19 महामारीच्या काळात यूपीआय सारख्या मंचाच्या उदयाला गती मिळाल्याने तर डिजिटल व्यवहार ही एक संस्कृती बनली आहे. ई-कॉमर्समुळे व्यापक बाजारपेठेत प्रवेश मिळाला आहे. तंत्रज्ञानामुळे शंभर टक्के लाभार्थ्यांपर्यंत पोहोचता येत आहे, तर याआधी असे मानले जात होते की प्रत्येक रूपयातील केवळ 15 पैसेच गावांपर्यंत पोहोचतात. योजनांची अंमलबजावणी असो किंवा त्याचे निरीक्षण असो, ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासात तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. हे देशाला गतीची शक्ती प्रदान करत आहेत. आयटी-चेहरा विरहित मुल्यांकनासारख्या सुविधांनी क्रांतिकारक बदल घडवून आणले आहेत. तर ई-ऑफिस सारख्या उपक्रमांनी प्रशासनाचा वेग वाढवला आहे. गावांमध्ये पोस्टल बँका आणि शाळांमधील अटल सृजनशील मोहीमेने एका नवीन संस्कृतीची सुरूवात झाली आहे. एक काळ असा होता की भारतातील मानसिकता नोकरी शोधण्याची होती पण पंतप्रधान मोदी यांनी ती बदलून त्यांना नोकरी देणारे बनवले. आज स्टार्टअप्स आणि मुद्राच्या मदतीने तरुण नवीन भरारी घेत आहेत. पूर्व भारतात फक्त काही लोकांना स्टार्टअप हा शब्द समजत होता पण आज गावागावातील तरुणांनाही तो लक्षात आला आहे आणि ते युनिकॉर्न बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. भारत आज जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था बनली आहे.

## जागतिक नेतृत्वाची योग्य संधी

गेल्या 12 वर्षात भारताची प्रतिष्ठा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढली आहे आणि तो एक विश्वासार्ह नेतृत्व म्हणून उदयास आला आहे. रशिया-युक्रेन युद्धाच्या संकटाच्या काळात ऑपरेशन गंगा, ग्लासगो येथील कॉप-26 आणि शर्म-अल-शेख येथील कॉप-27 बैठकीदरम्यान भारत विकसनशील देशांसाठी एक खंबीर आवाज म्हणून पुढे आला. संयुक्त राष्ट्र, बिमस्टेक आणि जी-20 सारख्या आंतरराष्ट्रीय मंचावर भारताकडे जगाने दिलेले लक्ष हे याचेच उदाहरण आहे. जी-20 चेअध्यक्ष पद भूषवणाऱ्या भारताने जगाला एक नवीन मार्ग दाखवला आहे तसेच भारताची संस्कृती आणि क्षमता यांची जाणीव करून दिली आहे. पर्यावरण क्षेत्रात मिशन लाईफ आणि आंतरराष्ट्रीय सौर आघाडी यासारख्या उपक्रमांनी जगाला निसर्ग आणि वन्यजीवन यांच्यात सुसंवाद साधण्याचा मार्ग दाखवला आहे. वसुधैव कुटुंबकम या भावनेने भारत संकटाच्या काळात आपल्या शेजारी आणि जगातील इतर देशांना मदत करणारा पहिला देश ठरला आहे. तसेच कोविड महामारीच्या काळात जगासाठी औषधाचे केंद्र बनला होता. गेल्या 12 वर्षात जागतिक स्तरावर भारताने एक विश्वासार्ह भागीदार म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. त्याचबरोबर, देशांतर्गत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावर असे वातावरण निर्माण करण्यात आले आहे की सामान्य नागरिक केंद्र सरकारच्या योजनांमध्ये सहभागी होऊन विकासात भागीदार बनला आहे.

निःसंशयपणे एक दूरदर्शी आणि धाडसी सुधारणांचे प्रणेते म्हणून उदयास आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी नव्या आत्मविश्वासाने नव्या सुरुवातीचे प्रतीक बनले आहेत. 'नविन भारत विकसित भारत' ही संकल्पना एक सुरक्षित, समृद्ध आणि प्रगतिशील भारत घडवण्यासाठीचा उपक्रम आहे. गेल्या 12 वर्षांपासून केंद्र सरकारने दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरताना आज प्रत्येक भारतीय पाहत आहे.

**संकल्पा पासून ते पूर्ततेपर्यंतच्या 12 वर्षांच्या प्रवासातील या कामगिरीविषयी आपण पुढील पाच विभागांमध्ये, चला जाणून घेऊया.**




मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची 12 वर्ष

# जन सेवा हेच ध्येय

***“जे मला ओळखतात, ते मला समजूनही घेतात. मी स्वतःसाठी किंवा माझ्या लोकांसाठी नाही. मी गरिबांसाठी येथे आहे. माझा जन्म गरिबीत झाला आणि मी गरिबी अनुभवली आहे. मला गरिबांच्या वेदना समजतात.” पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे शब्द केवळ अभिव्यक्ती नसून, ते एका*** *अत्यंत संवेदनशील व्यक्तीच्या हृदयातून निघालेला आवाज आहे, ज्यांच्या मनात देशातील शोषित, गरीब, आदिवासी आणि मागासलेल्या लोकांविषयी प्रचंड संवेदनशीलता आहे. प्रत्येक निर्णयात गरिबांच्या कल्याणाला आणि उन्नतीला नेहमीच प्राधान्य देणे हा त्यांचा स्थायीभावच बनला आहे. राष्ट्राविषयीचा त्यांचा प्रत्येक विचार, भारताची संस्कृती आणि मूल्ये, सेवा, सुशासन आणि गरिबांच्या कल्याणासह विकसित भारताच्या सुवर्ण स्वप्नाला समर्पित आहे. या दूरदृष्टीने गेल्या 12 वर्षांत देशातील शेतकरी, ग्रामीण, गरीब आणि मध्यमवर्गासाठी एक संरक्षक कवच निर्माण केले आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य (पीएम-जेएवाय) योजनेच्या माध्यमातून आरोग्य संरक्षण प्रदान करण्यात आले आहे. या वर्गाच्या आकांक्षांना नवे पंख फुटले आहेत आणि समावेशक विकासाद्वारे सर्वांगीण सुरक्षेचे चक्र निर्माण करून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक पाऊल टाकले गेले आहे...*

# गरीब कल्याण

## गरिबांच्या कल्याणाने सन्माननीय आयुष्य

*भारत सरकारच्या कामगिरीचा आज विषय येतो तेव्हा गरिबांचे कल्याण सर्वात वरील स्थानावर असते. केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षांपासून गरिबांच्या कल्याणाला आपले ध्येय बनवले आहे, येथे लांगुल चालन नव्हे तर समाधान हाच पाया आहे. यात पीएम गरीब कल्याण अन्न योजना देशातील मोठ्या लोकसंख्येसाठी आणखी एक सुरक्षा कवच प्रदान करते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे 2014 मध्ये केलेले गरीब कल्याणाचे संकल्प पूर्ण करणाऱ्या असंख्य योजनांनी ग्रामीण आणि गरीब लोकांच्या आयुष्यात बदल घडवून आणला आहे. जागतिक विश्वासार्ह अहवालातून निदर्शनास येत आहे की भारतात गरीबी झपाट्याने कमी झाली आहे कारण सर्वोच्च नेतृत्वाच्या प्रत्येक निर्णयात अंत्योदयासोबतच गरिबांचे कल्याण आणि सक्षमीकरण हे कायमस्वरूपी केंद्रबिंदू बनले आहेत...*

### पी एम गरीब कल्याण अन्न योजना



**81 कोटी**

लोकांना पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत अन्नधान्य मिळत आहे

**5** वर्षांसाठी वाढवण्यात आली आहे प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, 1 जानेवारी 2024 पासून

- मार्च 2024 पर्यंत पोष्टिक तांदळाचा पुरवठा यशस्वीपणे करण्यात आला, गिरणीतील तांदूळ पौष्टिक तांदूळात रूपांतरित करण्यात आला.
- राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत देशभरातील शंभर टक्के शिधा पत्रिकांचे डिजिटेलीकरण करण्यात आले आहे.
- सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एक राष्ट्र एक शिधा पत्रिका योजना राबविण्यात आली आहे. मार्च 2026 पर्यंत 207 कोटीहून अधिक पोर्टेबिलिटी व्यवहारांची नोंद झाली आहे.

**25** कोटी नागरिकांनी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली गरिबीवर मात केली आहे. त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळात गरिबांना सक्षम करण्याची मोहीम आणखी वेगाने पुढे सरकली आहे.

**19%** देशात सामाजिक सुरक्षा 2015 मध्ये होती. 2025 मध्ये ती 64.3% वर पोहोचली. 94 कोटीहून अधिक नागरिकांना किमान एका सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभ मिळत आहे.

**12** कोटी शौचालये

स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधण्यात आली असून त्यामुळे देश उघड्यावरील शौचापासून मुक्त झाला आहे. सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे.




### आर्थिक सुरक्षा

**58.12**

कोटी प्रधानमंत्री जनधन खाती 15 एप्रिल 2026 पर्यंत उघडण्यात आली आहेत. या खात्यांमध्ये सुमारे 2.94 कोटी रुपये जमा झाले आहेत.




**32.21**

कोटी (55.8%) जनधन खाती महिलांची आहेत आणि सुमारे 45.17 कोटी (78.2%) पीएमजेडीवाय खाती ग्रामीण आणि निम-शहरी भागात उघडण्यात आली आहेत.

मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची 12 वर्ष



**2** लाख रुपये

जीवन विमा संरक्षण योजने अंतर्गत कोणत्याही कारणामुळे मृत्यू प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा मिळणार. योजनेसाठी 27.33 कोटीहून अधिक नोंदणी झाली आहे.

- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत अपघातामुळे मृत्यू झाल्यास तसेच कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास 2 लाख रुपयांचे तर अंशतः अपंगत्वासाठी 1 लाख रुपयांचे विमा संरक्षण. यात 57.92 कोटी नोंदणी झाली आहे.



**9** कोटीहून अधिक नोंदणी अटल निवृत्ती वेतन योजनेसाठी झाली आहे

- स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि महिला उद्योजकांना उत्पादन, व्यापार, सेवा आणि कृषी संबंधित उपक्रमांमध्ये ग्रीनफिल्ड प्रकल्प उभारण्यासाठी 62,790 कोटी रुपयांची 2.75 लाख कर्ज मंजूर करण्यात आली आहेत.
- जनधन-आधार-मोबाईल तिहेरी शक्तीने जनधन खात्यांना मोबाईल फोन आणि आधारशी जोडून एक मजबूत आर्थिक समावेशन मंच तयार केला आहे.
- पीएम स्वनिधी योजना - प्रारंभापासून ते 15 एप्रिल 2006 पर्यंत पदपथ विक्रेत्यांना 74.90 कोटी रुपयांची कर्ज देण्यात आली आहेत.

## जल जीवन मोहीम

**12.61** कोटी अतिरिक्त ग्रामीण कुटुंबांना 13 मे 2026 पर्यंत नळ जोडणी देण्यात आली.

2019 मध्ये मोहीमेचा प्रारंभ झाला तेव्हा 3.23 कोटी (16.7 टक्के) ग्रामीण कुटुंबांकडे नळ जोडणी होती.

**15.85** कोटी कुटुंबांना 13 मे 2026 पर्यंत घरी नळाद्वारे पाणी मिळाले आहे, देशातील 19.36 कोटी ग्रामीण कुटुंबांच्या तुलनेत.

- 10 मार्च 2026 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने जल जीवन मोहीमेला डिसेंबर 2028 पर्यंत मुदत वाढ देण्यास मंजुरी दिली.



"

*मला कष्टाचा कधीच कंटाळा येत नाही. उलट माझ्या कष्टाने गरीब जनतेच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य मला प्रचंड समाधान देते.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# शेतकरी कल्याण

## एका नवीन युगाची सुरुवात

*अनेक दशकांपासून दुर्लक्षित असलेले भारताचे शेतकरी म्हणजेच अन्नदाते आता भारताच्या विकास प्रवासाचे भागीदार बनले आहेत. शेतकऱ्यांबद्दलच्या या दृष्टीकोनामुळे कृषी मंत्रालयाचे नाव बदलून आता कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय असे ठेवण्यात आले आहे. आपल्या याच दूरदृष्टीनुसार गेल्या 12 वर्षांपासून केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरण करण्यासाठी पेरणीपूर्व, पेरणी दरम्यान आणि पेरणी पश्चात विविध योजनांच्या माध्यमातून त्यांच्या प्रत्येक गरजेची काळजी घेत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना मिळाली आहे एक नवीन दिशा...*

### वाढते अन्न उत्पादन

**357.73** दशलक्ष मेट्रिक टनाहून जास्त विक्रमी अन्नधान्य उत्पादनाची नोंद 2024-2025 साली भारताने केली.

**150** दशलक्ष टन उत्पादनासह भारत जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश बनला आहे.



- भारत जगातील दुसरा सर्वात मोठा मत्स्य उत्पादक देश बनला आहे. हे नील अर्थव्यवस्थेतील देशाचे यश दर्शवते.



- दूध उत्पादनातही भारत जगातील सर्वात यशस्वी देशांपैकी एक म्हणून ओळखला जातो. सहकारी चळवळीच्या सामर्थ्याचा हा परिणाम आहे.



### पी एम किसान सन्मान निधी

या योजनेअंतर्गत दरवर्षी रुपये 6 हजाराची आर्थिक मदत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे शेतकऱ्यांच्या आधार जोडलेल्या बँक खात्यांमध्ये तीन समान हफ्त्यांमध्ये हस्तांतरित केली जाते. स्थापनेपासून आतापर्यंत 9 कोटीहून अधिक शेतकऱ्यांना 22 हप्त्यांमध्ये रुपये 4.27 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली आहे.



### सरकार एम एस पी मध्ये सातत्याने वाढ करत आहे

- 2018-19 पासून सरकारने सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमतीत (एम एस पी) वाढ केली आहे. ही वाढ उत्पादन खर्चाच्या किमान 1.5 पट केली जाते जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चावर किमान 50 टक्के परतावा मिळू शकेल.

## कृषी विकासासाठी निधी

अर्थसंकल्पात 2026-27 साठी कृषी क्षेत्राकरिता 1,32,561 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कृषी, शिक्षण आणि संशोधनासाठी अंदाजे 9,967 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यातून कृषी विकासाला सातत्यपूर्ण प्राधान्य देण्याची सरकारची वचनाबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित होते.

### प्रधानमंत्री किसान मानधन योजना

**24.96** कोटी शेतकऱ्यांची नोंदणी 6 फेब्रुवारी 2026 पर्यंत प्रधानमंत्री किसान मानधन योजनेत झाली आहे.

**60** वर्षे वय पूर्ण झाल्यावर 3,000 रुपयांचे मासिक हमी निवृत्ती वेतन मिळण्याची तरतूद आहे. प्रवेशाच्या वयानुसार मासिक योगदानाची किंमत 55 रुपये ते 200 रुपयांदरम्यान असते.



*“आज केंद्रात असणारे सरकार शेतकऱ्यांचा खर्च कमी करण्यासाठी आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत प्रामाणिक प्रयत्न करत आहे. पीएम किसान सन्मान निधी योजना ही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट पैसे हस्तांतरित करणारी जगातील सर्वात मोठी योजना आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## शेतकऱ्यांना अनुदानित दरात खते मिळत राहिली

कोरोना महामारी आणि त्यानंतर झालेल्या युद्धांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या किमती अनेक पटींनी वाढल्या. परदेशी बाजारात खते मिळणे कठीण झाले होते. मात्र, केंद्र सरकारने हे संकट टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले

**3,000** रुपयांना युरियाची जी पिशवी आंतरराष्ट्रीय बाजारात मिळते तीच केंद्र सरकार शेतकऱ्यांना 300 रुपयांपेक्षा कमी किमतीत देत आहे.



- 12 लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च सरकारने आपल्या तिजोरीतून यावर केला आहे, जेणेकरून शेतकऱ्यांवर बोजा पडणार नाही.
- गेल्या 12 वर्षात केंद्र सरकारने देशातील शेतकऱ्यांभोवती एक मजबूत संरक्षक कवच विणले आहे. एम एस पी, स्वस्त कर्ज, पिक विमा आणि पीएम किसान सन्मान निधी यांसारख्या योजना शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरले आहेत.
- शेतकऱ्यांची शेती नवीन तंत्रज्ञानाशी जोडली जावी, त्यांना नवीन सिंचन पद्धतीशी जोडले जावे आणि त्यांच्या पिकांना अधिक उत्पन्न मिळावे, हे निश्चित करण्याच्या उद्देशाने सरकारने 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' धोरण तयार केले. ठिबक आणि तुषार सिंचना सारखी सूक्ष्म सिंचन तंत्र शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली.
- केंद्र सरकारने कुसुम योजना सुरू केली. आज अनेक शेतकरी सौर पंपाचा वापर करून केवळ आपल्या जमिनीला पाणी देत नाही तर वीज निर्माण करून पैसेही कमवत आहेत.



# मध्यमवर्गाच्या आकांक्षांना मिळाली नवीन उभारी

*झपाट्याने बदलणाऱ्या भारतात विकास असो वा प्रशासन, धैर्य असो किंवा दृढ निश्चय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मध्यमवर्ग ही एक प्रमुख शक्ती आहे. लोकसंख्येच्या एक तृतीयांश असलेला मध्यमवर्ग समृद्ध आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण शक्ती आहे, ज्यांच्या महत्वाकांक्षांना केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षात नवीन उभारी दिली आहे*

## प्राप्तिकरातून सवलत

**₹12 लाख** पर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर नवीन कर प्रणालीनुसार कोणताही प्राप्तिकर नाही.



**₹75,000** रुपयांच्या मानद वेतनप्राप्त करदात्यांसाठी 12.75 लाख रुपयांची मर्यादा.

- केंद्रीय अर्थसंकल्प 2025-26 मध्ये सर्व करदात्यांना लाभ देण्यासाठी प्राप्ती कर टप्पे आणि दरांमध्ये व्यापक बदल करण्यात आले आहेत.
- स्लॅब दरांमध्ये कपात आणि सवलतींच्या माध्यमातून मध्यम वर्गाला व्यापक सवलती, देशांतर्गत वापर खर्च आणि गुंतवणूकीला चालना मिळेल.
- प्राप्तिकर भरणाऱ्यांची संख्या आर्थिक वर्ष 2022 मधील 6.9 कोटींवरून आर्थिक वर्ष 2025 मध्ये 9.2 कोटी वर पोहोचली.

## उड्डाण योजना



**1.64** कोटीहून अधिक देशवासीयांनी 3.45 लाख विमानसेवांच्या माध्यमातून उड्डाण योजनेचा लाभ घेतला आहे.

केंद्र सरकारने या योजनेचा आणखी विस्तार केला आहे. यासाठी सुमारे 29 हजार कोटी रुपयांना मंजुरी देण्यात आली आहे.

**665** मार्गांनी 95 विमानतळे, हेलीपॅड आणि जल विमानतळांना जोडले गेले आहे.

- या अंतर्गत येत्या काही वर्षात छोट्या-छोट्या शहरांमध्ये 100 नवीन विमानतळे आणि 200 नवीन हेलीपॅड बांधण्याची योजना आहे.
- वर्ष 2014 पूर्वी देशात केवळ 74 विमानतळे होती. आज देशात 160 हून अधिक विमानतळे आहेत.

## वंदे भारत सेवा

**9.1** कोटी यात्रेकरूंनी वंदे भारत सेवा सुरू झाल्यापासून 31 मार्च 2026 पर्यंत प्रवास केला आहे. 1 लाख फेऱ्यांमध्ये हा प्रवास झाला आहे.


**162** वंदे भारत सेवा आतापर्यंत सुरू करण्यात आल्या आहेत ज्यामुळे कॉरिडोर प्रवासा साठीचा वेळ 45% पर्यंत कमी झाला आहे.

**90** सेवा 8-कोच सहित | **38** सेवा 20-कोच सहित | **34** सेवा 16-कोच सहित

गरीब तसेच मध्यमवर्गीयांना अविरत सेवा पुरविणारी भारतीय रेल्वे, शंभर टक्के विद्युतीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे.



## उमंग ॲप : एक मंच, अनेक सेवा




**11.02** कोटी नोंदणी उमंग ॲप वर

**766.35** कोटी व्यवहार

**2,517** सेवा ऑनबोर्ड

2017 मध्ये सुरुवात करण्यात आलेल्या या ॲपचा अर्थ आहे मध्यमवर्गीयांसाठी कमी रांगा,अधिक नियंत्रण आणि सार्वजनिक सेवांमध्ये द्रुत प्रवेश.

## डिजीलॉकर

DigiLocker

**63.88** कोटींहून अधिक नोंदणीकृत वापरकर्ते

**950** कोटी+ दस्ताऐवज जारी



## मोबाइल डेटाचा खर्च झाला कमी

**97%** मोबाइल डेटावर होणारा खर्च 2014च्या तुलनेत 2025-26 मध्ये कमी झाला.

## स्थावर मालमत्ता नियमन

- घर खरेदी करणा-यांच्या हिताचे रक्षण करणे आणि घरकूल निर्मिती क्षेत्रामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी, संसदेने 2016 मध्ये 'स्थावर मालमत्ता नियमन आणि विकास अधिनियम विधेयक मंजूर केले.
- 1.57 लाख प्रकरणांचा 'रेरा'ने निपटारा केला आहे. 35 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'रेरा' कडे अधिकार आहेत.
- 1.61 लाखांपेक्षा जास्त स्थावर मालमत्ता प्रकल्प आणि 1.13 लाख स्थावर मालमत्ता एजंट देशभरामध्ये 'रेरा' अंतर्गत नोंदणीकृत आहेत.



## पीएम घरकूल योजना - शहरी

गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय 25 जून, 2015 पासून प्रधानमंत्री घरकूल योजना- शहरी (पीएमएवाय-यू) अंतर्गत केंद्राकडून मदत प्रदान करून राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रयत्नांना सहकार्य केले जात आहे. त्यामुळे देशभरातील पात्र नोकरदार, व्यावसायिक शहरी लाभार्थींना पायाभूत नागरी सुविधांनी युक्त पक्के घरकूल उपलब्ध करून दिली जात आहेत.



एकूण **125.15** लाख घरांना देशभरांमध्ये आत्तापर्यंत मंजूरी देण्यात आली आहे. त्यामध्ये पीएमवायई-यू 2.0 अंतर्गत 13.67 लाख घरकुलांचा समावेश आहे.

116.57 लाख घरकुलांच्या निर्मितीचे कार्य सुरू करण्यात आले आहे. या घरांना आधीच मंजूरी देण्यात आली आहे. महत्वाचे म्हणजे, यापैकी 97.30 लाख घरकुलांचा ताबा 2 मार्च 2026 पर्यंत लाभार्थींना देण्यात आला आहे.

## टपाल कार्यालय पारपत्र सेवा केंद्र

**23** मंडळांमध्ये 452 टपाल कार्यालय पारपत्र सेवा केंद्र सुरू



## पीएम सूर्य घर मोफत वीज योजना

**36.88** लाख घरांमध्ये प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत 30 एप्रिल, 2026 पर्यंत सौरप्रणाली लावण्यात आली आहे.



**19,480** कोटी रूपये अनुदान देण्यात आले.

सौर वीज योजनेअंतर्गत स्थापित क्षमता 10.77 गीगावॅटपर्यंत पोहोचली आहे.

## वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था

गेल्या 12 वर्षांमध्ये देशाचा आर्थिक पाया चांगलाच भक्कम झाला आहे. जगामध्ये अनेक प्रकारची संकटे येवूनही भारत जागतिक स्तरावर वेगाने पुढे जात असून, एक प्रमुख अर्थव्यवस्था बनला आहे. भारताने महागाई दर कमी ठेवण्यात खूप चांगले यश मिळवले आहे. याचा थेट आणि चांगला परिणाम देशातील गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना होत आहे.

> *"मध्यमवर्गीय परिवार देशासाठी खूप काही देत असतात. त्यांचे राहणीमान गुणवत्तापूर्ण असावे, अशी या वर्गाची जी अपेक्षा आहे; त्यामुळे देशाचेही कर्तव्य आहे, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही निरंतर प्रयत्न करीत आहोत. मी स्वप्न पाहिले आहे की, 2047 पर्यंत विकसित भारताची स्वप्नपूर्ती होईल. त्याचाच एक भाग म्हणजे सामान्य माणसाच्या जीवनामध्ये सरकारचा हस्तक्षेप कमी होईल.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**


# आरोग्य



# आरोग्य संपन्नतेच्या दिशेने भारत

*तुम्हाला हे माहिती आहे का, की व्यक्तीच्या सरासरी आयुर्मानामध्ये एका वर्षाची वाढ झाली तर देशाच्या जीडीपीमध्ये 4 टक्के वृद्धी होते! याच कारणामुळे स्वतंत्र भारतामध्ये आरोग्य क्षेत्राला पहिल्यांदाच 2014 मध्ये फक्त प्राधान्य दिले इतकेच नाही तर, विद्यमान सरकारने या क्षेत्रासाठी धोरणात्मक कार्यक्रमाची आखणी केली आणि या कार्याला सर्वोच्च स्थानावर ठेवले. स्वस्त आरोग्य सेवा उपलब्ध करून, आरोग्यदायी भविष्य सुरक्षित करण्यासाठी गेल्या 12 वर्षांमध्ये भारत सरकारने उत्कृष्ट परिणामांच्या दिशेने पावले टाकली आहेत. आज भारत विश्वातल्या सर्वात मोठ्या आरोग्य सेवा कार्यक्रमाचे म्हणजेच आयुष्मान भारताचे करीत आहे नेतृत्व...*

## आरोग्य शिक्षणामध्ये 12 वर्षांमध्ये दिसून येते परिवर्तन



**23**
एम्स, 2014 मध्ये हा आकडा 7 होता.

**172%**
पर्यंत वाढल्या 12 वर्षात वैद्यकीय शिक्षणाच्या जागा

**818**
झाली ॲलापॅथी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या; 2014 मध्ये 387 होती.

**323**
दंतवैद्यकशास्त्र आणि 942 आयुष संस्था

**1,28,975**
पर्यंत पोहोचली 51,384 वरून एमबीबीएसच्या जागांची संख्या

**85,020**
पर्यंत पोहोचल्या, 31,185 वरून वाढून वैद्यकीय पदव्युत्तर पदवी शिक्षणाच्या जागा.



## लसीकरण

**12**
प्रकारच्या आजारांपासून संरक्षण करण्यासाठी नवजात बालके आणि लहान मुलांना लस देण्यात येत आहे.

- वर्ष 2015 मध्ये सुरू करण्यात आलेल्या मिशन इंद्रधनुष कार्यक्रमांतर्गत ज्या गर्भवतींचे लसीकरण झालेले नाही किंवा ज्यांचे काही प्रमाणात लसीकरण झाले आहे, त्यांचा समावेश करून गरजेनुसार लसी देण्यात आल्या.
- दरवर्षी 2.9 कोटी गर्भवती आणि 2.54 कोटी नवजात बालकांचे मोफत लसीकरण
- वर्ष 2026 मध्ये गर्भपिशवीच्या मुखाशी होणाऱ्या कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी एचपीव्ही लस देण्यास प्रारंभ
- पूर्ण लसीकरण - वर्ष 2015 मध्ये 62 टक्के होते, त्यामध्ये वाढ होवून जानेवारी 2026 मध्ये 98.4 टक्के झाले.
- कोविड -19 च्या काळामध्ये भारताने 200 कोटींपेक्षा जास्त लस मात्रा दिल्या.

मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची 12 वर्ष



## दिसून आले चांगले परिणाम

- 1990 पासून एमएमआर म्हणजेच मातृ मृत्यू दरामध्ये 86 % घट झाल्याचे दिसून आले आहे. ही घट वैश्विक दराच्या सरासरी 48 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.
- पाच वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या मुलांच्या मृत्यू दरामध्ये 78 % घट नोंदवली गेली आहे. ही घट वैश्विक दराच्या सरासरी 61 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.
- नवजात अर्भकांच्या मृत्यू दरामध्ये 70 % घट झाल्याचे दिसून आले आहे. ही घट वैश्विक दराच्या सरासरी 54 टक्के आहे.
- बाल मृत्यू दरामध्ये गेल्या दशकामध्ये 37 टक्क्यांपेक्षाही जास्त घट झाल्याच नोंद आहे. पूर्वी म्हणजे 2013 मध्ये जन्मलेल्या आणि जगलेल्या बालकांपैक प्रतिहजारी 40 बालकांचा मृत्यू होत असे. आता हे प्रमाण कमी होवून 2023 मध्ये 25 झाले आहे.



## संस्थेमध्ये होणारी प्रसुती

| | ग्रामीण क्षेत्र | | शहरी क्षेत्र | |
|---|---|---|---|---|
| | वर्ष 2017-18 | वर्ष 2025 | वर्ष 2017-18 | वर्ष 2025 |
| संस्थेमध्ये होणारी प्रसुती | 90.5% | 95.6% | 96.1% | 97.8% |

## प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (पीएम-जय)

- 23 सप्टेंबर, 2018 मध्ये ( एबी-पीएमजेएवाय) सुरू करण्यात आली. ही जगातील सर्वांत मोठी सार्वजनिक आरोग्य सेवा योजना आहे.
- सामाजिक - आर्थिक रूपाने वंचित कुटुंबांसाठी आणि 70 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या सर्व नागरिकांना औषधोपचारासाठी प्रतिवर्ष 5 लाख रूपयांपर्यंतचे आरोग्य कवच

**12** कोटींपेक्षा जास्त लोकांना मिळाले औषधोपचार

**36,038** रूग्णालयांनी योजनेत केली नोंदणी

**43.93** कोटींपेक्षा जास्त आयुष्मान कार्ड बनविले.




## आयुष्मान आरोग्य मंदिर

**1,84,235** आयुष्मान आरोग्य मंदिर ( 27 फेब्रुवारी, 2026 पर्यंत कार्यरत आहेत.)

**42.6** कोटींपेक्षाही जास्त लोकांना (31 डिसेंबर, 2025) दूरस्थ संपर्क यंत्रणेमार्फत दिला आरोग्य सल्ला.






## वैद्यकीय पर्यटन

- वर्ष 2025 मध्ये 5,07,244 परदेशी नागरिक विशेषत्वाने आरोग्य सेवेमार्फत उपचार घेण्यासाठी भारतात आले.
- वर्ष 2030 पर्यंत वैद्यकीय पर्यटनाची बाजारपेठ वाढून 16.2 अब्ज डॉलर इतकी होईल, असा अंदाज.
- ई-वैद्यकीय व्हिजा आणि ई-वैद्यकीय मदतनीस व्हिजा सुविधा आता 172 देशांमध्ये उपलब्ध करून दिली आहे.

## आरोग्यवैद्यकीय पर्यटन निर्देशांक वर्ष 2020-21 अनुसार...

- भारत वैश्विक स्तरावर शीर्ष 46 वैद्यकीय पर्यटन स्थळांमध्ये10 व्या स्थानावर आहे.
- जगातील अव्वल 20 निरामय आरोग्य पर्यटन बाजारामध्ये 12 व्या स्थानावर आहे.
- अशिया- प्रशांत क्षेत्रामध्ये अव्वल 10 आरोग्य देखभाल स्थानांमध्ये 5 व्या स्थानावर

## स्वस्त आणि गुणवत्तापूर्ण औषधे

**19,200** जन औषधी केंद्रांवर प्रधानमंत्री भारतीय जन औषधी परियोजनेच्या (पीएमबीजेपी) माध्यमातून गुणवत्तापूर्ण जेनेरिक औषधे किफायतशीर दरामध्ये उपलब्ध.

- या केंद्रांवर 2,100 पेक्षा जास्त औषधे आणि 315 शल्य चिकित्सेसाठी आवश्यक उत्पादने उपलब्ध आहेत. या सर्व उत्पादनांची बाजारमूल्यांपेक्षा 50 ते 90 टक्के कमी दराने विक्री केली जाते.

जवळपास **40,000** कोटी रूपयांची बचत सर्वसामान्य लोकांना स्वस्त औषधे मिळाल्यामुळे झाली आहे.



## खिशावरील आर्थिक भार झाला कमी

- आरोग्य उपचारांवर होणार खर्च वर्ष 2014-15 मध्ये 62.6 % होता. तो कमी होऊन 2020-21 मध्ये 39.4 % झाला आहे. यामध्ये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे खूप मोठे योगदान आहे.



## राष्ट्रीय आरोग्य धोरण, 2017

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली 15 मार्च, 2017 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय आरोग्य धोरण, 2017 ला मंजूरी दिली. यामागे असा उद्देश्य आहे की, आरोग्य सेवा धोरणाच्या माध्यमातून सर्वोत्तम आरोग्य सेवा सर्वांना देता यावी, तसेच कोणत्याही प्रकारे आर्थिक अडचण निर्माण न होता, उच्च गुणवत्तेची आरोग्य सेवा प्रदान करणे शक्य व्हावे.

## सुखद घटना

- 2014 मध्ये भारत पोलिओ मुक्त घोषित
- 2015 मध्ये नवजात बालकांना होणा-या धनुर्वाताचे निर्मूलन
- 2024 मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने भारत ट्रॅकोमा म्हणजे विशिष्ट जीवाणू संसर्गामुळे होणारा नेत्रआजार मुक्त झाल्याचे केले घोषित
- भारत नजीकच्या वर्षांमध्ये काळाआजार निर्मूलनाच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे.





मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची
12 वर्ष

# सशक्तीकरणाचा निरंतर प्रवास

## प्रत्येक क्षणी विकास, प्रत्येक क्षणी नव्या शक्यता

*सुवर्णमयी मार्गावरून वाटचाल करण्यापूर्वी सर्वात प्रथम आवश्यकता होती ती, ज्यांची कोणी विचारपूसही करीत नाही, त्या विशिष्ट वर्गाकडे विशेष लक्ष देण्याची. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अशा वर्गाची फक्त विचारपूस केली नाही, तर त्यांचे पूजन केले. वंचितांना केंद्र सरकारच्या सर्व योजना, धोरणे यामध्ये सर्वोच्च प्राधान्य दिले गेले. "यत्र नार्यस्तु  पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः। यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः" महिला नेतृत्वाचा विकास करणे हा मंत्र बनविण्यात आला आणि गेल्या 12 वर्षांमध्ये महिला शक्ती प्रत्येक क्षेत्रामध्ये आपला ध्वज उंच फडकवत आहे. त्याप्रमाणे हाच काळ आहे, योग्य काळ आहे, भारताचा अमूल्य काळ आहे... युवा पिढीला समर्पित विकसित भारत, हा मंत्र या गोष्टीचा द्योतक आहे की, भारतातील युवकांकडून आपल्या महत्वाकांक्षांच्या पूर्तीसाठी,अधिकाधिक उंच भरारी घेण्यासाठी सर्व सिद्धता केली जात आहे. आज युवा शक्तीच्या सामर्थ्याला नवीन ओळख मिळाली आहे. त्यामुळे भारताच्या ज्ञान-विज्ञान आणि कालजयी कामगिरीचे प्रतीक म्हणजे आजच्या नव्या भारताची अमृत पिढी आहे. आज असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही की, 12 वर्षे म्हणजे एका युगाच्या रूपाने वंचित, महिला शक्ती, युवा शक्ती आणि शेतकरी बांधवाच्या सशक्तीकरणाचा हा कालखंड बनला आहे. नवीन भारताच्या नवीन नेतृत्वाने संवेदनशील विचार करून आणि सर्वसमावेशक दृष्टिकोण ठेवून या काळामध्ये सर्व वर्गाला- क्षेत्राला विकासामध्ये सहभागी करून घेतले आहे. आणि त्यानंतर सुरू झाला आहे सुवर्णमयी भारताचा प्रवास ....*

# महिला सशक्तीकरण आणि नवीन भारत

*नारी तू नारायणी, तुझ्यामध्येच सामर्थ्य आहे, तूच राष्ट्रशक्ती आहेस. या संकल्पाबरोबरच नवीन भारत उत्कृष्टतेचे नित्य नवे अध्याय लिहीत आहे. महिला शक्तीशिवाय कोणतेही राष्ट्र समृद्धी साध्य करू शकेल, याची कल्पनाही करू शकत नाही. अशावेळी केवळ महिला उत्थान नाही तर महिला शक्तीच्या नेतृत्वाखाली विकासाचा दृष्टिकोन बाळगल्यामुळे गेल्या 12 वर्षांमध्ये राष्ट्राच्या धोरणाचा महत्वपूर्ण आधार महिला बनल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, आर्थिक समृद्धी आणि नेतृत्वाच्या संधींमुळे महिलांना सशक्त करण्यासाठी राबवलेले अनेक उपक्रम या प्रवासात मैलाचे दगड ठरले. आता लोकसभा -विधानसभा यांमध्ये 33 टक्के महिलांना आरक्षण देण्यासाठीही केंद्र सरकार आहे कटिबद्ध...*

## महिला सशक्तीकरणाच्या दिशेने टाकलेली पावले

**2023** मध्ये नवीन संसद भवनामध्ये 'नारी शक्ती वंदन विधेयक' आणून, या स्वरूपामध्ये सर्व प्रथम पाऊल उचलण्यात आले.



14 लाखांपेक्षा जास्त महिला आज भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध मंडळे, समित्यांवर यशस्वीतेने काम करीत आहेत. जवळपास 21 राज्यांमध्ये तर पंचायतींमध्ये महिलांची भागीदारी जवळपास 50 टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.



- गेल्या 12 वर्षांमध्ये 3 कोटींपेक्षा जास्त महिला 'पीएम घरकूल योजना' अंतर्गत घराच्या स्वामिनी बनल्या आहेत.
- आज 70 टक्क्यांपेक्षा अधिक पीएम घरकूले एकट्या अथवा संयुक्त रूपाने महिलांच्या नावावर आहेत.

- स्टॅंड-अप इंडिया योजनेअंतर्गत 75 टक्के कर्ज महिलांना देण्यात आले आहे. याशिवाय जन धन खात्यांमध्ये 55 टक्के भागीदारी महिलांची आहे.

**70%** कर्ज मुद्रा योजनेअंतर्गत महिलांना मिळाले आहे.

- 26 आठवडे प्रसुतीसाठी महिलांना रजा दिली जाते.
- 10 कोटी महिला गेल्या 12 वर्षांमध्ये स्वयं मदत गटाशी जोडल्या गेल्या आहेत.
- 6 कोटी माता-भगिनींना लखपती दीदी बनविण्याचे लक्ष्य सरकारने निश्चित केले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी हे लक्ष्य ठेवले आहे. यामध्ये 3 कोटींपेक्षा जास्त ग्रामीण महिला आत्तापर्यंत लखपती दीदी बनल्या आहेत.
- सप्टेंबर, 2015 मध्ये सरकारने सुरू केलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या उपक्रमांतर्गत जवळपास सात कोटी महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.




- 2015 मध्ये सरकारने मिशन इंद्रधनुष्य कार्यक्रम सुरू केला. त्यानुसार ज्या बालकांचे आणि गर्भवती महिलांचे लसीकरण होऊ शकले नाही, त्यांच्यापर्यंत लसीकरण मोहिमेच्या माध्यमातून पोहोचून त्यांचे लसीकरण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.
- **मिशन शक्ति पोर्टल:** जानेवारी 2025 मध्ये मिशन शक्ती पोर्टल (**https://missionshakti.wcd.gov.in/**) सुरू करण्यात आले. 23 मार्च, 2026 पर्यंत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्यावतीने 2,428 संरक्षण अधिका-यांचे विवरण पोर्टलवर अद्यतन करण्यात आले आहे.



## सशक्त होत आहेत महिला

**48%** टक्क्यांपेक्षा जास्त स्टार्टअपमध्ये कमीत कमी एक महिला संचालक.

- भारताच्या महिला क्रिकेट संघाने प्रथमच विश्व करंडक जिंकला. याचप्रकारे दृष्टीबाधित दिव्यांग महिला क्रिकेट संघानेही विश्व चषक जिंकला आहे.
- राष्ट्रीय संरक्षण अकादमी म्हणजेच एनडीए मध्ये महिला कॅडेट्सच्या पहिल्या तुकडीने आपला अभ्यासक्रम पूर्ण केला.




पीएच.डी. मध्ये महिला संशोधनकर्त्यांचे नावनोंदणीचे प्रमाण 135.6 टक्के इतके विक्रमी वाढले आहे( 2014-15 ते 2022-23 पर्यंत). हे प्रमाण दुपटीपेक्षाही जास्त वाढले आहे. यामुळे 64,724 अतिरिक्त महिला संशोधन कार्याशी जोडल्या गेल्या आहेत.



जवळपास **43%** टक्क्यांपर्यंत गणित आणि विज्ञान विषय म्हणजेच **STEM Education** घेणा-या मुलींची संख्या गेली आहे.

मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची 12 वर्षे

## आनंदाची ज्योती : उज्ज्वला योजना

**10.57** कोटींहून अधिक गॅस जोडण्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत 1 मार्च 2026 पर्यन्त वितरित करण्यात आल्या.

गॅस आल्यामुळे दररोजचे 2 ते 3 तास महिलांचे वाचतात. यापूर्वी चूलीवर स्वयंपाक करण्यासाठी महिलांना लाकूडफाटा आणि इतर साधनसामुग्री जमा करण्यासाठी जो खूप वेळ लागत होता, तो आता गॅसमुळे वाचतो. महिलांना आता या वेळेचा सदुपयोग करून आपले उत्पन्न वाढविण्यासाठी काहीतरी वेगळे काम करता येते किंवा कुटुंबाची देखभाल करण्यासाठी त्यांना वेळ मिळतो.



## बेटी बचाओ बेटी पढाओ (बीबीबीपी) योजना

22 जानेवारी, 2015 रोजी हरियाणातील पानिपत येथे सुरू करण्यात आलेल्या बेटी बचाओ बेटी पढाओ (बीबीबीपी) योजनेची आता दशकपूर्ती झाली आहे.

### जन्माच्या वेळी राष्ट्रीय स्तरावर लिंग गुणोत्तर

(प्रति 1000 मुली)



| 2014-15 | 2024-25 |
|---|---|
| 918 | 929 |

### माध्यमिक स्तरावर शाळेमध्ये दाखला असलेल्या मुलींचे गुणोत्तर

| | |
|---|---|
| 2014-15 | 75.51% |
| 2024-25 | 80.2% |



## प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान

**8,812** नोंदणीकृत स्वेच्छाकर्मी

**22,349** पीएमएसएमए सेवा प्रदान केल्या जाणा-या सुविधांची संख्या

## प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

या योजनेतून सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गर्भवती आणि बाळांना स्तनपान देणा-या मातांना पहिल्या अपत्याच्या जन्माच्या वेळी 5,000 रूपये (त्याचबरोबर जननी सुरक्षा योजना प्रोत्साहन म्हणून सरासरी 6,000रूपये ) आणि दुस-या अपत्याच्यावेळी (जर मुलगी झाली तर) 6,000 रूपये मातृत्व लाभ प्रदान केला जातो.



**4.28** कोटी महिलांना मिळाला लाभ

**4.92** कोटी महिलांनी केली नावनोंदणी

**20,150** कोटी रूपये एकूण निधीचे केले वितरण

## सुकन्या समृद्धी योजना
### बालिकांचे सशक्तीकरण

- 22 जानेवारी, 2015 रोजी सरकारने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेअंतर्गत सुकन्या समृद्धी योजना सुरू केली. त्यासाठी 8.2 टक्के व्याजदर ठेवण्यात आला आहे.
- 4.6 कोटींपेक्षा जास्त खाती उघडण्यात आली आहेत. योजनेच्या प्रारंभापासून ते आत्तापर्यंत 3.33लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त निधी जमा झाला आहे.

“

*आज विकसित भारताच्या आपल्या प्रवासामध्ये महिलांची भूमिका अधिक महत्वपूर्ण झाली आहे. मला आनंद वाटतो की, 2014 मध्ये, तुम्ही सर्व देशवासियांनी आम्हाला सेवा करण्याची संधी दिली आणि त्यावेळेपासून आत्तापर्यंत, आमच्या सरकारने महिलांच्या जीवनचक्रातील प्रत्येक टप्प्यासाठी योजना बनविल्या. त्या योजना यशस्वीतेने लागू केल्या.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**


# भारताचा झेंडा उंच फडकवणारे सारथी

*हाच काळ आहे, योग्य काळ आहे, भारताचा अमूल्य काळ आहे... युवा पिढीला समर्पित विकसित भारत, हा मंत्र या गोष्टीचा द्योतक आहे की, भारताच्या युवकांना आपल्या महत्वाकांक्षांना अधिकाधिक भरारी घेण्यासाठी सर्व सिद्धता केली जात आहे. हाच काळ आहे, भारत जगातील सर्वात तरुण देश आहे. म्हणूनच गेल्या 12 वर्षांत केंद्र सरकारच्या दुरदृष्टीमुळे युवा शक्तीच्या सामर्थ्याला नवीन ओळख मिळाली आहे. त्यामुळे भारताच्या ज्ञान-विज्ञान आणि कालजयी कामगिरीचे प्रतीक बनली आहे आजच्या नव्या भारताची अमृत पिढी....*

## स्टार्टअप

**2.23** लाखांपेक्षाही जास्त स्टार्टअप, 23.36 लाखांपेक्षा अधिक नोक-यांचे झाले सृजन. भांडवल, पत पुरवठ्यासाठी मदत आणि सार्वजनिक खरेदीमध्ये दिसून आली मजबूत वृद्धी.

- 2014 मध्ये भारतामध्ये फक्त 4 युनिकॉर्न होते. आज देशामध्ये 127 कार्यरत युनिकॉर्न आहेत.



**55,200** पेक्षा अधिक स्टार्टअप्सना आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये मान्यता देण्यात आली. सरकारने या उपक्रमाचा प्रारंभ केल्यानंतर एका वर्षामध्ये सर्वाधिक संख्येने मान्यता दिली.

## प्रधानमंत्री मुद्रा योजना (पीएमएमवाय)

**57.79**

- कोटी कर्ज प्रकरणांमध्ये 40.07 लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त निधीचे वितरण पीएमएमवाय मध्ये 11 वर्षांच्या कालावधीत करण्यात आले. त्यामुळे लघु आणि सूक्ष्म उद्योगांसाठी पतपुरवठा परिसंस्था मजबूत झाली.



- मुद्रा योजना गैर-कॉर्पोरेट आणि गैर-कृषी उत्पन्न निर्मिती क्रियाकलापांसाठी उपयुक्त ठरते. या अंतर्गत 20 लाख रूपयांपर्यंत विनातारण -विनाहमीचे संस्थात्मक कर्ज कोणत्याही प्रकारच्या अडथळ्याविना मिळणे सुगम झाले आहे.



## शिक्षण संस्थांची वाढली संख्या

2014 पासून ते आतापर्यंत

- 16 वरून 23 झाली आयआयटींची संख्या
- 13 वरून 21 झाली आयआयएमची संख्या




**23** झाली 7 वरून एम्सची संख्या

- 387 वरून 818 झाली वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या
- 2 आंतरराष्ट्रीय परिसर आयआयटीचे जंजीबार आणि आबुधाबीमध्ये

## प्रधानमंत्री कौशल विकास योजना (पीएमकेव्हीवाय)

**35** पेक्षा जास्त क्षेत्रांमध्ये एकूण 1.64 कोटी उमेदवारांना प्रधानमंत्री कौशल् विकास योजने अंतर्गत प्रशिक्षित करण्यात आले आहे.

**3,15,014**

उमेदवारांची निर्मिती, दूरसंचार, आरोग्य सेवा क्षेत्र आणि करिअर तसेच शिक्षण सल्लागार अशा पदांसाठी प्रशिक्षण दिले जात आहे.



मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची 12 वर्ष

## 12 वर्षांमध्ये युवकांना सशक्त बनविण्यासाठी पूर्ण निष्ठेने कार्य

**12** लाखांपेक्षा अधिक नोकऱ्या, रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून मिळाल्या.





**10,000** पेक्षा अधिक अटल टिंकरिंग प्रयोगशाळा विद्यालयांमध्ये निर्माण करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांचा लाभ 1.1 कोटींपेक्षा जास्त विद्यार्थी घेत आहेत.

- 3 दशकांनंतर लागू झाले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
- भारतामध्ये जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या आहे. यामध्ये जवळपास 65 टक्के लोक 35 वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत.
- नवी दिल्ली येथील भारत मंडपम् मध्ये 9 ते 12 जानेवारी, 2026 पर्यंत राष्ट्रीय युवा महोत्सवाचे (एनवायएफ) आयोजन
- पीएमश्री (उद्योन्मुख भारतासाठी पीएम शाळा) - एनईपी मॉडल संस्थेच्या स्वरूपामध्ये आधुनिक बनविण्यासाठी केंद्र सरकार प्रायोजित योजना
- 15 ऑगस्ट, 2025 रोजी प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना लागू करण्यात आली. या योजनेमुळे जवळपास साडे तीन कोटी नवयुवकांना रोजगाराच्या नवीन संधी मिळतील.

> *भारताच्या युवकांनी वैश्विक स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. आपली युवा शक्ती गतिशीलता, नवोपक्रम आणि दृढ संकल्प यांचे प्रतीक आहे. आमच्या युवकांनी अदम्य ऊर्जा आणि दृढ विश्वासाच्या जोरावर भारताला विकासाच्या मार्गावरून पुढे नेले आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## खेलो इंडिया

**27,500** पेक्षा जास्त खेळाडू घेत आहेत 'खेलो इंडिया' केंद्रांवर प्रशिक्षण.






## अग्निपथ योजना

- 15 जून 2022 रोजी सरकारने अग्निपथ योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पुरूष आणि महिला दोन्ही उमेदवारांना तिनही सेनेमध्ये 'अधिकारी श्रेणी'च्या खालच्या गटामध्ये चार वर्षांच्या काळासाठी 'अग्निवीर' या रूपामध्ये भर्ती केले जात आहे.

**17.5** ते 21 वर्षांपर्यंत युवकांना चार वर्षे सैन्य सेवेसाठी अग्निवीरच्या रूपामध्ये भर्ती करण्याचे लक्ष्य या कार्यक्रमामध्ये निश्चित केले आहे.

**46,000** च्या पहिल्या तुकडीने 2023 मध्ये आपले पहिले प्रशिक्षण पूर्ण केले. त्यांना शिस्त, नेतृत्व आणि तंत्रज्ञानातील कौशल्य याबरोबरच सेवा निधी पॅकेज आणि सेवेनंतर रोजगारामध्ये प्राधान्य मिळाले.



# वंचितांना प्राधान्य, सुशासनाची ओळख

*आज देशात सर्वांना समानतेने आणि कोणताही भेदभाव न करता योजनांचा लाभ देण्याची भावना ठेवून काम केले जात आहे. त्यामुळे गेल्या 12 वर्षांत सरकारी योजना आणि उपक्रमांचा फायदा घेणाऱ्या लोकांचा मोठा वर्ग निर्माण झाला आहे. 2014 पूर्वी, समाजातील एका मोठ्या वर्गाला मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले होते. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरुवातीलाच वंचितांना प्राधान्य देण्याचे तत्त्व स्वीकारून पुढे जाण्यास सुरुवात केली. अनेक दशके सरकारी योजना आणि सुविधांचा लाभ न मिळालेल्या अशा वंचितांपर्यंत, पहिल्यांदाच एखादे सरकार स्वतःहून पोहोचले. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की, ज्यांच्यापर्यंत कुणीही पोहोचले नाही, त्यांना मोदी पूजतो. सन्मानजन्य जीवनस्तर लाभल्यामुळे हे लोकही आता राष्ट्राच्या विकासात देत आहेत आपले योगदान...*

## आदिवासी वारशाला चालना



**728** एकलव्य मॉडेल निवासी शाळांना आदिवासी कार्य मंत्रालयाने मंजुरी दिली आहे, यापैकी 428 शाळांच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे, 249 बांधकामाधीन आहेत आणि 46 बांधकामपूर्व टप्प्यात आहेत.

- 2021 या वर्षामध्ये आदिवासी स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त 15 नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून घोषित करण्यात आला.



**11**

आदिवासी स्वातंत्र्यसैनिक संग्रहालयांना मंजुरी देण्यात आली आहे. आतापर्यंत 3 राज्यांमध्ये 4 संग्रहालये स्थापन झाली आहेत. यामध्ये झारखंडमध्ये 1, छत्तीसगडमध्ये 1 आणि मध्य प्रदेशमध्ये 2 संग्रहालयांचा समावेश आहे. उर्वरित 7 संग्रहालयांवर काम सुरू आहे.

## वंचितांना मिळत आहे सुविधांचा लाभ


- 13 मार्च 2024 रोजी पीएम मोदी यांनी सामाजिक उन्नती, रोजगार आणि लोककल्याण' (पीएम सूरज) या राष्ट्रीय पोर्टलचे अनावरण केले. हे पोर्टल वंचित घटकांना कर्ज साहाय्यासाठी प्राधान्य देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.



**1.15**

पुनर्रचित 'पीएम स्वनिधी' योजनेअंतर्गत 1.15 कोटी पदपथ - हातगाडीवर माल विक्रेत्यांना लाभान्वित करण्याचे लक्ष्य आहे. 74.90 लाख लाभार्थ्यांना कर्ज मिळाले आहे. कर्ज वितरणाचा कालावधी 31 मार्च, 2030 पर्यंत वाढवण्यात आला आहे.

- ठोस धोरणांच्या माध्यमातून 60 कोटींहून अधिक लोकांचा जीवनस्तर उंचावण्याचे आणि 25 कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याचे कामही झाले आहे.
- 31.65 कोटींहून अधिक ई-श्रम कार्ड जारी करण्यात आली आहेत. यामध्ये आतापर्यंत 14 सामाजिक योजनांचा समावेश करण्यात आला आहे.
- श्रम आणि रोजगार मंत्रालयाने 24 फेब्रुवारी 2025 रोजी अधिकृतपणे 'ई-श्रम मोबाईल ॲप्लिकेशन' सुरु केले.
- 2018 या वर्षा मध्ये 102 व्या घटनादुरुस्तीद्वारे मागासवर्गीय राष्ट्रीय आयोगाला घटनात्मक दर्जा देण्यात आला.
- आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 75 लाखाहून अधिक अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना 7,981.47 कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. यात प्रमुख शिष्यवृत्ती योजनांमध्ये उल्लेखनीय वाढ झाली आहे.
- केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 मध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी 'दिव्यांग कौशल्य योजना' आणि 'दिव्यांग सहारा योजना' जाहीर करण्यात आली.



## प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना

देशभरात 2.86 कोटी घरांचे विद्युतीकरण करण्यात आले. सर्व राज्यांनी 31 मार्च 2019 पूर्वी ओळख पटवलेल्या, वीजजोडणी नसलेल्या आणि वीज घेण्यास इच्छुक असलेल्या सर्व कुटुंबांच्या घरांना पूर्णपणे वीजपुरवठा उपलब्ध करून दिला.

## श्रम संहिता

वेतन संहिता 2019, औद्योगिक संबंध संहिता 2020, सामाजिक सुरक्षा संहिता 2020 आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची परिस्थिती संहिता 2020 या चार श्रम संहिता 21 नोव्हेंबर, 2025 पासून लागू करण्याची घोषणा. या संहिता विद्यमान 29 श्रम कायद्यांच्या जागी लागू करण्यात आल्या आहेत.





## प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेची कामगिरी

सुमारे 30 लाख कारागीर आणि शिल्पकारांची नोंदणी झाली आहे

**4,78,020**

लोकांना 41,188 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

**26,36,865**

कारागिरांचे मूलभूत प्रशिक्षण आणि कौशल्य प्रमाणीकरण देखील पूर्ण झाले आहे.

**23,69,249**

ई-व्हाऊचर जारी करण्यात आले आहेत.

## विकसित भारत-रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) (विकसित भारत जी राम जी) अधिनियम, 2025

- या योजनेत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला दर आर्थिक वर्षात किमान 125 दिवस मजुरीवर काम मिळण्याची हमी दिली जाते. पूर्वी ही हमी 100 दिवसांची होती.



"

*माझ्यासाठी जे गरीब आहेत, वंचित आहेत, ज्यांच्यासाठी सरकारी कार्यालयांचे दरवाजे बंद होते, ज्यांना कोणी विचारत नव्हते, त्यांना मोदी सर्वात आधी विचारतो. मोदी फक्त विचारतोच असे नाही, तर मोदी त्यांना पूजतो देखील. माझ्यासाठी तर देशातील प्रत्येक गरीब हा व्हीआयपी-खूप महत्त्वाची व्यक्ती आहे. देशातील प्रत्येक माता-भगिनी-कन्या माझ्यासाठी व्हीआयपी आहेत. देशातील प्रत्येक शेतकरी व्हीआयपी आहे. देशातील प्रत्येक तरुण व्हीआयपी आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




# आत्मनिर्भर भारताचा आधार

*कृषीक्षेत्रात स्वावलंबन हाच आत्मनिर्भर भारताचा मूळ आधार आहे. 'श्रीअन्न' ला जगात मानाचे स्थान मिळवून देणे असो, शेतकऱ्यांना खर्चाच्या दीडपट भाव मिळवून देण्यासाठी किमान आधार मूल्य वाढवणे असो किंवा शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे असो; हे केवळ आश्वासन नसून सरकारचा संकल्प आहे. गेल्या 12 वर्षांत शेतीचा विकास, एखाद्या उद्योगाप्रमाणे करण्याचे धोरण आणि त्यासाठी घेतलेल्या पुढाकारामुळे, शेतकऱ्यांच्या आर्थिक बळकटीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. ज्या क्षेत्रांसाठी आपण परदेशातून आयात केलेल्या वस्तूंवर अवलंबून होतो, ती क्षेत्रे ओळखून देश आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. यामुळे शेतकरी अधिक सक्षम होईल आणि देशाची समृद्धी वाढेल....*

## राष्ट्रीय कृषी बाजार (ई-एनएएम)

**1,656**

बाजारपेठांचे एकत्रीकरण मार्च 2026 पर्यंत 23 राज्ये आणि 4 केंद्रशासित प्रदेशांमध्ये करण्यात आले आहे.

यासोबतच, **1.80** कोटींहून अधिक शेतकरी, 2.73 लाख व्यापारी आणि 4,724 शेतकरी-उत्पादक संघटना ई-एनएएम मंचावर नोंदणीकृत झाल्या आहेत.

- 2016 ते मार्च 2026 दरम्यान 13.25 कोटी मेट्रिक टन व्यापाराची नोंद झाली. या व्यापाराचे एकूण मूल्य 4.84 लाख कोटी रुपये होते.
- व्यापाराचे मूल्य 2024 मधील 3.19 लाख कोटी रुपयांवरून वाढून 2026 मध्ये 4.84 लाख कोटी रुपये झाले आहे. या वाढीतून, व्यवसायाचा विस्तार आणि बाजारपेठेतील अधिक सक्रिय आणि मजबूत सहभाग दिसून येतो
- मार्च 2026 पर्यंत, 204.76 लाख मेट्रिक टन कृषी मालाचा व्यापार झाला. यातून व्यापारातील सातत्यपूर्ण वेग आणि सक्रियता दिसून येते.
- ई-एनएएम ॲपद्वारे मोबाईलवर उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या बाजारभाव माहिती सेवेत 247 वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे.





**श्रीअन्न :** 2018 मध्ये भरडधान्याचे (श्रीअन्न) महत्त्व अधोरेखित करत पीएम मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांत प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावानुसार 2023 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले.

- वर्ष 2024-25 मध्ये सुमारे 18.59 दशलक्ष टन उत्पादन झाले. यामुळे भरडधान्य उत्पादनात भारत जगात पहिल्या क्रमांकावर राहिला. यामध्ये राजस्थान, महाराष्ट्र आणि कर्नाटकचे प्रमुख योगदान राहिले.

## प्रधानमंत्री किसान मानधन योजना (पीएम-केएमवाय)

या अंतर्गत 2 फेब्रुवारी 2026 पर्यंत 24.95 लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, यामुळे लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना सामाजिक सुरक्षेचा लाभ मिळत आहे.



## पिक विमा संरक्षण

- प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत (पीएम एफबीवाय) वर्ष 2024-25 दरम्यान 4.19 कोटी शेतकऱ्यांचा विमा उतरवण्यात आला. यामध्ये 6.2 कोटी हेक्टर क्षेत्र समाविष्ट करण्यात आले.
- 2016-17 ते मार्च 2026 या कालावधीत पीक विमा दाव्यांपोटी 1.90 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली. तसेच या काळात पीक विम्यासाठी 86 कोटींपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले.
- 2022-23 च्या तुलनेत विमा संरक्षणाचा विस्तार 32 टक्क्यांनी वाढला आहे. त्यामुळे हवामानातील बदल आणि बाजारातील चढ-उतारांमुळे निर्माण होणाऱ्या जोखमींपासून अधिक मजबूत संरक्षण मिळत आहे.

## दोन महत्त्वाच्या नवीन योजनांची सुरुवात



- देशाची आत्मनिर्भरता आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 11 ऑक्टोबर 2025 रोजी दोन महत्त्वाच्या नवीन योजनांची सुरुवात केली.
- पहिली 'प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना' आणि दुसरी 'कडधान्य आत्मनिर्भरता मिशन'.

'प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजने'साठी **24,000** कोटी रुपये खर्चाची, तर 'कडधान्य आत्मनिर्भरता मिशन'साठी 1,440 कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे.

- या योजनांवर सरकार एकूण 35 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करणार आहे. या दोन योजना भारतातील कोट्यवधी शेतकऱ्यांचे नशीब बदलण्याचे काम करतील.



### किसान क्रेडिट कार्ड

31 डिसेंबर 2025 पर्यंत 7.57 कोटी शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून **10** लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम वितरित करण्यात आली आहे.

- शेतकऱ्यांना शेती आणि पशुपालनासारख्या गरजांसाठी किसान क्रेडिट कार्डद्वारे कमी व्याजदरात सहजरीत्या कर्ज मिळत आहे.

31 जानेवारी 2026 पर्यंत सहकारी संस्थांच्या सदस्यांना **1.55** कोटी 'रुपे केसीसी कार्ड' जारी करण्यात आली आहेत.





## 12 वर्षांतील कामगिरी

- गेल्या 12 वर्षांत, भारताची कृषी निर्यात जवळपास दुप्पट झाली असून उत्पादन सुमारे 900 लाख मेट्रिक टनाने वाढले आहे.
- फळे आणि भाज्यांचे उत्पादन 640 लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त वाढले आहे. आज भारत दूध उत्पादनात जगात पहिल्या क्रमांकावर आहे.
- भारत हा जगातील दुसरा मोठा मत्स्य उत्पादक देश बनला आहे. मध उत्पादनही 2014 च्या तुलनेत दुप्पट झाले आहे आणि गेल्या 12 वर्षांत अंडी उत्पादनही दुप्पट झाले आहे.
- या कालावधीत देशात 6 मोठे खत कारखाने उभारण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना 25 कोटींपेक्षा जास्त मृदा आरोग्य कार्ड्स मिळाल्या आहेत. 1 कोटी हेक्टर क्षेत्रातील जमिनीवर सूक्ष्म सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे.
- सूक्ष्म सिंचन सुविधा 9 कोटी हेक्टर जमिनीपर्यंत पोहोचली आहे.
- 'पीएम पीक विमा योजने'द्वारे शेतकऱ्यांना विम्याच्या दाव्यापोटी सुमारे दोन लाख कोटी रुपये मिळाले आहेत.
- 12 वर्षांत 10 हजारांपेक्षा जास्त शेतकरी उत्पादक संघटना (**FPOs**) स्थापन झाल्या आहेत.

## जागतिक कृषी बाजारपेठेत भारत

- कृषी निर्यातीतून मिळणारे उत्पन्न आर्थिक वर्ष 2020 मध्ये 34.5 अब्ज डॉलर्स होते, ते आर्थिक वर्ष 2025 मध्ये वाढून 51.1 अब्ज डॉलर्स झाले आहे.
- आर्थिक वर्ष 2025 मध्ये, प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांसह कृषी आणि अन्न उत्पादनांची निर्यात 49.43 अब्ज अमेरिकी डॉलर्स इतकी झाली. ही देशाच्या एकूण निर्यातीपैकी सुमारे 11.2 टक्के आहे.

12 वर्षांत कृषी आणि शेतकरी कल्याणावरील खर्चासाठीची आर्थिक तरतूद 6 पटीने (6X) वाढली




*स्वातंत्र्याच्या इतक्या दशकांनंतर आज देशात, शेतकऱ्यांचे दुःख आणि त्यांच्या चिंता समजून घेणारे असे सरकार आले आहे. म्हणूनच भारत सरकारद्वारे सातत्याने शेतकरी हिताचे निर्णय घेतले गेले आहेत. आम्ही बियाण्यापासून ते बाजारपेठेपर्यंत शेतकऱ्यांसाठी नवीन व्यवस्थांची निर्मिती केली आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




# राष्ट्र उभारणी

## 'विकसित भारत'चा संकल्प हीच 'राष्ट्रनीति'

*इंग्रजीत एक म्हण आहे की, 'size of the cake matters' म्हणजेच केक जेवढा मोठा असेल, तेवढाच त्याचा मोठा हिस्सा लोकांना मिळेल. याच विचारसरणीसह केंद्र सरकारने भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सची बनवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. देशाची अर्थव्यवस्था जितकी मोठी आणि मजबूत असेल, तितका पैसा, उद्योग, रोजगार आणि उत्पन्न वाढते. त्यामुळे देश अधिक समृद्ध होतो आणि लोकांचे जीवनमान सुधारते. हीच समृद्धी प्रत्येक कुटुंबाच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या उत्पन्नात आणि जीवनस्तरात बदल घडवून आणते. आज हाच भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रवासाचा पाया बनला आहे. त्याचप्रमाणे, पायाभूत सुविधा हा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा आधारस्तंभ असतो. पायाभूत सुविधा आणि विकासकामे यांमुळे केवळ उद्योग-उत्पादन आणि मालवाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक होत नाही, तर समाजातील एकात्मता आणि सलोखाही वाढतो. त्यामुळे आर्थिक विकासाला नवी गती आणि उंची मिळते. या विकासकथेला जेव्हा विज्ञान-तंत्रज्ञानाची जोड मिळते, तेव्हा 'व्यापारातील सुलभता' जनतेमध्ये विश्वास निर्माण करते आणि 'जीवन जगण्याची सुलभता' वाढवते. गेल्या 12 वर्षांच्या राष्ट्र उभारणीच्या प्रवासात आता 'अष्टलक्ष्मी' म्हणजेच ईशान्य भारत देखील विकासाचे एक महत्त्वाचे इंजिन बनला आहे. म्हणजेच, सर्वांगीण विकासाच्या विचारसरणीतून सामाजिक विकास आणि आर्थिक समतोलाच्या दिशेने पावले टाकली गेली आहेत, तर धोरणात्मक सुधारणांनी राष्ट्र उभारणीचा एक नवा अध्याय लिहून 'विकसित भारत'चा संकल्प सिद्ध करण्याचा मार्ग मोकळा केला आहे.*

# आर्थिक विकास

## अर्थव्यवस्थेची अमृत यात्रा

*सर्व क्षेत्रांचा आणि सर्व घटकांचा विचार करून विकास करण्याच्या दृष्टीने सामाजिक प्रगती आणि आर्थिक समतोल साधण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्याचबरोबर केलेल्या धोरणात्मक सुधारणांमुळे आर्थिक विकासाला नवी दिशा मिळाली. अर्थव्यवस्था आणि आर्थिक विषयांनाही जनतेशी अशा प्रकारे जोडले गेले की, प्रत्येक नागरिक यात स्वतःला सहभागी मानू लागला. आपल्यालाही कोणीतरी सांभाळणारे, आपली चिंता करणारे आहे, याची जाणीव त्यांना झाली. कर सुधारणा असोत की अर्थव्यवस्थेला दिशा देण्याचा पुढाकार, जीएसटी असो की 'टॅक्सपेयर चार्टर'ची फेसलेस व्यवस्था; या संरचनात्मक सुधारणांनी अर्थव्यवस्थेला एक नवीन दिशा दिली आहे आणि भारताच्या विकसित होत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेची एक नवीन कथा आता सुरू झाली आहे...*



### विकसित देशांसोबत मुक्त व्यापार करारांवर स्वाक्षरी

- भारताची अर्थव्यवस्था सातत्याने नवीन उंची गाठत आहे. परकीय व्यापार म्हणजेच निर्यातीमध्ये ती दररोज नवीन विक्रम प्रस्थापित करत आहे.
- आर्थिक विकासाच्या या तीव्र गतीमागील सर्वात मोठे कारण म्हणजे, गेल्या काही वर्षांत झालेल्या मुक्त व्यापार करारांमुळे जागतिक स्तरावर भारतीय बाजारपेठेचा झालेला विस्तार हे आहे.

भारताने 27 एप्रिल, 2026 रोजी न्यूझीलंडसोबत मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली, जो गेल्या काही वर्षांत विकसित **38** देशांसोबत झालेला भारताचा नववा करार आहे.

### विकास दराच्या गतीला मजबुती

**भारत 2025 या वर्षात जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला.**

2030 पर्यंत भारताचा स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) **7.3** ट्रिलियन अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.




- जागतिक व्यापार आणि धोरणात्मक अनिश्चिततेच्या काळातही मजबूत देशांतर्गत मागणीमुळे, आर्थिक वर्ष 2025-26 च्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा वास्तविक (रिअल) जीडीपी 8.2 टक्के दराने वाढला, जो 2024-25 च्या चौथ्या तिमाहीतील 7.4 टक्क्यांपेक्षा अधिक आहे. जगातील सर्व मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये हा दर सर्वाधिक आहे.
- औद्योगिक आणि सेवा क्षेत्रातील प्रगतीमुळे देशाच्या वस्तू आणि सेवांमधून निर्माण होणाऱ्या वास्तविक आर्थिक मूल्यात 8.1 टक्क्यांनी वाढ झाली आहे.

### जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था

- जागतिक बँकेचा अंदाज आहे की भारताची अर्थव्यवस्था 2026-27 मध्ये सुमारे 6.6% च्या दराने वाढेल. जगातील सर्वात वेगाने वाढणारी ही पहिली मोठी अर्थव्यवस्था असेल.

### वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलुक

- आउटलुक 2026 नुसार भारताचा विकास दर 6.5% राहण्याचा अंदाज आहे; तर विकसित देशांसाठी 1.8%, विकसनशील देशांसाठी 3.9% आणि संपूर्ण जगासाठी 3.1% चा अंदाज वर्तवण्यात आला आहे.
  - **अमेरिका:** 2.3% ▪ **जर्मनी:** 0.8% ▪ **ब्रिटेन:** 0.8%
  - **चीन:** 4.4% ▪ **ब्राझील:** 1.9% ठेवण्यात आला आहे.

# आत्मनिर्भरतेमुळे वाढती निर्यात

आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये भारताची माल आणि सेवा क्षेत्रातील एकूण निर्यात, विक्रमी 860.09 अब्ज अमेरिकी डॉलर्सवर पोहोचली. ही निर्यात, 2014 या वर्षा मध्ये 479 अब्ज डॉलर्स होती.




आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात **48** अब्ज डॉलर्स झाली, जी 2014-15 मध्ये केवळ 6.3 अब्ज डॉलर्स होती. हा सरासरी 20.3% वार्षिक वृद्धी दर आहे.


- आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये भारताची कृषी, फलोत्पादन आणि सागरी उत्पादनांची निर्यात 52.6 अब्ज डॉलर्स झाली, जी 2013-14 मध्ये 39.6 अब्ज डॉलर्स होती.

## मोबाईल फोन निर्यातीत 166 पट वाढ






## संरक्षण निर्यातीत 20 पट वाढ






## आर्थिक ताकद वाढवणारे सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग (एमएसएमई)



**7.47** कोटींहून अधिक एमएसएमई, उत्पादन, सेवा आणि व्यापारी उपक्रमांशी जोडले गेले आहेत.

**31.1%** योगदान भारताच्या जीडीपीमध्ये या क्षेत्राचे आहे.

**48.58%** वाटा या क्षेत्राचा देशाच्या एकूण निर्यातीत आहे.

**35.4%** वाटा एमएसएमईचा उत्पादन क्षेत्राच्या एकूण उत्पादनात आहे.

**32.8** कोटी लोकसंख्येला एमएसएमई क्षेत्र उदरनिर्वाह पुरवते.

## आकडेवारी... जी आहे मजबुतीची ओळख

आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये भारताचा जीडीपी, विद्यमान किमतींनुसार **357.14** लाख कोटी रुपये राहण्याचा अंदाज आहे.

मुंबई शेअर बाजाराचे मार्केट कॅपिटलायझेशन **484** लाख कोटी रुपये इतके झाले आहे, याचा अर्थ भारतीय शेअर बाजारातील सूचीबद्ध कंपन्यांचे एकत्रित बाजारमूल्य मोठ्या प्रमाणात वाढले आहे. (आकडेवारी 14 मे, 2026 पर्यंतची आहे.)

- उत्पादना नुसार प्रोत्साहन योजनेअंतर्गत मार्च 2026 पर्यंत 20.41 लाख कोटी रुपयांच्या विक्रीची नोंद झाली आहे.
- आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 135.4 अब्ज डॉलर्सचे रेमिटन्स प्राप्त करून भारत जगातील सर्वात मोठा रेमिटन्स मिळवणारा देश बनला आहे.
- अनुसूचित व्यावसायिक बँकांचे थकीत कर्जाचे प्रमाण (एन पी ए) मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. मार्च 2015 मध्ये एनपीएचे प्रमाण 4.28% (3.23 लाख कोटी रुपये) होते. डिसेंबर 2025 मध्ये ते कमी होऊन 1.89% (4.03 लाख कोटी रुपये) झाले. सद्यस्थितीतील एनपीए हा गेल्या अनेक दशकांतील सर्वात नीचांकी पातळीवर आहे.
- आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 22 लाख कोटी रुपये किंवा त्याहून अधिक विक्रमी जीएसटी संकलन झाले, जे भारताच्या मजबूत कर व्यवस्थेचे प्रमाण आहे.
- दिवाळखोरी आणि नादारी संहितेच्या (आयबीसी ) माध्यमातून सप्टेंबर 2025 पर्यंत कर्जदात्यांना 3.99 लाख कोटी रुपयांची रक्कम परत मिळवून देण्यात आली आहे.

# 701



**अब्ज डॉलर्सच्या**

**जवळ मार्च 2026 मधील परकीय चलन साठा पोहचला आहे जो 2025 मध्ये 668.3 अब्ज डॉलर्स एवढा होता**

## आता वाढेल खर्च करण्याची क्षमता


**12.75** लाख रुपयांपर्यंत

पगारदार व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न असल्यास नवीन कर व्यवस्थेअंतर्गत आता कोणताही आयकर भरावा लागणार नाही.



**सरकारवरील विश्वास वाढला...**

**आयकर परतावा विवरणपत्र दाखल करणाऱ्यांच्या संख्येत तिप्पट वाढ**







**28** लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त एकूण प्रत्यक्ष कर संकलन आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये राहिले.

- 'नेक्स्ट-जेन जीएसटी'मुळे कर प्रणाली अधिक सुलभ, डिजिटल आणि पारदर्शक झाली असून, त्यामुळे जीएसटीमध्ये नोंदणीकृत करदात्यांची संख्या वाढून सुमारे 1.5 कोटींवर पोहोचली आहे. याचाच परिणाम म्हणून एप्रिल 2025 मध्ये 2.36 लाख कोटी रुपयांचे जीएसटी संकलन झाले होते.

**2.43** लाख कोटी रुपयांचे विक्रमी जीएसटी संकलन एप्रिल 2026 मध्ये झाले.




# 10.9%

पर्यंत 2026-27 मध्ये भारताचा कर-महसूल (जीडीपीच्या प्रमाणात) पोहोचण्याचा अंदाज आहे. हा दर 2025-26 च्या 10.8% च्या सुधारित अंदाजापेक्षा थोडा अधिक आहे.

## विकास आणि समृद्धी वाढवणारे नवीन रोजगार


- भारतातील बेरोजगारीचा घसरता दर देशाच्या आर्थिक गतीची मजबुती दर्शवतो.
- 2025 चे नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण बेरोजगारीतील मोठी घसरण, तसेच कामगारांचा सहभाग आणि श्रमिक-लोकसंख्या गुणोत्तरात झालेली उल्लेखनीय सुधारणा दर्शवते.
- नोव्हेंबर 2025 मध्ये, 15 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींमधील बेरोजगारीचा दर घटून 4.8 टक्के झाला आहे, जो ऑक्टोबर 2025 मध्ये 5.4 टक्के होता.
- एप्रिल 2025 (5.1 टक्के) नंतरची ही सर्वात नीचांकी पातळी आहे.



# भारताचा पाया मजबूत करणाऱ्या आधुनिक पायाभूत सुविधा

*नव्या भारताची उभारणी, धडाडीच्या सुधारणा आणि अभूतपूर्व पायाभूत सुविधांमुळेच शक्य आहे. देशाच्या विकासात पायाभूत सुविधांना मुख्य प्राधान्य देण्यात आले असून,जलमार्ग, रस्ते आणि रेल्वे, विमानतळ आणि हवाई सेवा अशा प्रत्येक क्षेत्रात मोठ्या वेगाने आणि व्यापक प्रमाणावर काम सुरू आहे.भारताच्या प्रगतीचे आणि समृद्धीचे चिन्ह ठरलेले शेकडो पूल, संसदेची नवीन इमारत, भारत मंडपम, यशोभूमी यांसारख्या वास्तू आत्मनिर्भर भारताच्या मूलभूत विचारसरणीचे प्रतीक बनल्या आहेत. आता आपल्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर उभा असलेला भारत, पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करत भारताला विकसित आणि प्रगत राष्ट्र बनवण्याचे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करत आहे..*

### पायाभूत सुविधांवरील सरकारी खर्चात 12 वर्षांत 6 पटीने वाढ




## आधुनिक भारताला बळ देणारे 2,000 पायाभूत सुविधा प्रकल्प

**41.5**

लाख कोटी रुपयांच्या , 1900 पेक्षा जास्त पायाभूत सुविधा प्रकल्पांवर देशात काम सुरू आहे, मार्च 2026 मधील आकडेवारीनुसार. यातील प्रत्येक प्रकल्पाची किंमत 150 कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

- भारत सरकार 'पैमाना' या डिजिटल मंचाद्वारे केंद्र सरकारच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे नियमित निरीक्षण आणि नियंत्रण करत आहे. यामुळे, प्रकल्पांची प्रगती वेळोवेळी तपासता येते, अडचणी लवकर लक्षात येतात, आणि उपलब्ध आकडेवारीच्या आधारे अधिक अचूक आणि प्रभावी निर्णय घेणे शक्य होते.
- देशभरात सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर मार्च 2026 पर्यंत सुमारे 20 लाख कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.ही रक्कम त्या प्रकल्पांच्या सुधारित अंदाजित एकूण खर्चाच्या सुमारे 48.02% इतकी आहे. म्हणजेच, प्रकल्पांसाठी ठरवलेल्या एकूण खर्चापैकी जवळपास निम्मा खर्च आतापर्यंत झाला असून कामे प्रगतीपथावर आहेत.

**1,428**

प्रकल्प वाहतूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राशी (सर्वाधिक) संबंधित आहेत आणि त्यांच्यावर 22.66 लाख कोटी रुपये खर्च केले जात आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, देश दळणवळण-संपर्क आधारित पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देत आहे.

**777**

प्रकल्पांची प्रगती 80% पेक्षा जास्त झाली आहे.

**1,941**

निर्माणाधीन पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी 786 हे 'मेगा प्रोजेक्ट्स' आहेत, ज्यांची किंमत 1,000 कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे.

## आता प्रकल्प रखडत किंवा रेंगाळत नाहीत

- 'प्रगती' म्हणजेच 'प्रो-ॲक्टिव्ह गव्हर्नन्स अँड टाइमली इम्प्लीमेंटेशन' म्हणजेच सक्रिय प्रशासन आणि योजनांची/निर्णयांची वेळेत अंमलबजावणी, याची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2015 मध्ये केली होती. यामध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रकल्पांचे संनियंत्रण स्वतः त्यांच्या नेतृत्वाखाली केले जात आहे.
- यामुळे प्रकल्पांना होणारा उशीर कमी झाला असून खर्च वाढण्यासही पायबंद बसला आहे.


**85**

लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्य असलेल्या 382 हून अधिक प्रकल्पांचा आढावा 'प्रगती'च्या माध्यमातून घेण्यात आला आणि पंतप्रधान मोदींच्या निर्देशानुसार त्यातील अडचणी वेळेत दूर करण्यात आल्या.




मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची 12 वर्ष

## भारतात जगातील दुसरे सर्वात मोठे रस्त्यांचे जाळे




**3,052** किमी लांबीचे नियंत्रित राष्ट्रीय हायस्पीड कॉरिडॉर/एक्सप्रेस वे; 2014 मध्ये होती फक्त 93 किमी.

**22,223** किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गांचे बांधकाम भारतमाला कार्यक्रमांतर्गत फेब्रुवारी 2026 पर्यंत झाले; 26,425 किमीला मंजुरी मिळाली आहे.



## रेल्वे झाली स्वच्छ, सुरक्षित आणि वेगवान

- अर्थसंकल्पात रेल्वेला मिळणाऱ्या रकमेत नऊ पटीने वाढ. 2014-15 मध्ये ही रक्कम 32,000 कोटी रुपये होती तर; 2025-26 मध्ये 2.78 लाख कोटी रुपये मिळाले.

**1,338** स्थानकांचा अमृत भारत स्टेशन योजनेत पुनर्विकास केला जात आहे. 200 पेक्षा अधिक स्थानकांची कामे पूर्ण झाली आहेत. 119 स्थानकांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2025-26 मध्ये उद्घाटन केले.

**139**
टर्मिनल पीएम गतिशक्ती अंतर्गत सुरू झाले असून आणखी 300 ठिकाणी नवीन टर्मिनल विकसित करण्यास मंजुरी मिळाली आहे.

**162**
वंदे भारत रेल्वे सेवा सुरू, 4,500 गाड्यांच्या संचाचे लक्ष्य. 2030 पर्यंत 800 गाड्या धावतील.

- गुवाहाटी–हावडा (आसाम-पश्चिम बंगाल) मार्गावर जानेवारी 2026 मध्ये वंदे भारत स्लीपर सेवा सुरू झाली. वंदे भारत स्लीपरच्या 260 गाड्यांचा संच तयार करण्याची योजना आहे.
- 51 किमी लांबीचा बैराबी-सैरांग रेल्वे मार्ग पूर्ण झाल्यामुळे मिझोरम आता भारतीय रेल्वे जाळ्याशी जोडले गेले आहे.
- काश्मीर खोऱ्यात रेल्वेने मालवाहतूक आणि आर्थिक जोडणी मजबूत झाली. 22 जानेवारी 2026 रोजी 42 डब्यांची पहिली पूर्ण मालगाडी 2,768 मेट्रिक टन तांदूळ घेऊन अनंतनाग इथे पोहोचली.
- 7 नवीन अतिवेगवान रेल्वे मार्ग विकसित केले जाणार आहेत. सुमारे 4,000 किमी लांबीचे जाळे तयार होईल. 16 लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची अपेक्षा.

## सागरी पायाभूत सुविधांना बळ

*अधिसूचित राष्ट्रीय जलमार्ग*
2014 मध्ये 5 होते; 2026 मध्ये 111 झाले.

*भारतीय ध्वज असलेल्या जहाजांची संख्या*
2014 मध्ये 1,250 होती; 2026 मध्ये 1,593 झाली.

*प्रमुख बंदरांची क्षमता जवळपास दुप्पट*
2014 मध्ये 873 एमएमटीपीए होती; 2026 मध्ये 1,726 एमएमटीपीए झाली.



"आज देशात अतिशय वेगाने मेगा प्रकल्पांवर काम सुरू आहे. उत्तरेकडे जम्मू-कश्मीरमध्ये जगातील सर्वात उंच रेल्वे पुलांपैकी एक, चिनाब पूल तयार झाला आहे. पश्चिमेकडे मुंबईत देशातील सर्वात लांब समुद्री पूल अटल सेतू उभा राहिला आहे. पूर्वेकडे आसाममधील बोगीबील पूल दिसतो. दक्षिणेत जगातील मोजक्या उभ्या लिफ्ट पुलांपैकी एक, पंबन पूल बांधून पूर्ण झाला आहे. देशातील पहिल्या बुलेट ट्रेनवर वेगाने काम सुरू आहे.

**–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची
12 वर्ष



## मेट्रो रेल्वे नेटवर्क

**1,155**

किमी लांबीचे भारतात 2026 मध्ये मेट्रो जाळे आहेत; 2014 मध्ये त्याची लांबी 248 किमी होती.

- केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 मध्ये पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी आणि नगर आर्थिक क्षेत्रांसारखे नवीन उपाय सादर करण्यात आले, हे पायाभूत सुविधा आधारित विकास आणि संतुलित शहरी विकासाला बळकटी देतात.

- सरकारी मालमत्तेच्या मौद्रीकरणातून 1.5 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम प्राप्त झाली असून त्यातून नवीन प्रकल्पांमध्ये निधीचा प्रवाह पुन्हा सुरू झाला आहे. यामुळे जागतिक गुंतवणूकदार आकर्षित झाले आहेत.

## पायाभूत सुविधांमध्ये वाढलेली खासगी भागीदारी

जागतिक बँकेनुसार, भारत दक्षिण आशियात पायाभूत सुविधांमध्ये खासगी भागीदारी (पीपीआय) गुंतवणुकीचा सर्वात मोठा लाभार्थी ठरला आहे, जो या क्षेत्रातील एकूण गुंतवणुकीच्या 90% पेक्षा अधिक आहे.



## पायाभूत सुविधांवरील खर्चामुळे होते नोकऱ्यांमध्ये वाढ

- आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या मते, पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या सुमारे दर 8.3 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीमुळे 7 ते 30 नवीन नोकऱ्या निर्माण होतात. याचा थेट फायदा पोलाद, सिमेंट आणि वाहतूक क्षेत्रांना होतो, त्यामध्ये रोजगाराच्या नवीन संधी वेगाने वाढतात.

- पायाभूत सुविधांवर फक्त एका वर्षात 12 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च केल्यामुळे कोट्यवधी लोकांना रोजगार मिळतील. एका अंदाजानुसार फक्त बांधकाम क्षेत्रातून 2030 पर्यंत 10 कोटी लोकांना नोकरी मिळण्याची अपेक्षा आहे.

## ग्रामीण कनेक्टिव्हिटीत वाढ... प्रधान मंत्री ग्राम सडक योजना




**8.25**

लाख किलोमीटर लांबीच्या ग्रामीण रस्त्यांना 2025 च्या सुरुवातीपासून डिसेंबरपर्यंत मंजुरी मिळाली.

**7.87**

लाख किलोमीटर रस्ते डिसेंबर 2025 पर्यंत निर्माण झाले.

## पीएम गती शक्तीने पायाभूत प्रकल्पांना दिली गती

**16.10**

लाख कोटी रुपये

अंदाजित खर्चाच्या 352 पायाभूत सुविधा योजनांचे पीएम गती शक्ती राष्ट्रीय बृहत् आराखड्याच्या जाळे आखणी गटाने मूल्यांकन केले.

201 प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी 167 प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या टप्प्यात आहेत.



# विज्ञान, तंत्रज्ञान म्हणजे पारदर्शकता आणि परिवर्तनाचे युग

*शास्त्रांमध्ये म्हटले आहे — "ज्ञानम् विज्ञान सहितम् यत् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात्।" अर्थात ज्ञान विज्ञानाशी जोडले जाते, ज्ञान आणि विज्ञानाचा परिचय होतो तेव्हा जगातील सर्व समस्या आणि संकटांतून मुक्तीचा मार्ग आपोआप खुला होतो. उपाय, विकास आणि नवकल्पनांचा पाया विज्ञान आहे. याच प्रेरणेतून आजचा नवा भारत "जय जवान, जय किसान, जय विज्ञान" सोबत "जय संशोधन" असे आवाहन करत पुढे जात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान भारताच्या विकासाचे प्रमुख साधन बनले आहेत आणि लिहीत आहेत नव्या भारताची गाथा...*

## जागतिक विज्ञान व तंत्रज्ञान निर्देशांकात भारताची भरारी


***जागतिक नवोन्मेष निर्देशांक (जीआयआय) 2025***

भारताने जगातील सर्वोच्च नवोन्मेषी अर्थव्यवस्थांमध्ये 38वा क्रमांक मिळवला.

***डब्ल्यूआयपीओ अहवाल 2023***

भारत जगात बौद्धिक संपदा हक्कासाठी अर्ज करण्यात सहाव्या स्थानावर आहे.

***नेटवर्क रेडीनेस निर्देशांक (एनआरआय) 2024***




- एनआरआय हा जगातील 133 अर्थव्यवस्थांमध्ये माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानाचा वापर आणि परिणामाबाबत प्रमुख जागतिक निर्देशांकांपैकी एक आहे.
- संशोधन प्रकाशनांमध्ये भारत जगात तिसऱ्या स्थानावर आहे.


## गेल्या दशकातील बदल

- संशोधन व विकासावरील खर्च दुप्पट झाला आहे.
- मंजूर झालेल्या पेटंटची संख्या 1 लाखांवर गेली; 2014 मध्ये ती 5,978 होती. पेटंटच्या संख्येत 17 पट वाढ झाली.
- 2,00,000 पेक्षा अधिक स्टार्टअपसह भारत जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप व्यवस्था बनला आहे.

**6,000** पेक्षा अधिक डीप टेक स्टार्टअप्स स्वच्छ ऊर्जा, ॲडव्हान्स मटेरियल अशा क्षेत्रांत काम करत आहेत.

- भारताचे सेमीकंडक्टर क्षेत्रही झेप घेत आहे. सेमीकंडक्टर मिशन 2.0 सुरू होणार आहे.

**बायो-इकोनॉमी**




***राष्ट्रीय क्वांटम मिशन***

4 थिमॅटिक हब स्थापन करण्यात आली. त्यामध्ये 43 संस्थांचे 152 संशोधक आणि 17 प्रकल्पांवर कार्यरत संघ सहभागी आहेत.

- जगातील सर्वात पहिली आणि यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रणाली भारताकडे आहे. 2.18 लाख ग्रामपंचायती ऑप्टिकल फायबरने जोडून घेतल्या आहेत.
- भारत अंतराळ कार्यक्रमांतर्गत चंद्र आणि मंगळापर्यंत पोहोचला असून त्या तंत्रज्ञानाचे लाभार्थी म्हणून शेतकरी आणि मच्छीमारांनाही जोडून घेतले जात आहे.
- 5,000 पेक्षा जास्त पेटंटसाठीचे अर्ज दरवर्षी महिलांकडून केले जात आहेत.
- इन्स्पायर मानकाने देशभरातील स्टेम शिक्षणाला चालना दिली आहे. 2025-26 मध्ये शाळांकडून एकूण 11.47 लाख विचार आणि नवकल्पना गोळा केल्या आहेत. नामांकनात 52% मुली आहेत.
- 43% महिला स्टेम शिक्षणातील सहभागींमध्ये असून ही संख्या जागतिक सरासरीपेक्षा अधिक आहे.
- 10,000 टिंकरिंग प्रयोगशाळा उभारल्या असून त्यात 1 कोटीहून अधिक लहान मुले प्रयोग करत आहेत. या यशानंतर भारत आता आणखी 25 हजार अटल टिंकरिंग प्रयोगशाळा उभारण्याच्या दिशेने काम करत आहे.
- गेल्या काही वर्षांत 7 नवीन आयआयटी आणि 16 ट्रिपल-आयटी स्थापन केल्या आहेत.
- नवीन शिक्षण धोरणांतर्गत युवक आता विज्ञान आणि अभियांत्रिकीसारखे स्टेम अभ्यासक्रम आपापल्या स्थानिक भाषांमध्ये करू शकतात.
- आज किरकोळ व्यापारापासून लॉजिस्टिक्सपर्यंत, ग्राहक सेवांपासून मुलांच्या गृहपाठापर्यंत सर्वत्र एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर होत आहे. याच अनुषंगाने भारताने इंडिया एआय मिशनमध्ये 10,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक केली जात आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल तंत्रज्ञानाचा ज्या प्रकारे स्वीकार केला आहे तसा इतर कोणत्याही नेत्याने केलेला नाही. राजकारण आणि शिष्टाचारात त्यांनी याचा उपयोग केल्याचे अनेक पुरावे आहेत.**

## भारताची डिजिटल उंची

5G सेवा केवळ 22 महिन्यांत देशातील 99.6% जिल्ह्यांपर्यंत पोहोचली. जगातील सर्वात वेगवान अंमलबजावणीपैकी ही एक आहे.

आता देशातील **99.9%** जिल्ह्यांमध्ये 5G सेवा उपलब्ध आहेत.

- 5G मुळे भारतात नवीन तंत्रज्ञानांच्या वापरासाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत. यामुळे शेती, आरोग्य, शिक्षण, वाहतूक, स्मार्ट सिटी, उद्योग आणि आर्थिक सेवांमध्ये मोठे बदल होतील.
- इंटरनेट डेटाच्या किंमतीत 97.07% घट झाली असून सामान्य लोकांसाठी इंटरनेट स्वस्त आणि सुलभ झाले आहे.
- 6G तंत्रज्ञानात भारत जगातील अग्रगण्य देश बनेल. जागतिक 6G पेटंटमध्ये सुमारे 10% योगदानाचे लक्ष्य आहे. आतापर्यंत भारताने सुमारे 4,000 पेटंट दिली आहेत.

**7.22** लाख किमी ऑप्टिकल फायबर केबल भारतनेट योजनेअंतर्गत घालण्यात आली असून देशभरात इंटरनेट कनेक्टिव्हिटी मजबूत झाली आहे.

### भारतातील इंटरनेट जोडण्यांची संख्या

**102.9** कोटी (डिसेंबर 2025)

**25.5** कोटी (2014)

गेल्या 12 वर्षांत 300% पेक्षा अधिक वाढ झाली.

### या दरात मिळत आहे 1GB डेटा

**₹7.87** (डिसेंबर 2025)

**₹308** (2014)

- 127.33 कोटी मोबाइल वापरकर्ते फेब्रुवारी 2026 पर्यंत झाले. डिजिटल व्यवस्थेमुळे पैसे पाठवणे, सामान खरेदीचे पैसे चुकते करणे सोपे आणि वेगवान झाले.
- मोबाइल त्रि-शक्तीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट योग्य लोकांपर्यंत पोहोचत आहे. डुप्लिकेशन आणि फसवणुकीत घट झाली आहे.

## तंत्रज्ञानामुळे परत मिळाले चोरी झालेले मोबाईल



**10** लाख हरवलेले किंवा चोरी झालेले मोबाईल फोन संचार साथी ॲपमुळे परत मिळाले.

हा दूरसंचार साधनसंपत्तीच्या चुकीच्या वापराला रोखण्यासाठी तंत्रज्ञानाधारित उपाय आहे.

इथे संशयास्पद किंवा फसवणुकीच्या कॉल/मेसेजची तक्रार करू शकता, मोबाइल चोरीची नोंद करू शकता आणि मोबाइल फोन अस्सल की बनावट हेही तपासू शकता.

**2** कोटींपेक्षा अधिक वेळा ॲप डाउनलोड झाले.

**2,300** कोटी रुपयांपेक्षा जास्त फसवणुकीचे व्यवहार मे 2025 सुरुवात झाल्यापासून फायनांशियल फ्रॉड रिस्क इंडिकेटर (एफआरआय)च्या मदतीने रोखले गेले.

*जेव्हा विज्ञानाला प्रमाण मिळते, नवकल्पना सर्वसमावेशक बनते आणि तंत्रज्ञान परिवर्तन घडवते, तेव्हा मोठ्या यशाचा पाया मजबूत होतो. गेल्या 10-11 वर्षांतील भारताची वाटचाल याच दृष्टीकोनाचे उदाहरण आहे. भारत आता तंत्रज्ञानाचा फक्त ग्राहक नाही तर; तंत्रज्ञानाद्वारे परिवर्तनाचा अग्रदूत बनला आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# सुधारणांमुळे उद्योगांचा मार्ग सुलभ

*भारताला व्यवसाय आणि गुंतवणुकीसाठी अधिक आकर्षक करण्यासाठी भारत सरकार व्यापार सुधार कृती आराखडा तयार करून व्यापक सुधारणांची मालिका राबवत आहे. यामध्ये कामगार, पर्यावरण, भूमी प्रशासन आणि कर प्रणाली यांसह अनेक विषयांचा समावेश आहे. या सुधारणांमुळे देशात व्यवसाय स्थापन करण्यासाठी लागणारा वेळ आणि खर्च दोन्हीमध्ये मोठी घट झाली आहे. विद्यमान केंद्र सरकारला वाटते की अशा अनुकूल वातावरणामुळे भारतात वाढतील नवीन गुंतवणूक, नवीन व्यवसाय आणि नवीन रोजगार संधी...*

**भारत सरकार व्यवसाय करणे सुलभ व्हावे यासाठी व्यापार सुधार कृती योजने (बीआरएपी) अंतर्गत अनेक मोठ्या सुधारणा करत आहे.**

- बीआरएपीच्या 7 आवृत्त्यांमधून राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 9,700 पेक्षा अधिक सुधारणा केल्या आहेत.
- श्रम, पर्यावरण, जमीन आणि कराशी संबंधित नियम सुलभ केले आहेत.
- पर्यावरण मंजुरी आणि नोंदणी प्रक्रिया सोपी आणि डिजिटल झाली.
- जमिनीचा वापर बदलण्याची प्रक्रिया सुलभ आणि ऑनलाइन केली आहे.
- उद्योगांसाठी जमिनीची माहिती जीआयएस आणि भारत औद्योगिक जमीन बँकेशी जोडली आहे.
- इमारत बांधकाम नियमांमध्ये बदल करून जमिनीचा अपव्यय कमी करण्यात आला.
- इमारतींच्या मंजुरीसाठी तृतीय पक्ष म्हणजेच खासगी एजन्सींची मदत घेतली जात आहे.
- ऑक्युपेशन/कम्प्लिशन प्रमाणपत्र आता ऑनलाइन आणि सुलभ प्रक्रियेने मिळतात.
- अनेक कायद्यांमधील किरकोळ उल्लंघनांना गुन्हेगारी श्रेणीतून वगळले.
- 32 केंद्रीय मंत्रालये/विभाग आणि 33 राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना राष्ट्रीय एक खिडकी प्रणाली (एनएसडब्ल्यूएस)सह जोडले आहे. यामुळे सरकार आणि व्यापारातील मंजुरी प्रक्रिया सुलभ आणि डिजिटल झाली आहे.
- 3,000 पेक्षा अधिक व्यापाराबाबत मंजुरी एनएसडब्ल्यूएसच्या माध्यमातून राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश सरकारांनी सहजसाध्य केल्या आहेत. केंद्रीय विभागांच्या 300 पेक्षा अधिक मंजुरीही यामध्ये जोडून घेतल्या आहेत.



## नियामक अनुपालन भार (आरसीबी) पुढाकार

*भारत सरकारने 2020 मध्ये नियामक अनुपालन भार (आरसीबी) उपक्रम सुरू केला. 2025 पर्यंत केंद्र सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांनी व्यवसाय आणि नागरिकांसाठी भार ठरणारी 47,000 अनुपालने ओळखून त्यांची संख्या कमी केली.*

आरसीबी+ उपक्रमांतर्गत राज्ये, केंद्रशासित प्रदेशांकडून सामान्यतः लागू होणाऱ्या 23 कायद्यांमधील, ओळखलेल्या 6,262 अनुपालनांपैकी 4,846 अनुपालने कमी केली आहे.

**विनियामक अनुपालन बोझ**

**16,109**
अनुपालनांमध्ये सुलभता आणली.

**1500**
पेक्षा अधिक जुने कायदे रद्द केले.

**4,623**
अनुपालनांना गुन्हेगारी श्रेणीतून वगळले.

**4,270**
अनावश्यक आणि पुनरावृत्ती असलेली अनुपालने समाप्त.

**22,287**
अनुपालनांचे डिजिटलीकरण झाले.

**सुधारणा उपक्रमाची सुरुवात जन विश्वास (तरतुदी दुरुस्ती) अधिनियम, 2023 पासून झाली. या विधेयकाद्वारे 42 केंद्रीय कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या.**

**183** तरतुदींना फौजदारी गुन्ह्यांच्या श्रेणीतून वगळून कारावासाऐवजी आर्थिक दंड आणि इतर प्रशासकीय अंमलबजावणी यंत्रणा लागू करण्यात आल्या.



## जन विश्वास कायद्यांमुळे व्यापार सुलभ


जन विश्वास (तरतुदी दुरुस्ती) विधेयक, 2026

**23** मंत्रालयांच्या 79 केंद्रीय कायद्यांमधील 784 तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आल्या.



- **317** तरतुदींमध्ये दंडाचे स्वरुप बदलून नागरी दंड करण्यात आले.
- **158** तरतुदींमधील दंड पूर्णपणे काढून टाकण्यात आला.
- **113** तरतुदींमध्ये तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा हटवून नागरी दंड लागू करण्यात आला.
- **57** तरतुदींमध्ये तुरुंगवास आणि दंड दोन्ही वगळले.
- **63** तरतुदींमध्ये पहिल्या चुकीसाठी इशारा/नोटिशीची तरतूद लागू करण्यात आली.
- **17** तरतुदींमध्ये तुरुंगवासाची शिक्षा कमी करण्यात आली आणि 29 तरतुदींमधून ती पूर्णपणे वगळली.
- **17** तरतुदींमध्ये सामंजस्याने प्रकरण निकाली काढण्याची सुविधा सुरू करण्यात आली.
- **9** इतर तरतुदींमध्ये कारावासाचे नागरी दंडात रूपांतर किंवा तुरुंगवास तर्कसंगत करण्यात आला; गुन्ह्यांची व्याप्ती मर्यादित करण्यात आली.

### जागतिक बँकेचे 'व्यवसाय सुलभता मानांकन 2020'




सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग (एमएसएमई)ची व्याख्या बदलली. एमएसएमईची कर्जे बाह्य बेंचमार्कशी जोडून घेतली. सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी 10 लाख रुपयांपर्यंत विनातारण कर्ज उपलब्ध आहे. एमएसएमई साठी कार्यशील भांडवलाच्या गरजांनुसार 5 कोटी रुपयांपर्यंतच्या कर्ज मर्यादेचे वार्षिक उलाढालीच्या किमान 20% असे निर्धारण करण्यात आले.



> *भारताने गेल्या दशकात प्रशासकीय संस्कृतीत बदल अनुभवले आहेत. निर्णय वेळेवर घेतले जातात, समन्वय परिणामकारक होतो आणि जबाबदारी निश्चित होते तेव्हा सरकारच्या कामकाजाचा वेग स्वाभाविकच वाढतो. याचा थेट परिणाम नागरिकांच्या जीवनात दिसू लागतो.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# जीवन सुलभता

# क्रांतिकारक बदल

*जीवन सुलभता म्हणजे जगण्यातील सुलभता हा प्रत्येकाचा अधिकार आहे. नव्या भारताच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या या विचाराचा अर्थ केवळ विशिष्ट वर्ग नव्हे तर; ग्रामीण, गरीब, आदिवासी आणि मध्यमवर्गीयांचे जीवन सुलभ करणे हा आहे. केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षांत केवळ राष्ट्राची मोठी स्वप्ने पाहिली नाहीत तर; गरीबीतून बाहेर पडून मध्यम वर्गात येण्यासाठी मदत करणारे आणि सुविधा वाढवणारे कार्यक्रम परिपूर्णतेपर्यंत पोहोचवण्याच्या दिशेने वेगाने काम केले. त्यामुळे जीवन सुलभता हा आता फक्त शब्द राहिलेला नसून बनला आहे सरकारचा मंत्र...*

- जीएसटी कर व्यवस्थेत भविष्यवेधी सुधारणा हे, करप्रणाली सुलभ करण्यासाठी नागरिकांवरील भार कमी करण्यासाठी आणि व्यवसाय सुलभतेत भर घालण्याच्या दिशेने निर्णायक पाऊल आहे. सामान्य नागरिकांची आता विविध करांच्या गुंतागुंतीतून सुटका झाली आहे.
- जीवन सुलभतेत भर घालण्यासाठी वचनबद्ध सरकारने दिल्ली, राष्ट्रीय राजधानी प्रदेशासह देशभरात महामार्ग, रेल्वे, बंदरे आणि हवाई मार्गांची उपलब्धता वाढवली. यामुळे प्रवास अधिक सुलभ झाला.
- जीवन सुलभता निर्देशांक 2025 मध्ये पुणे, नवी मुंबई, बृहन्मुंबई, तिरुपती आणि चंदीगड यांचा 5 उत्तम शहरांमध्ये समावेश आहे.
- सरकारने आयकर अधिनियम 1961 चे व्यापक पुनर्गठन करून नवीन आयकर अधिनियम 2025 लागू केला. कर कायदे अधिक सुलभ आणि पारदर्शक केल्यामुळे ते अधिक सुगम झाले आहेत. अनुपालन सोपे झाल्यामुळे सामान्य जनतेचे जीवनही सुलभ झाले आहे.
- पर्यटकांचा प्रवास सुरक्षित आणि सोयीस्कर करण्यासाठी 1800111363 आणि 1363 हे टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक सुरू केले आहेत. 10 आंतरराष्ट्रीय भाषांसह 12 भाषांमध्ये 24 तास ही सेवा उपलब्ध आहे.
- कामगार कल्याण आणि श्रमिकांचे जीवन सुलभ करण्यासाठी 29 जुने कायदे रद्द करून 4 श्रम संहिता लागू केल्या आहेत.





**12.61 कोटी**

अतिरिक्त ग्रामीण कुटुंबांना 13 मे 2026 पर्यंत नळाची जोडणी दिली. आता 15.85 कोटी कुटुंबांना घरात पिण्याचे पाणी मिळू लागले आहे.



**58.18**

कोटी जनधन खाती उघडली गेली. त्यामुळे बँकिंग आणि सरकारी अनुदानाचा लाभ मिळवणे अधिक सुलभ झाला.

1.90 कोटी डिजिटल जीवन प्रमाणपत्रे 1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 या काळात घरबसल्या जमा केली. डिजिटल जीवन प्रमाणपत्रांच्या सुविधेमुळे ज्येष्ठ नागरिकांचे जीवन अधिक सुलभ झाले आहे.

**₹12 लाख**

रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर नवीन कर प्रणाली अंतर्गत कोणताही आयकर नाही.




**₹75,000**

रुपये मानक कपात पगारदार करदात्यांसाठी अतिरिक्त आहे.




आयकर परतावा भरणाऱ्यांची संख्या




**₹314 लाख कोटी**

रुपयांपेक्षा अधिक व्यवहार 2025-26 मध्ये यूपीआय मार्फत झाले. गेल्या 10 वर्षांत ही 12 हजार पट वाढ आहे.

जागतिक स्तरावर रियल टाईम पेमेंटमध्ये भारतीय यूपीआयचा **49%** हिस्सा

700 पेक्षा अधिक बँका जोडल्या आहेत. आजघडीला सुमारे 54 कोटी लोक यूपीआयचा वापर करत आहेत.

# सुविधा ज्यांमुळे जीवन सुलभ झाले

“

*जीवन सुलभता हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. आमचे प्रशासन असे असावे की देशातील नागरिकांची जीवन सुलभता आणि जीवनमानाचा दर्जा दिवसेंदिवस अधिक चांगला व्हावा, हेच आमच्यासमोरील आव्हान आहे. मी पूर्ण विश्वासाने सांगतो की भारतात राहण्यासाठी हा सर्वोत्तम काळ आहे. आजच्या भारतात व्यवसाय करणे आणि लोकांचे जीवन दोन्ही अधिक सुलभ होत आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**





**1.15** कोटी लोकांचे दैनंदिन जीवन सुलभ करत आहे मेट्रो रेल्वे


**1155** किलोमीटर लांबीचे जाळे देशातील 26 शहरांमध्ये पसरले आहे.




- 4 कोटींहून अधिक घरांचे वितरण प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत झाले. त्यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागात सर्व ऋतूंमध्ये राहणे सुलभ झाले.
- 10.56 कोटी घरगुती गॅस जोडण्या उज्ज्वला योजनेअंतर्गत दिल्या. धुरामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कमी झाले आणि वेळेचीही बचत झाली. लाकूड किंवा गोवऱ्या आणण्यासाठी लागणारा अतिरिक्त वेळ वाचला.
- 9.3 कोटी प्रवाशांनी विमानतळांवर डिजीयात्रा सुविधेचा लाभ घेतला. 38 विमानतळांवर डिजीयात्रा सुविधा उपलब्ध आहे.
- 5.87 लाख नागरिक सेवा केंद्रे देशात डिसेंबर 2025 पर्यंत कार्यरत झाली. त्यांमध्ये 800 पेक्षा अधिक सेवा उपलब्ध आहेत. घराजवळ डिजिटल सेवांची उपलब्धता झाल्याने जीवन सुलभ झाले.
- 102.86 कोटी संख्या आहे डिसेंबर 2025 मध्ये इंटरनेट वापरकर्त्यांची; 2014 मध्ये ती फक्त 25 कोटी होती, म्हणजेच 300% पेक्षा अधिक वाढ. इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येच्या बाबतीत भारताचा जगातील पहिल्या तीन देशांमध्ये समावेश होतो.
- 25 **GB** डेटा दरमहा सरासरी प्रत्येक वायरलेस डेटा ग्राहक वापरतो तर; उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये तो 17.9 **GB** आहे. प्रति **GB** डेटाचा दर 2014 मधील 308 रुपयांवरून 7.87 रुपये इतका खाली आला आहे. परवडणाऱ्या डेटामुळे डिजिटल सेवांचा वापर शक्य होऊन जीवन सुलभ झाले.

**1.64** कोटींहून अधिक प्रवाशांनी उड्डाण योजनेचा लाभ घेतला आहे.

**665** हवाई मार्गांनी 95 विमानतळ, हेलिपोर्ट आणि वॉटर एअरोड्रोम जोडले आहेत.




विमानतळांची संख्या



# नव्या भारताच्या शांतता आणि समृद्धीची ताकद 'अष्टलक्ष्मी'

*अष्टलक्ष्मी म्हणजे ईशान्य भारतातील आठ राज्ये आत्मविश्वासाने भरलेली आहेत. ती नव्या दिशेने पुढे जात असून राष्ट्राच्या विकास यात्रेचे नेतृत्व करण्यास सज्ज आहेत. कधीकाळी हिंसा आणि नाकाबंदीमुळे ओळखला जाणारा 5 कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या असलेला हा प्रदेश आता विकास यात्रेवर निघाला असून सर्वांगीण विकासाचा साक्षीदार बनत आहे. गेल्या 12 वर्षांतील या नव्या विकास प्रवाहाने सिद्ध केले आहे की ईशान्य भारत आता देशाचे शेवटचा टोक नसून सुरक्षा आणि समृद्धीचे प्रवेशद्वार आहे; जे ना दिल्लीपासून दूर आहे, ना राजधानीच्या हृदयापासून...*

## ईशान्येकडे विशेष लक्ष, दिल्लीसह वाढला संपर्क

- गेल्या 12 वर्षांत केंद्र सरकारने ईशान्य भारताशी थेट संबंध वाढवले आहेत. पंतप्रधान, त्यांचे मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी नियमितपणे ईशान्येकडील राज्यांना भेटी देत आहेत.
- सरकारने ठरवले आहे की दर 15 दिवसांत एक केंद्रीय मंत्री कोणत्यातरी ईशान्य राज्याला भेट देईल.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईशान्येकडील राज्यांना 83 वेळा भेट दिली आहे तर; जानेवारी 2015 ते डिसेंबर 2025 दरम्यान केंद्रीय मंत्र्यांनी 880 वेळा ईशान्य भारतात दौरे केले आहेत.



## 10% अर्थसंकल्पीय सहाय्य

या व्यवस्थेनुसार 55 मंत्रालये/विभाग आपल्या अर्थसंकल्पातील किमान 10% रक्कम ईशान्य भारताच्या विकासासाठी खर्च करतात. या प्रयत्नांमुळे ईशान्य प्रदेशाचा विकास वेगाने होत आहे.



## अर्थसंकल्पीय खर्चात ऐतिहासिक वाढ

| | |
|---|---|
| 2014–15 | ₹ 24,819 कोटी |
| 2025–26 | ₹ 1,00,271 कोटी |



## गेल्या 12 वर्षांत ईशान्य भारताला भरपूर निधी मिळाला

| एकूण अर्थसंकल्पीय वाटा | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|
| 6.97 लाख कोटी रुपये | 7.12 लाख कोटी रुपये |



## ईशान्य प्रदेशात सातत्याने होत आहेत विकासाची कामे

ईशान्य प्रदेश विकास मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत ईशान्य भारतासाठी

**3,735** प्रकल्पांना मंजुरी दिली आहे.

**49,907** कोटी रुपये हा या प्रकल्पांचा एकूण खर्च आहे.



## विकास प्रकल्पांमध्ये प्रचंड गुंतवणूक, विस्तारले दळणवळणाचे जाळे...

- बोगीबील पूल : 2018 मध्ये उद्घाटन (घोषणा 16 वर्षांपूर्वी झाली होती).
- गेल्या 12 वर्षांत आठ नवीन हरितक्षेत्र विमानतळही बांधण्यात आले आहेत. कार्यरत विमानतळांची संख्या 2014 मध्ये 9 होती ती 2026 मध्ये 17 झाली.
- ईशान्य विभागातील राष्ट्रीय महामार्गांची लांबी 2014 मध्ये 10,905 किमी होती ती 1 एप्रिल 2025 पर्यंत 16,207 किमी झाली आहे. 87 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या 3,634 किमी लांबीच्या 177 रस्ते प्रकल्पांची विविध टप्प्यांमध्ये अंमलबजावणी सुरू आहे.
- NESIDS योजनेअंतर्गत 72 प्रकल्प पूर्ण. 997.55 किमी रस्ते तयार. सध्या 911 प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर.

### प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

**89,503** किमी लांबीचे 17.666 रस्ते आणि 2.396 पुलांना मंजुरी दिली गेली.

यापैकी **81,448** किमी लांबीचे 16,547 रस्ते आणि 2,126 पूल तयार झाले आहेत.

**53,353.49** कोटी रुपये खर्च झाले आहेत.



> *ईशान्य भारत हा केवळ देशाचा एक महत्त्वाचा भागच नाही तर ती भारताची 'अष्टलक्ष्मी' सुद्धा आहे. त्यामुळे आम्ही 'ॲक्ट ईस्ट' धोरणावर तर काम करत आहोतच, शिवाय आम्ही ईशान्य भारतासाठी 'ॲक्ट फास्ट'चाही संकल्पही केला आहे.*
>
> **नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच

**2022** मध्ये मणिपूरला पहिली मालगाडी पोहोचली.

**2023** मध्ये मेघालयात पहिली मालगाडी पोहोचली.

**2025** मध्ये मिजोरमला पहिली रेल्वेगाडी पोहोचली.






मुखपृष्ठ कथा
विकास यात्रेची
12 वर्ष

# राष्ट्र प्रथम

## सशक्त, समृद्ध, सुरक्षित भारत

**राष्ट्ररक्षासमं पुण्यं, राष्ट्ररक्षासमं व्रतम्। राष्ट्ररक्षासमं यज्ञो, दृष्टो नैव च नैव च।।**

*अर्थात राष्ट्ररक्षणापेक्षा मोठे कोणतेही पुण्य नाही, व्रत नाही आणि कोणता यज्ञ नाही.*

*सात शेजारी देशांसोबतच्या 15 हजार किलोमीटर लांबीच्या सीमेच्या आणि साडेसात हजार किलोमीटरहून अधिक लांबीच्या सागरी सीमेच्या सुरक्षेसाठी 'राष्ट्र प्रथम' या धोरणासह भारत आज आपले प्रभावी परराष्ट्र धोरण राबवत आहे आणि संरक्षण क्षेत्रातही आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करत आहे. केंद्र सरकार दहशतवादाविरोधातील शून्य सहनशीलतेच्या धोरणासाठी केवळ दृढनिश्चयीच नाही, तर वचनबद्धही आहे. उरी येथील लष्करी छावणीवरील दहशतवादी हल्ल्यानंतर तसेच पुलवामा येथील सीआरपीएफच्या ताफ्यावर झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर जगाने ही वचनबद्धता पाहिली आहे. गेल्याच वर्षी 6-7 मे 2025 च्या मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर'ने जगाला हा संदेश दिला की भारताला युद्ध नको आहे, पण दहशतवाद अजिबात सहन केला जाणार नाही. कोणत्याही राष्ट्रासाठी एक मजबूत लष्करी शक्ती आवश्यक असते, परंतु महासत्ता बनण्यासाठी युद्ध किंवा लष्कर हाच एकमेव मार्ग नाही. गेल्या 12 वर्षांत योगविद्येने जागतिक स्तरावर स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे प्रत्येक संकटात आपल्या तसेच जगातील इतर लोकांसाठी मदतदाता म्हणून उदयास येण्यापासून ते कोविडसारख्या जागतिक आपत्तीला संधीमध्ये बदलून जगासमोर एक आदर्श ठेवण्यापर्यंत किंवा संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेची नवी क्रांती सुरू करण्यापर्यंत भारत एक 'सॉफ्ट पॉवर' म्हणूनही आपली नवी ओळख घडवत आहे.*


# विकास, विश्वास आणि आत्मनिर्भरतेची नवी भरारी

*भारत आज आत्मनिर्भरता, नवोन्मेष आणि सर्वसमावेशक विकासाची नवी उंची गाठत आहे. डिजिटल क्रांती, पायाभूत सुविधांचा विस्तार, महिला सक्षमीकरण आणि युवा नेतृत्वाने देशाला जागतिक स्तरावर एक भक्कम स्थान मिळवून दिले आहे. 'सशक्त भारत' हे केवळ एक स्वप्न नसून, लाखो भारतीयांच्या सामूहिक प्रयत्नांचे आणि दृढनिश्चयाचे ते एक जिवंत उदाहरण आहे. हे स्वप्न विकास आणि विश्वासाची नवी गाथा लिहित आहे...*


## सशक्त भारताची महत्त्वाची तथ्ये...

- भारत 2018 पासून जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पोलाद उत्पादक देश राहिला आहे. 2014 मध्ये जागतिक उत्पादनातील भारताचा वाटा 5.2% होता. 2024 पर्यंत तो 7.9% झाला.
- फार्मेसी ऑफ वर्ल्ड : आज भारत उत्पादनानुसार जगातील तिसरा आणि मूल्यानुसार 11वा सर्वात मोठा औषधनिर्माण करणारा देश आहे. या क्षेत्राने 2024-25 या आर्थिक वर्षात 4.72 लाख कोटींची वार्षिक उलाढाल नोंदवली.
- यापूर्वी सुमारे 65-70% संरक्षण उपकरणे आयात केली जात असत, त्या तुलनेत आता सुमारे 65% उपकरणे देशातच तयार केली जातात.
- भारत आज जगाला लागणाऱ्या जेनेरिक औषधांपैकी एक-पंचमांश आणि युनिसेफला लागणाऱ्या लसींपैकी निम्म्याहून अधिक लसींचा पुरवठा करतो.
- 'शक्ती' उपक्रम, वैद्यकीय पर्यटन आणि दर्जेदार औषधांच्या निर्यातीच्या माध्यमातून भारत 300 अब्ज डॉलर्सची जैवऔषध महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे.
- गेल्या काही वर्षांत भारताने 38 देशांसोबत नऊ करार करून आपल्या मुक्त व्यापार करारांच्या (एफटीए) जाळ्याचा विस्तार केला आहे.
- भारताने प्रथमच अवकाश प्रणाली आणि संचालनाशी संबंधित आयएसओच्या (**ISO**) आंतरराष्ट्रीय उपसमितीच्या बैठकांचे यजमानपद भूषविले.


### संरक्षण निर्यातीत वाढ
(आकडे कोटी रुपयांत )





### संरक्षण उत्पादन
(आकडे लाख कोटी रुपयांत)




### भारतीय सेमीकंडक्टरचा वाढता बाजार
(आकडे अब्ज डॉलर मध्ये)




### भारताची एकूण निर्यात
(आकडे अब्ज डॉलर मध्ये)




### अवकाश क्षेत्रात भारत

**नोंदणीकृत स्टार्टअप**

1 — 2014

400 हून अधिक — आता

**परदेशी उपग्रह**

- इस्रोने प्रक्षेपित केलेल्या 434 परदेशी उपग्रहांपैकी 399 उपग्रह 2014 पासून प्रक्षेपित करण्यात आले आहेत. या प्रक्षेपणांमुळे भारताला अंदाजे 323 दशलक्ष युरो आणि 233 दशलक्ष डॉलर्सचा महसूल मिळाला आहे.
- सुमारे 8.4 अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे भारताची अवकाश अर्थव्यवस्था



### भारतातील रस्त्यांचे जाळे जगात दुसऱ्या क्रमांकाचे

राष्ट्रीय महामार्ग जाळ्याचा विस्तार

मार्च, 2014 — 91,287 किमी

फेब्रुवारी, 2026 — 1,46,572 किमी


### जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था

जागतिक बँकेच्या अंदाजानुसार...
भारताची अर्थव्यवस्था 2026-27 मध्ये अंदाजे 6.6% दराने वाढेल. ती जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असेल.

वर्ल्ड इकोनॉमिक आउटलुक 2006 नुसार, भारताचा विकास दर 6.5% असण्याचा अंदाज आहे, तर विकसित देशांसाठी तो 1.8%, विकसनशील देशांसाठी 3.9% आणि संपूर्ण जगासाठी 3.1% आहे.

## भारत जागतिक इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील ऊर्जा केंद्र

(आकडे लाख कोटी रुपयांमध्ये)




## बलवान भारताची ओळख

### *एआयमध्ये बलवान भारत*

एआय इम्पॅक्ट समिटमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी भाषण करतात आणि पडद्यामागे, एआयचा वापर करून दिव्यांग व्यक्तींसाठी त्याचे त्वरित सांकेतिक भाषेत भाषांतर केले जाते.

### *धाडसी निर्णयांचा बलवान भारत*

काश्मीरमध्ये अनेक दशकांपासून चालत आलेल्या 'एक संविधान, एक कायदा' धोरणाच्या अंमलबजावणीत अडथळा ठरलेले कलम 370 रद्द करण्यात आले. आता काश्मीरमध्ये लागू होणारे सर्व कायदे इतर राज्यांप्रमाणेच आहेत.

### *महिला नेतृत्वासह बलवान भारत*



लोकसभा आणि विधानसभेतील 33 टक्के महिला आरक्षणाचा तीन दशके जुना अडथळा दूर सारून नारी शक्ती वंदन कायदा अधिसूचित करण्यात आला. 1996 पासून यासाठी प्रयत्न सुरू होते, परंतु नारी शक्ती वंदन कायदा, 2023 नवीन संसद भवनात मंजूर करण्यात आला.

### *अंतराळातील बलवान भारत*

भारत आता चंद्रापर्यंत पोहोचला आहे आणि तेही चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर जिथे यापूर्वी जगातील कोणताही देश पोहोचला नव्हता.

### *वसाहतवादाचा अंत करणारा बलवान भारत*

पंचामृताचे आवाहन देशातील वसाहतवादाच्या आठवणी पुसून टाकत आहे. आपल्या वारशाचा अभिमान बाळगताना कर्तव्य पथावर नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभारणे, नौदलाचा ध्वज बदलणे आणि स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनी स्वदेशी तोफांची सलामी देणे.

## आपत्ती जोखीम व्यवस्थापन अभियान

- ऑपरेशन मैत्री (नेपाळ, 2015)
- ऑपरेशन देवी शक्ती (अफगाणिस्तान, 2021)

### सागर मिशन अंतर्गत नौदलाद्वारे मानवतावादी मदतीचे वितरण

- ऑपरेशन समुद्र सेतू (2020)
- ऑपरेशन गंगा (यूक्रेन, 2022)
- ऑपरेशन दोस्त (तुर्किये आणि सीरिया, 2023)
- ऑपरेशन कावेरी (सुदान, एप्रिल 2023)
- ऑपरेशन ब्रह्मा (म्यांमार, 2025)
- ऑपरेशन सागर बंधू (2025)



> *सामरिक स्वायत्तता आणि स्वदेशी क्षमता ही या धोक्यांना निर्णायकपणे सामोरे जाण्याची गुरुकिल्ली असून त्याद्वारे आत्मनिर्भरतेला राष्ट्रीय सामर्थ्य, प्रतिष्ठा आणि 2047 पर्यंत विकसित भारत बनण्याच्या प्रवासाचा आधारस्तंभ बनवता येईल.*
>
> **–नरेंद्र मोदी**
> **पंतप्रधान**



# ऑपरेशन सिंदूर

## नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त

भारताने लश्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिदीनच्या तळांना लक्ष्य करून पाकिस्तान आणिअवैधपणे पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या जम्मू - काश्मीर (पीओजेके) मधील नऊ प्रमुख दहशतवादी तळ यशस्वीरित्या उद्ध्वस्त केले. या कारवाईत 100 हून अधिक दहशतवादी ठार झाले.

## सीमेपलीकडे अचूक हल्ले

भारताने पंजाब प्रांत आणि बहावलपूरसह पाकिस्तानच्या अंतर्गत भागांवर हल्ले करून युद्धाचे नियमच बदलून टाकले. हे भाग एकेकाळी अमेरिकेच्या ड्रोन हल्ल्यांसाठीही प्रतिबंधित मानले जात होते.

## एक नवी सामरिक सीमा रेषा

ऑपरेशन सिंदूरने एक नवी सीमा रेषा आखली आहे—जर दहशतवाद हे एखाद्या देशाचे धोरण असेल, तर त्याला थेट आणि जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल.

## भारताच्या हवाई संरक्षण श्रेष्ठत्वाचे प्रदर्शन

स्वदेशी आकाशतीर प्रणालीचा समावेश असलेल्या भारताच्या बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणालीने शेकडो ड्रोन आणि क्षेपणास्त्रे पाडली. यामुळे प्रगत संरक्षण प्रणाली निर्यात करण्यामधील भारताची वाढती क्षमता दिसून आली.

## पाकिस्तानी लष्करी तळांवर हवाई हल्ले

9-10 मे रोजी भारताने एकाच मोहिमेत अण्वस्त्रधारी देशाच्या 11 हवाई तळांवर हल्ला करून पाकिस्तानच्या हवाई दलाची 20% मालमत्ता नष्ट केली.

## भारताने जागतिक संदेश दिला

भारताने जगाला दाखवून दिले की आपल्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी भारताला कोणत्याही परवानगीची गरज नाही. दहशतवादी आणि त्यांच्या सूत्रधारांना लपायला कुठेही जागा नाही आणि जर पाकिस्तानने प्रत्युत्तर दिले तर भारत निर्णायक प्रतिहल्ला करण्यास तयार आहे, या विचाराला भारताने बळकटी दिली.




## व्यापक जागतिक पाठिंबा

मागील संघर्षांच्या विपरीत, यावेळी अनेक जागतिक नेत्यांनी संयम राखण्याचे आवाहन करण्याऐवजी भारताला पाठिंबा दिला. या बदलातून भारताची सुधारलेली जागतिक प्रतिष्ठा आणि कथनात्मक नियंत्रण दिसून आले.

# परराष्ट्र धोरण

## जागतिक पटलावर लखलखता भारत

*गेल्या एका दशकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारताच्या परराष्ट्र धोरणाने केवळ आपल्या पारंपरिक सीमांचाच विस्तार केला नाही, तर जागतिक स्तरावर देशाच्या भूमिकेलाही नव्याने परिभाषित केले आहे. बदलती आंतरराष्ट्रीय परिस्थिती, बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था आणि उदयास येणारी भू-राजकीय आव्हाने यांच्या पार्श्वभूमीवर भारताने एक संतुलित, सक्रिय आणि धोरणात्मक दृष्टिकोन स्वीकारून आपली राजनैतिक ओळख अधिक मजबूत केली आहे. शेजारी देशांच्या संबंधांना प्राधान्य देण्यापासून ते जागतिक शक्तींसोबतची भागीदारी अधिक दृढ करण्यापर्यंतच्या भारताच्या परराष्ट्र धोरणाने राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्याबरोबरच जागतिक शांतता, स्थिरता आणि सहकार्याला प्रोत्साहन देण्यात बजावली आहे महत्त्वपूर्ण भूमिका...*

### मुक्त व्यापार करार

- भारताने जागतिक व्यापाराची दिशा बदलून मुक्त व्यापार करारांच्या (एफटीए) नव्या पिढीचा मार्ग मोकळा केला आहे.
- गेल्या काही वर्षांत भारताने आपल्या मुक्त व्यापार करारांची व्याप्ती वाढवली आहे. आजपर्यंत भारताने 38 देशांसोबत एकूण नऊ मुक्त व्यापार करारांवर स्वाक्षरी केली आहे. याची सुरुवात 2021 मध्ये भारत-मॉरिशस कराराने झाली.

### जी 20 अध्यक्षपदाचे 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' ला समर्थन

- 1 डिसेंबर 2022 ते 30 नोव्हेंबर 2023 या कालावधीतील भारताचे जी20 अध्यक्षपद हा जागतिक मुत्सद्देगिरीतील एक महत्त्वाचा अध्याय आहे.
- 9-10 सप्टेंबर 2023 रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे झालेल्या 18 व्या जी 20 नेत्यांच्या शिखर परिषदेत 20 सदस्य देश, 9 आमंत्रित देश आणि 14 आंतरराष्ट्रीय संघटना सहभागी झाल्या होत्या.
- भारताने 60 शहरांमध्ये 200 हून अधिक बैठकांचे आयोजन केले होते, ज्यात एक लाखांहून अधिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला.




### विकसनशील देशांचा खंबीर आवाज

- ग्लासगो येथील कॉप 26 बैठकीत आणि शर्म अल-शेख येथील कॉप 27 बैठकीत विकसनशील देशांचा खंबीर आवाज म्हणून पुढे आला भारत.

### वॅक्सीन मैत्री





- कोविड-19 संकटकाळात भारताने आपल्या मानवकेंद्रित मुत्सद्देगिरीचा पुरावा म्हणून 'लस मैत्री' उपक्रम सुरू केला.
- जानेवारी 2021 पासून भारताने 99 देशांना आणि संयुक्त राष्ट्रांच्या दोन संस्थांना 30.12 कोटींहून अधिक लसींच्या मात्रा उपलब्ध करून दिल्या आहेत.
- जलद आणि व्यापक मदतीमुळे जागतिक आरोग्यासाठी एक विश्वासार्ह भागीदार तसेच ग्लोबल साऊथकडील एक सहानुभूतीपूर्ण आवाज म्हणून भारताची प्रतिमा अधिक मजबूत झाली.



**50** हून अधिक देशांना लसीच्या 1.51 कोटी मात्रा भेट म्हणून देण्यात आल्या.

## आंतरराष्ट्रीय सौर आघाडी




- 30 नोव्हेंबर 2015 रोजी पॅरिसमधील कॉप 21 मध्ये पंतप्रधान मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष फ्रान्स्वा होलांद यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (आय एस) हा भारताचा हवामान बदलावरील प्रमुख उपक्रम आहे.

**120** सदस्य आणि स्वाक्षरी करणाऱ्या देशांबरोबर मिळून 2030 पर्यंत सौर ऊर्जा गुंतवणुकीत 1,000 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निधी उभारण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे.

- गुरुग्राम येथे मुख्यालय असलेली ही संस्था भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय आंतरशासकीय संस्था आहे.

## संकटकाळात भारत आघाडीवर



- भारताने 150 हून अधिक देशांना मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण सहाय्य पुरवले आहे.
- जुलै 2021 मध्ये परराष्ट्र मंत्रालयाने राष्ट्रीय संस्था आणि परदेशी सरकारांशी समन्वय साधण्यासाठी एक जलद प्रतिसाद कक्ष स्थापन केला.

## शेजारी राष्ट्रांना प्राधान्य

- भारताच्या 'शेजारी राष्ट्र प्रथम' या धोरणाने प्रादेशिक संबंधांबाबत एक धाडसी आणि दूरदर्शी दृष्टिकोन आकाराला आला आहे.
- हे धोरण भूतान, नेपाळ, श्रीलंका, मालदीव, म्यानमार, बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांसारख्या शेजारी देशांसोबतच्या मजबूत भौतिक, डिजिटल आणि सांस्कृतिक संबंधांना प्राधान्य देते.

## नवीन दूतावास आणि वाणिज्य दूतावास




**40** हून अधिक नवीन दूतावास आणि वाणिज्य दूतावास भारताने जगभरात 2014 ते 2025 या कालावधीत उघडले.

त्यांची एकूण संख्या **220** वर पोहोचली आहे. या विस्ताराने भारताचे जागतिक अस्तित्व आणि पोहोच अधिक मजबूत केली आहे.

## परदेशातील रोजगाराच्या संधी

- गेल्या एका दशकात भारताने सौदी अरेबिया, फ्रान्स, संयुक्त अरब अमिराती, जपान, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि जर्मनी यांसह दीड डझनाहून अधिक देशांसोबत गतिशीलता आणि स्थलांतर भागीदारी प्रस्थापित केली आहे. यामुळे भारतीय नागरिकांसाठी परदेशात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.





## मदत आणि स्थलांतर मोहिमा

- गेल्या 10-12 वर्षांपासून भारताचे परराष्ट्र धोरण केवळ मुत्सद्देगिरी आणि संवादावरच नव्हे, तर परदेशात असलेल्या आपल्या नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्यास निर्णायक कारवाई करण्यावरही आधारित राहिले आहे. मदत आणि स्थलांतर मोहीम ही 'राष्ट्र प्रथम' धोरणाची प्रमुख उदाहरणे बनली आहेत. महामारी असो, संघर्षाचे संकट असो, राजकीय उलथापालथ असो किंवा नैसर्गिक आपत्ती असो, भारताने आपल्या लोकांना सुरक्षितपणे आणि जलदगतीने मायदेशी परत आणले आहे.

## प्रमुख स्थलांतर मोहिमा



- वंदे भारत मिशन, ऑपरेशन देवी शक्ती, ऑपरेशन गंगा, ऑपरेशन कावेरी, ऑपरेशन अजय, ऑपरेशन इंद्रावती यांच्यासह इतर अनेक मोहिमा भारत सरकारने सुरू केल्या.

## सर्वोच्च नागरी सन्मानाने वाढविली भारताची प्रतिष्ठा



- एप्रिल 2026 पर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 29 हून अधिक देशांकडून सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आले आहेत, ज्यामुळे ते इतिहासातील सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सन्मान मिळवणारे भारतीय नेते ठरले आहेत.

## दहशतवादावर कठोर धोरण



### दहशतवादी हल्ल्यांना सशक्त प्रत्युत्तर

- हल्लेखोर कुठूनही काम करत असले तरी भारतावरील कोणत्याही दहशतवादी हल्ल्याला चोख आणि निर्णायक प्रत्युत्तर दिले जाईल.

### अणुबॉम्बच्या नावे ब्लॅकमेलिंग अजिबात सहन केले जाणार नाहीत

- भारत अणुबॉम्बच्या धमक्यांना घाबरणार नाही. दहशतवादी लक्ष्यांवर अचूक हल्ले करणे सुरूच ठेवेल.

### दहशतवाद्यांमध्ये कोणताही भेद केला जाणार नाही

- दहशतवादी हल्ल्यांचे सूत्रधार आणि प्रायोजक यांना समान गणले जाईल; दोघांनाही जबाबदार धरले जाईल.

### चर्चेत दहशतवादाला प्राधान्य

- पाकिस्तानसोबत कोणतीही चर्चा झाल्यास, ती केवळ दहशतवाद किंवा पाकिस्तानव्याप्त काश्मीरवरच केंद्रित असेल.

### सार्वभौमत्वाबद्दल कोणतीही तडजोड नाही

- 'दहशतवाद आणि संवाद एकत्र नांदू शकत नाहीत, दहशतवाद आणि व्यापार एकत्र नांदू शकत नाहीत आणि पाणी व रक्त एकत्र वाहू शकत नाही' दहशतवादी धोक्यांच्या पार्श्वभूमीवर सामान्य संबंधांचे दार ठामपणे बंद करण्यात आले आहे.



# दहशतवाद



## दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुता

*भारताचा दहशतवादाविरुद्धचा लढा प्रखर आहे आणि तो एका हल्ल्यालाही अनेक हल्ल्यांच्या समान मानतो. भारताला असाही विश्वास वाटतो की चांगला दहशतवाद किंवा वाईट दहशतवाद असे काही नसते. दहशतवाद हा मानवतेवर, स्वातंत्र्यावर आणि संस्कृतीवर केलेला हल्ला असतो. त्यामुळे केंद्र सरकार दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुतेच्या धोरणासाठी कटिबद्ध आहे. उरी सर्जिकल स्ट्राईक, बालाकोट हवाई हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरमध्ये जगाने ही कटिबद्धता पाहिली आहे. अचूक, जोरदार आणि निर्णायक हल्ले करून जगाला हा संदेश दिला गेला की भारताला युद्ध नको आहे, परंतु दहशतवाद अजिबात सहन केला जाणार नाही.*

### ऑपरेशन सिंदूर

- एप्रिल 2025 मध्ये पहलगाम इथे नागरिकांवर झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले.
- पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील नऊ दहशतवादी छावण्यांवर अचूक प्रत्युत्तरात्मक हल्ले करण्यात आले.
- भारतीय लष्कराने आंतरराष्ट्रीय सीमा न ओलांडता धोके निष्प्रभ करण्यासाठी ड्रोन हल्ले, जिवंत दारुगोळा आणि बहुस्तरीय हवाई संरक्षणाचा वापर केला.
- हे भारतीय लष्कर, हवाई दल आणि नौदल यांच्यातील समन्वयाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.
- भारतीय हवाई दलाने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. त्यात नूर खान हवाई तळ आणि रहीमयार खान हवाई तळ यासारख्या हवाई लक्ष्यांवर हल्ले करण्यात आले.
- नौदलाने मिग-29 लढाऊ विमाने आणि हवाई प्रारंभिक इशारा हेलिकॉप्टरने सुसज्ज असलेला आपला कॅरियर बॅटल ग्रुप (सीबीजी) तैनात केला.
- सागरी यशासोबत एक सामरिक संदेशही होता: भूमी, हवा आणि समुद्र या तिन्ही पातळ्यांवर समन्वित लष्करी कारवाया करण्याच्या भारताच्या क्षमतेचे यातून प्रदर्शन.
- जेकबबादमधील शाहबाज हवाई तळावरील हल्ल्यापूर्वीची आणि नंतरची उपग्रह छायाचित्रे विध्वंस स्पष्टपणे दाखवतात. या हल्ल्यात सरगोधा आणि भोलारी येथील प्रमुख दारूगोळा डेपो आणि हवाई तळांना लक्ष्य करण्यात आले होते, जिथे एफ-16 आणि जेएफ-17 लढाऊ विमाने तैनात होती. परिणामी, पाकिस्तान हवाई दलाच्या सुमारे 20% पायाभूत सुविधा नष्ट झाल्या.
- भोलारी हवाई तळावरील बॉम्बस्फोटात स्क्वाड्रन लीडर उस्मान युसूफ आणि चार हवाई सैनिकांसह 50 हून अधिक जण ठार झाले. अनेक पाकिस्तानी लढाऊ विमानेही नष्ट करण्यात आली होती.
- ऑपरेशन सिंदूरने एक नवी लक्ष्मणरेषा आखली आहे. दहशतवाद हे कोणत्याही देशाचे धोरण असेल तर त्याला स्पष्ट आणि जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल.

**अवघ्या तीन तासांत भारताने नूर खान, रफीकी, मुरीद, सुक्कूर, सियालकोट, पसरूर, चुनियन, सरगोधा, स्कार्दू, भोलारी आणि जेकोबाबाद अशा 11 लष्करी तळांना लक्ष्य केले.**



## भारत आणि फ्रान्स आले दहशतवादाविरोधात एकत्र

- दहशतवादाशी संबंधित वित्तपुरवठा रोखण्यासाठी एफएटीएफ नियमांच्या पालनावर भर.
- नवी दिल्लीत आयोजित मिलिपोल 2025 च्या माध्यमातून भारताच्या दहशतवादविरोधी नेतृत्वाचे प्रदर्शन.
- एप्रिल 2024 मध्ये भारत-फ्रान्स दहशतवादविरोधी संवादाचे आयोजन.





## दहशतवादाविरोधात भारत आणि अमेरिकेची संयुक्त आघाडी

- दहशतवादाशी संबंधित जाळे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी भारत आणि अमेरिका एकत्र.
- अल कायदा, आयएसआयएस, जैश-ए-मोहम्मद, लश्कर-ए-तोयबा यांसारख्या दहशतवादी संघटनांविरोधात संयुक्त कारवाई.
- 26/11 आणि आबे गेट हल्लेखोरांना सडेतोड प्रत्युत्तर.
- अमेरिकेने 26/11 चा कट रचणारा तहव्वुर राणा याला भारताच्या ताब्यात दिले.
- पाकिस्तानने 26/11 आणि पठाणकोट हल्लेखोरांविरोधात कारवाई करावी असे आवाहन केले.

## जगभरात दहशतवादाला होणाऱ्या वित्तपुरवठ्याविरोधात मोहीम

- 2022 मध्ये भारताने 'नो मनी फॉर टेरर' परिषदेचे यजमानपद भूषवले.
- भारताकडून जागतिक क्रिप्टो नियमनाला गती देण्यावर भर.



## सर्जिकल स्ट्राइक आणि बालाकोट एयर स्ट्राइक

- भारताने 28-29 सप्टेंबर 2016 रोजी सर्जिकल स्ट्राईक करून उरी इथे 18 सैनिकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिले.
- या हल्ल्यांमुळे नियंत्रण रेषेपलीकडील दहशतवाद्यांचे आणि त्यांच्या पाठराख्यांचे मोठे नुकसान झाले.
- 14 फेब्रुवारी 2019 रोजी झालेल्या पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने जलद गतीने कारवाई केली. 26 फेब्रुवारी 2019 रोजी केलेल्या बालाकोट हवाई हल्ल्यात जैश-ए-मोहम्मदच्या वरिष्ठ कमांडरांसह मोठ्या संख्येने दहशतवाद्यांना मारले गेले.
- आता भारत आता दहशतवादाच्या माध्यमातून चालवले जाणारे छद्मयुद्ध सहन करणार नाही हे या प्रतिक्रियापूर्व कारवायांच्या माध्यमातून अवघ्या जगाला दिसून आले.




## मसूद अजहर जागतिक दहशतवादी घोषित

- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने मसूद अजहर याचा दहशतवाद्यांच्या यादीत समावेश केला.
- 2019 मध्ये भारताचा मोठा राजनैतिक विजय झाला.

## एका नव्या आणि सुरक्षित भारताच्या दिशेने...

- 2010 ते 2024 या काळात दहशतवादामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये 85 टक्के इतकी घट झाली.
- जम्मू काश्मीरमधील दहशतवादाशी संबंधित घटनांचे प्रमाण 2019 पासून 70 टक्के घटले आहे.



मुखपृष्ठ कथा

विकास यात्रेची

12 वर्ष

## दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलता




- 2 ऑगस्ट 2019 मध्ये एनआयए कायद्यात सुधारणा करून त्यात नवीन गुन्ह्यांचा समावेश करण्यात आला, तसेच एनआयएला परदेशातही तपास करण्याचे अधिकार मिळाले.
- **UAPA** कायद्यातही सुधारणा करून दहशतवाद्यांची मालमत्ता जप्त करण्याचे आणि व्यक्तींनाही दहशतवादी घोषित करण्याचे अधिकार मिळाले.
- विद्यमान केंद्र सरकारने कायद्याअंतर्गत पहिल्यांदाच दहशतवादाची व्याख्या निश्चित केली.

## मजबूत धोरणांमुळे सुरक्षित भारत

- गेल्या 10 वर्षांत दहशतवादी घटनांमध्ये 70% घट.
- युएपीए प्रकरणांमध्ये एनआयएचा गुन्हेगारांना शिक्षा देण्याचा दर 95 टक्के, दहशतवादाविरोधात भक्कम धोरण.

**15 पेक्षा जास्त संघटना दहशतवादी संघटना असल्याचे घोषित करून त्यांवर बंदी.**

## दहशतवादी घटना






> *काही देश आपल्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून दहशतवादाला पाठबळ देतात. अशा देशांना वेगळे एकटे पाडले पाहिजे. यात कोणत्याही प्रकारे जर तरची भाषा नसावी.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



# नक्षलवादमुक्त भारत : नव्या भारताची नवी गाथा

*भारत नक्षलवाद आणि माओवादी दहशतीपासून मुक्त झाला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत गेल्या 12 वर्षांतील भारताच्या सर्वात मोठ्या यशांपैकी हे अत्यंत महत्त्वाचे यश आहे. बॉम्ब, बंदूक आणि पिस्तुलासमोर देशाच्या राज्यघटनेचा विजय झाला आहे. कालपर्यंत जे रेड कॉरिडॉर होते, ते आज ग्रीन ग्रोथ झोनमध्ये बदलताना दिसत आहेत. दशकांपासून चालत आलेली ही समस्या नियोजनबद्ध रितीने संपुष्टात आणत नक्षलमुक्त भारत या संकल्पाने 31 मार्च 2026 रोजी संघर्षातून सिद्धीचा एक ऐतिहासिक अध्याय रचला आहे...*

## नक्षलग्रस्त भागांत झालेली कामे

नक्षलवादग्रस्त भागांमध्ये 2014 पासून **17,589** किलोमीटर लांबीच्या रस्ते बांधणीला मंजुरी देण्यात आली आहे.

**12,000** किमी रस्ते आधीच तयार झाले आहेत.

**6,025** टपाल कार्यालये सुरु करण्यात आली आहेत.

**₹6,000** कोटी खर्च करून सुमारे 5,000 मोबाईल टॉवर उभारण्यात आले आहेत.

**8,000** 4G टॉवर उभारण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

गेल्या 12 वर्षांत **1,804** बँक शाखा उघडण्यात आल्या असून, **1,321** एटीएम सुरू करण्यात आली आहेत.



## अनेक राज्यांमध्ये 2024 मध्येच नक्षलवाद आला संपुष्टात

- ओदिशा आणि बिहार 2024 पूर्वीच नक्षलवादातून मुक्त झाले होते.
- केवळ एक तालुका वगळता 2024 पूर्वीच महाराष्ट्र नक्षलवादातून मुक्त झाला होता.
- केवळ एक जिल्हा वगळता 2024 पूर्वीच झारखंड नक्षलवादमुक्त झाले होते.
- 24 ऑगस्ट 2024 रोजी गृहमंत्री अमित शाह यांनी 31 मार्च 2026 पर्यंत संपूर्ण देशातून नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्याची घोषणा केली होती.





> *“डाव्या विचारसरणीच्या कट्टरतावाद्यांनी आणि त्यांच्या पाठिराख्यांनी भोळ्या आदिवासींसमोर एक चुकीचे नॅरेटिव्ह ठेवले होते की, ते त्यांच्या हक्कांसाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लढत आहेत.*
>
> **–अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री**


### नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी उचललेली पावले


11 वर्षांत **596** तटबंदी असलेली पोलीस ठाणी उभारण्यात आली.

सर्वात जास्त प्रभावित जिल्ह्यांची संख्या



## सरकारच्या धोरणांचा परिणाम

- नक्षलवाद्यांकडून जप्त केलेल्या शस्त्रांपैकी **92%** शस्त्रे पोलिसांकडून लुटलेली होती.
- नक्षलवाद्यांचा सरचिटणीस बसवराजू याला मारले गेले.
- **27** लोकांची हत्या करणाऱ्या हिडमा याला मारले गेले.
- **11** वर्षांपासून सक्रिय असलेल्या गजुरेल्ला रवी याला मारले गेले.
- **46** वर्षांपासून सक्रिय असलेल्या कादरी सत्यनारायण रेड्डी याला मारले गेले.
- **44** वर्षांपासून सक्रिय असलेल्या गणेश उईके याला मारले गेले.
- **46** वर्षांपासून सक्रिय असलेल्या वेणुगोपाल आणि पल्लूरी प्रसाद राव चंदना यांनी आत्मसमर्पण केले.
- **36** वर्षांपासून सक्रिय असलेल्या वासुदेव आणि रामदेव मांझी देबू यांनी आत्मसमर्पण केले.
- **44** वर्षांपासून सक्रिय राहिलेल्या तिप्री तिरुपतीनेही आत्मसमर्पण केले आहे.
- उरलेल्या सर्व सर्वोच्च सशस्त्र माओवादी नेत्यांना मारले गेले आहे.

**नक्षलबारी**

नक्षलबारीपासून सुरू झालेली ही चळवळ 12 राज्यांपर्यंत पसरली, यात देशाचा **17%** भूभाग **10%** पेक्षा जास्त लोकसंख्या समाविष्ट होती.

## नक्षलवादाच्या उच्चाटनासाठी राबवलेल्या मोहिमा



**ऑपरेशन ऑक्टोपस:** बिहारच्या बुढा पहाड भागात 2022 मध्ये राबवले गेले.

**ऑपरेशन डबल बुल:** झारखंडच्या गुमला, लोहरदगा आणि लातेहार जिल्ह्यांत फेब्रुवारी 2022 मध्ये राबवले गेले. हे तिन्ही जिल्हे नक्षलवादातून मुक्त झाले.

**ऑपरेशन थंडरस्टॉर्म:** झारखंडच्या सरायकेला, पश्चिम सिंगभूम आणि खुंटी जिल्ह्यांत सप्टेंबर 2022 मध्ये राबवले गेले.

**ऑपरेशन भीमबर्ग:** मुंगेर जिल्ह्यात जून आणि जुलै 2022 मध्ये राबवले गेले.

**ऑपरेशन चक्रबांधा:** बिहारच्या गया आणि औरंगाबाद जिल्ह्यांत 2022 मध्ये राबवले गेले.

**ऑपरेशन ब्लैक फॉरेस्ट:** तेलंगणा आणि छत्तीसगडच्या सीमेवरील 50 किमी लांब आणि 37 किलोमीटर रुंद डोंगराळ भागात 2025 मध्ये राबवले गेले.

## विशेष न्यायालये आणि तपास यंत्रणांची स्थापना

- एनआयएला अत्यंत बळकटी दिली गेली आहे आणि डाव्या कट्टरतावादाने प्रभावित राज्यांमध्ये राज्य तपास यंत्रणा (**SIA**) देखील स्थापन करण्यात आल्या आहेत.
- छत्तीसगडमध्ये 4 डावे कट्टरतावाद विशेष न्यायालये सुरू करण्यात आली आणि इतर राज्यांमध्येही केवळ या प्रकरणांसाठीची विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली.


## आर्थिकदृष्ट्या केले कमकुवत

नक्षलवाद्यांचा वित्तपुरवठा रोखण्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेला सक्रिय करून आक्रमक धोरण अवलंबण्यात आले. परिणामी त्यांच्या आर्थिक संसाधनांमध्ये मोठी घट झाली.



## पोलीस दलाचे आधुनिकीकरण

- पोलीस दलाचे आधुनिकीकरण या योजनेअंतर्गत राज्यांच्या पोलीस दलाला सुसज्ज आणि आधुनिक बनवण्याच्या प्रयत्नांना पाठबळ पुरवण्यात आले.
- या योजनेअंतर्गत, राज्य सरकारांना शस्त्रास्त्रे, माहिती तंत्रज्ञान विषयक उपकरणे, दळणवळण, प्रशिक्षण, पोलीस ठाण्यांची उभारणी, ये-जा, पोलीसांसाठी निवासस्थाने आणि पोलीस व्यवस्थेशी संबंधित इतर पायाभूत सुविधांकरता केंद्र सरकारने मदत पुरवली.
- विशेष पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत (**SIS**), डाव्या कट्टरतावादाने प्रभावित राज्यांना राज्याचे विशेष दल, राज्य गुप्तवार्ता शाखा, जिल्हा पोलीस आणि भक्कम पोलीस ठाण्यांच्या उभारणीसाठी 1,761 कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली होती.






# विकासही, वारसाही

## सशक्त, समृद्ध, सुरक्षित भारत

***राष्ट्रीय एकता असो वा नागरिकांची कर्तव्यभावना, सांस्कृतिक वारसा हा दुवा म्हणून काम करतो. हाच तोच मजबूत दुवा आहे जो केवळ देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला भारताशी जोडतो. याच विचारातून आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगत भारताने आपल्या अद्भुत, गौरवशाली इतिहासासोबत वर्तमानकाळात नवे आयाम जोडले आहेत. विकास आणि वारसा या दृष्टीकोनाचा अवलंब करत गेल्या 12 वर्षांत भारताने उज्ज्वल भविष्याची पटकथा लिहिली आहे. यासोबतच, एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य या संकल्पनेच्या जोडीला वसुधैव कुटुम्बकम या मंत्राचा अवलंब करत भारत पर्यावरण संरक्षणाच्या दिशेनेही जगाचा मार्गदर्शक म्हणून उदयाला आला आहे. जगातील अनेक संस्थांचा मजबूत आवाज बनत भारताने मिशन लाईफ आणि निसर्गासोबतच्या समन्वयाचा एक नवा मार्ग जगाला दाखवला आहे. पर्यावरणविषयक वचनबद्धतेच्या नेतृत्वाच्या युगाचा मार्ग प्रशस्त करत भारताने एका नव्या अध्यायाची सुरुवात केली आहे...***

# भूतकाळाची ओळख, भविष्याची दिशा

*भारताचा वारसा म्हणजे हजारो वर्षांची जुन्या संस्कृती, नागरी संस्कृती आणि परंपरांचे जिवंत प्रतिबिंब आहे. विविधतेने नटलेल्या या देशातील ऐतिहासिक वास्तू आणि जीवनशैलीने आपली ओळख समृद्ध होते. आजच्या काळात वारसा हा केवळ भूतकाळाचा ठेवा नसून, विकास आणि आत्मसन्मानाचा पायाही आहे. सरकारच्या वतीने जतन, संवर्धन आणि डिजिटल दस्तऐवजीकरण यांसारख्या प्रयत्नांच्या माध्यमातून हा अमूल्य वारसा नव्या पिढीशी जोडला जात आहे. या उपक्रमामुळे आपली मुळे मजबूत होण्यासोबतच, जागतिक सांस्कृतिक नकाशावर अधिक सक्षम भारताची जडणघडण होऊ लागली आहे...*

## नवे संसद भवन

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 28 मे 2023 रोजी नव्या संसद भवनाचे उद्घाटन केले आणि ते राष्ट्राला समर्पित केले.
- 10 डिसेंबर 2020 रोजी पंतप्रधान मोदी यांनीच नव्या संसद भवनाच्या उभारणीची पायाभरणी केली होती.



## राष्ट्रीय युद्ध स्मारक

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 25 फेब्रुवारी 2019 रोजी राष्ट्रीय युद्ध स्मारक राष्ट्राला समर्पित केले. हे स्मारक स्वातंत्र्यानंतर वीर जवानांच्या बलिदानाचे साक्षीदार आहे.



## गुलामीच्या मानसिकतेतून मुक्ती



- राष्ट्रीय नायक आणि स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांचा भव्य पुतळा इंडिया गेटजवळ उभारण्यात आला आहे, याच जागी पूर्वी असलेल्या किंग जॉर्ज पाचवा यांच्या पुतळ्याच्या जागी हा पुतळा उभारण्यात आला आहे.
- गुलामीचे प्रतीक असलेला किंग्सवे म्हणजेच राजपथ आता इतिहासातली गोष्ट उरला असून, सप्टेंबर 2022 मध्ये या मार्गाचे नाव बदलून ते कर्तव्य पथ असे करण्यात आले.
- 2016 मध्ये रेस कोर्स रोडचे नाव बदलून 7 लोक कल्याण मार्ग असे करण्यात आले.
- 2017 मध्ये डलहौजी रोडचे नाव आता दारा शिकोह रोड असे करण्यात आले.
- 4 डिसेंबर 2022 रोजी नौसेना दिनानिमित्त विशाखापट्टणम इथे भारतीय नौदलासाठीचा राष्ट्रपती ध्वज आणि निशाण तसेच भारतीय नौदलाच्या मानचिन्हाच्या नव्या डिझाइनचे अनावरण करण्यात आले.




- गुलामीच्या मानसिकतेपासून मुक्ती मिळवण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून नौदलाला नवा ध्वज मिळाला, जो छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वारशाशी जोडला गेला आहे.
- अंदमान आणि निकोबार बेटसमूहातील नामकरण झाले नसलेल्या 21 सर्वात मोठ्या बेटांचे 21 परमवीर चक्र विजेत्यांच्या नावे नामकरण करण्यात आले.

**वसाहतवादी शासन काळातील 1,500 कायदे रद्दबातल करण्यात आले.**

## पंतप्रधान संग्रहालय

- 14 एप्रिल 2022 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान संग्रहालयाचे उद्घाटन केले. या संग्रहालयाच्या माध्यमातून भारताच्या सर्व पंतप्रधानांच्या योगदानाचा गौरव केला गेला आहे, तसेच लोकशाहीने समाजातील प्रत्येक वर्गातील आणि स्तरातील नेत्यांना देशासाठी योगदान देण्याची संधी कशी दिली, याचेही दर्शन घडते.



## हरपलेला वारसा परत आणला



- 2014 पासून, चोरीला गेलेल्या 653 पेक्षा जास्त प्राचीन वस्तू देशात परत आणण्यात आल्या.
- 2013 पूर्वी, चोरीला गेलेल्या परदेशातून भारतात केवळ 13 प्राचीन वस्तू परत आणल्या गेल्या होत्या.

***2016 पासून, अमेरिकी सरकारने तस्करी किंवा चोरी झालेल्या अनेक प्राचीन वस्तू परत मिळवून देण्यासाठी सहकार्य केले आहे.***

***2016 पासून अमेरिकेकडून भारताला परत मिळालेल्या सांस्कृतिक कलाकृतींची एकूण संख्या 578 आहे. ही कोणत्याही देशाकडून भारताला परत मिळालेली सांस्कृतिक कलाकृतींची सर्वोच्च संख्या आहे.***

## युनेस्को : वारशाचे मैलाचे दगड

गेल्या एका दशकभराच्या काळात भारताने जागतिक वारसा सूचीतील आपल्या अस्तित्वाचा विस्तार केला आहे. आता जागतिक वारसा सूचीमध्ये भारतातील 44 स्थळे आणि युनेस्कोच्या संभाव्य सूचीमध्ये 69 स्थळांचा समावेष आहे. ही स्थळे केवळ इतिहासाचे प्रतीक म्हणून नव्हे, तर भावी पिढ्यांसाठी शिकण्याचे केंद्र म्हणूनही जतन केली जात आहेत.



## डिजिटल पुराभिलेखागार नोंदी

- भारतीय राष्ट्रीय अभिलेखागाराने (**NAI**) ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे दस्तऐवज जतन करण्यासाठी आणि संशोधक तसेच सामान्य जनतेसाठी अशी साधनसामग्रीची सुलभतेने उपलब्ध होऊ शकतील या उद्देशाने अभिलेखांमधील नोंदींच्या डिजिटलीकरणाचा एक टप्पेवार कार्यक्रम सुरू केला आहे.

### अभिलेख पटल पोर्टलवर सध्या उपलब्ध असलेले साहित्य

**18.98** कोटी डिजिटाइज्ड पाने

**40.09** लाख डिजिटाइज्ड फाइल्स

**74.03** लाख संदर्भ माध्यम साहित्य



## सकारात्मक वारशाचे जतन

- जेव्हा यशस्वी राष्ट्रे पुढे वाटचाल करतात, तेव्हा ते आपल्या सकारात्मक वारशाचा त्याग करत नाहीत, तर त्याचे जतन करतात. आज विकास आणि वारशाच्या या संकल्पनेच्या बळावरच भारत पुढे वाटचाल करतो आहे.
- नॉर्थ आणि साउथ ब्लॉकला भारताच्या महान वारशाचा भाग बनवले जाईल. नॉर्थ आणि साउथ ब्लॉक हे देशातील जनतेसाठी युगे युगीन भारत संग्रहालयाच्या रूपात परावर्तीत केले जात आहेत. देशातील प्रत्येक नागरिक तिथे जाऊ शकेल आणि देशाच्या ऐतिहासिक वाटचालीचे दर्शन घेऊ शकेल.

## पंच प्रण

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून सर्व देशवासियांना विकसित भारताच्या लक्ष्याचा अंगिकार करणे, गुलामीची मानसिकता झटकून देणे, आपल्या परंपरांचा अभिमान बाळगणे, एकता आणि अखंडतेसाठी संपूर्ण जीवन समर्पित करणे आणि प्रत्येक नागरिकाच्या मनात कर्तव्याची भावना जागृत करणे हे पंच प्रण अंगिकारण्याचे आवाहन केले.

## स्मारकांचे नवे पर्व: वारशातून नवी प्रेरणा

- पंतप्रधान संग्रहालय, राष्ट्रीय युद्ध स्मारक, राष्ट्रीय पोलीस स्मारक, जलियनवाला बाग स्मारक, बिप्लोबी भारत गॅलरी या वास्तुंचा उभारणीसोबतच देशभरात 11 आदिवासी संग्रहालयांना मंजुरी देण्यात आली आहे.

# जागतिक पटलावरील सांस्कृतिक ओळख

*जेव्हा एखाद्या देशाच्या आर्थिक सामर्थ्यासोबतच त्याच्या सांस्कृतिक वारशाचाही अंगिकार केला जातो, तेव्हाच खऱ्या अर्थाने जागतिक पटलावर त्या देशाला सन्मान आणि ओळख मिळते. याचीच जाणीव ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षांत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पटलावर अशी अनेक कामे केली आहेत, ज्यामुळे देशातील लोकांना आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान वाटू लागला आहे...*



## राम मंदिर

- अयोध्येत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 22 जानेवारी 2024 रोजी भव्य श्रीराम मंदिरात रामललाची प्राणप्रतिष्ठा केली, आणि 500 वर्षांची प्रतीक्षा संपुष्टात आली.
- भव्य श्री रामजन्मभूमी मंदिराची उभारणी पारंपारिक नागर शैलीनुसार करण्यात आली आहे.
- मंदिराची लांबी (पूर्व-पश्चिम) 380 फूट, रुंदी 250 फूट आणि उंची 161 फूट आहे.
- मंदिराच्या स्तंभांवर आणि भिंतींवर हिंदू देवी देवतांच्या मूर्तींचे सूक्ष्म कोरीवकाम करण्यात आले आहे.
- तळमजल्यावरील मुख्य गर्भगृहात भगवान श्री रामांच्या बालपणीच्या रूपातील (श्री रामललाची मूर्ती) स्थापित केली आहे.
- श्रीराम मंदिरावर 25 नोव्हेंबर 2025 रोजी भगवा ध्वज फडकवला गेला आणि या परिसर उभारणीचे काम पूर्णत्वाला गेले.


## भूमीपूजन आणि पायाभरणी

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 5 ऑगस्ट 2020 रोजी श्री राम मंदिर उभारणीसाठी भूमीपूजन आणि पायाभरणी केली होती.
- 5 फेब्रुवारी 2020 रोजी केंद्र सरकारने यासाठी मंजुरी दिली होती.
- 9 नोव्हेंबर 2019 रोजी सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण 2.77 एकर विवादित जमीन एकमताने आणि ऐतिहासिक निर्णय देत श्रीराम मंदिर उभारणीसाठी दिली.

"

*हे भव्य राम मंदिर भारताच्या उत्कर्षाचे आणि उदयाचे साक्षीदार ठरेल. हे भव्य राम मंदिर भारताच्या समृद्धीचे आणि विकसित भारताचे साक्षीदार ठरेल.*

**-पंतप्रधान नरेंद्र मोदी (अयोध्येतील राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात 22 जानेवारी 2024 रोजी)**





## श्री काशी विश्वनाथ कॉरिडॉर

**5.5** एकर परिसरात विस्तारलेले 355 कोटी रुपये खर्चाच्या काशी विश्वनाथ कॉरिडॉर प्रकल्पाचे उद्घाटन 13 डिसेंबर 2021 रोजी झाले.

- हा कॉरिडॉर काशी विश्वनाथ मंदिराला चार पदरी मार्गाने थेट गंगा नदीशी जोडतो, यामुळे मंदिरात जाणाऱ्या भाविकांची ये जा सुलभ झाली आहे.

**3,880** कोटी रूपयांच्या विकास प्रकल्पांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 11 एप्रिल रोजी काशी येथे शुभारंभ केला.

- 2014 ते मार्च 2025 पर्यंत काशीमधील विकासांतर्गत एकूण 48,459 कोटी रुपये खर्चाच्या 580 प्रकल्पांवर काम सुरू झाले.



> काशी आज केवळ पुरातनतेचेच नव्हे, तर प्रगतीचेही प्रतीक आहे.
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



## महाकाल लोक प्रकल्प

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 11 ऑक्टोबर 2022 रोजी मध्य प्रदेशातील उज्जैन इथे महाकाल लोक प्रकल्पाचा पहिला टप्पा राष्ट्राला समर्पित केला.
- या संपूर्ण प्रकल्पासाठी 850 कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.
- महाकाल पथावर 108 स्तंभ आहेत, त्यांवर भगवान शिवांचे आनंद तांडव रूप दर्शवले गेले आहे.
- महाकाल पथाच्या कडेला भगवान शिवांच्या जीवनप्रवासावर आधारित अनेक धार्मिक मूर्ती स्थापित करण्यात आल्या आहेत.
- या पथालगतच्या भिंतींवर भित्तीचित्रे साकारलेली असून, त्यावर शिवपुराणातील सृष्टीची कथा, गणपतीचा जन्म, सती आणि दक्षाची कथा अशा विविध कथा साकारल्या आहेत.
- संपूर्ण परिसरात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आणि कॅमेऱ्यांच्या मदतीने कमांड आणि कंट्रोल सेंटरद्वारे देखरेख ठेवली जाते.




## कामाख्या माता मंदिर, आसाम

यात्रेकरूंना उत्तम सुविधा तसेच आरामदायक आणि सुलभ आध्यात्मिक अनुभव मिळावा, याची खातरजमा करण्यासाठी कामाख्या मातेच्या मंदिराच्या विकासामध्ये पायाभूत सुविधा आणि यात्रेकरूंसाठीच्या सोयीसुविधा वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.



## केदारनाथ मंदिर, उत्तराखंड


केदारनाथच्या विकासामध्ये आदि शंकराचार्यांच्या पुतळ्याची स्थापना समाविष्ट आहे, जो सांस्कृतिक एकतेचे प्रतीक आहे आणि या तीर्थक्षेत्राचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करतो.



## जुन्या सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणी, गुजरात

महत्वाच्या तीर्थक्षेत्रांचे नूतनीकरण करून अहिल्याबाई होळकर यांचा वारसा पुढे नेण्यात आला आहे, ज्यात सोमनाथ मंदिराच्या सभोवतालच्या परिसराचा विकास आणि पार्वती मंदिराचे बांधकाम यांचा समावेश आहे.

- अरबी समुद्राच्या दिशेने असलेल्या सोमनाथ मंदिराचे विहंगम दृश्य यात्रेकरूंना पाहता यावे यासाठी एक पदपथ विकसित करण्यात आला आहे.



## परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात एक स्वतंत्र विभाग

भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सांस्कृतिक वारशाचे पुनरुज्जीवन, जतन आणि देखभाल करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग तयार केला आहे.

# पर्यावरण वचनबद्धतेच्या नेतृत्वाचे युग

*'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' या संकल्पनेसह 'वसुधैव कुटुंबकम' हा मंत्र स्वीकारून भारत पर्यावरण संवर्धनात जागतिक नेतृत्व म्हणून उदयास आला आहे. अनेक जागतिक संस्थांसाठी एक प्रभावी आवाज बनून, भारताने जगाला निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा आणि जीवन जगण्याचा नवीन मार्ग दाखवला आहे. गेल्या 12 वर्षांमध्ये केंद्र सरकारने निसर्गाशी सुसंवाद साधण्याच्या एका नवीन युगाची सुरुवात केली आहे...*


## जगाचे नेतृत्व करणारा भारत

- भारताने **UNFCCC** आणि पॅरिस कराराअंतर्गत आपली हवामानविषयक उद्दिष्ट्ये सातत्याने पुढे नेली आहेत. 2015 च्या सुरुवातीच्या **NDC** लक्ष्यांपासून ते 2031-2035 च्या नवीन लक्ष्यांपर्यंत, भारत आपली वचनबद्धता पूर्ण करत आहे. हवामान बदलाच्या वाटाघाटींमध्ये भारत आता एक मजबूत आणि मुख्य आवाज बनला आहे.
- 2015 साली भारताने **UNFCCC** अंतर्गत आपले पहिले राष्ट्रीय निर्धारित योगदान (**NDC**) सादर केले, ज्यामध्ये 2030 साठीची उद्दिष्ट्ये निश्चित केली होती.
- **COP**21 पासून पंतप्रधान मोदींच्या 'हवामान न्याय' या तत्त्वाला अनुसरून हवामान बदलाच्या मुद्द्यांमध्ये समानता आणि न्यायसंबंधी बाबींकडे दुर्लक्ष होणार नाही याची खात्री केली आहे.
- ग्लासगो (2021) येथील **COP**26 शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींनी 'पर्यावरणासाठी जीवनशैली' (**Lifestyle for Environment**) किंवा **LIFE** ही संकल्पना मांडली, ज्याचा उद्देश हवामान बदलाचा सामना करण्यासाठी लोकांना आणि समुदायांना दैनंदिन जीवनात लहान, पर्यावरणपूरक कृती अवलंबण्यास प्रेरित करणे आहे.



- पंतप्रधान मोदींचा 'पंचामृत' उपक्रम भारताला हवामान बदलाचा सामना करण्यासाठी एक जागतिक आदर्श म्हणून स्थापित करतो.
- ब्रिक्स 2026: भारताने सदस्य देशांसोबत शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देणे, वनीकरण, वणवा व्यवस्थापन आणि आपत्ती निवारण, चक्रीय अर्थव्यवस्था आणि हवामान अनुकूलन यावर चर्चा सुरू केली आहे.
- **UNEA**-7 मध्ये वणव्यांवरील ठराव: भारताने "वणवा व्यवस्थापनासाठी जागतिक प्रतिसाद बळकट करणे" याबाबतचा ठराव डिसेंबर 2025 मध्ये केनियातील नैरोबी येथे झालेल्या संयुक्त राष्ट्र पर्यावरण सभेच्या (**UNEA**-7) 7 व्या सत्रात स्वीकारण्यात आला.

### देशात सुमारे 4 पट झाली नवीकरणीय ऊर्जा क्षमता





### नवीकरणीय ऊर्जेचे नेतृत्व करणारा भारत

- तीसऱ्या स्थानावर आहे भारत, जगात नवीकरणीय ऊर्जा स्थापित क्षमतेच्या बाबतीत
- पवन ऊर्जा स्थापित क्षमतेमध्ये भारत हा जगातील चौथा सर्वात मोठा देश आहे.
- सौर ऊर्जा स्थापित क्षमतेच्या बाबतीत भारत तीसऱ्या स्थानी आहे.
- भारताने मार्च 2026 पर्यंत 283.47 गीगावॅट जीवाश्मेतर ऊर्जा स्थापित क्षमता साध्य केली. ही एकूण स्थापित उर्जा क्षमतेच्या अर्थात 532.74 गीगावॅट च्या 53.21% इतकी आहे.



## वेळेपूर्वीच साध्य झालेली उद्दिष्ट्ये



- भारताने आपले जीडीपी उत्सर्जन तीव्रतेचे उद्दिष्ट निर्धारित वेळेच्या 11 वर्षे आधीच, म्हणजेच 2019 साली साध्य केले.
- भारताने जीवाश्मेतर-इंधन-आधारित ऊर्जा स्रोतांचे प्रमाण वाढवण्याचे आपले राष्ट्रीय निर्धारित योगदान (एनडीसी) 2015 चे उद्दिष्ट निर्धारित वेळेच्या नऊ वर्षे आधीच साध्य केले.
- राष्ट्रीय जैवइंधन धोरणांतर्गत इथेनॉल-मिश्रित पेट्रोलचे उद्दिष्टही निर्धारित वेळेच्या पाच महिने आधीच साध्य झाले.
- पॅरिस करारानुसार निर्धारित केलेल्या 2030 च्या उद्दिष्टाच्या पाच वर्षे आधीच, म्हणजेच जून 2025 मध्ये, जीवाश्मेतर ऊर्जा स्रोतांमधून 50%स्थापित वीज क्षमता साध्य करण्याचे उद्दिष्ट गाठले गेले.
- 2005 ते 2020 या कालावधीत भारताने आपली उत्सर्जन तीव्रता 36 टक्क्यांनी कमी केली.
- 2021 सालापर्यंत भारताने 2.29 अब्ज टन **CO**2 च्या समतुल्य अतिरिक्त कार्बन सिंक तयार केले, जे 2030 च्या 2.5 अब्ज टनांच्या लक्ष्याच्या अगदी जवळ आहे.
- मार्च 2026 मध्ये, पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने भारताच्या 2031-2035 या कालावधीसाठीच्या पुढील **NDC** ला मंजुरी दिली.
- भारत 2030 सालापर्यंत 500 गीगावॉट जीवाश्मेतर इंधन-आधारित ऊर्जा क्षमता साध्य करेल.

## स्वच्छतेसाठी सवयींमध्ये बदल

- स्वच्छतेपासून ते एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळण्यापर्यंत, पंतप्रधान मोदींनी पर्यावरण संरक्षणासाठी लोकांना त्यांच्या जीवनशैलीत बदल करण्यास सातत्याने प्रोत्साहित केले आहे.
- गोबर धन योजना हा चक्रीय अर्थव्यवस्था आणि मिशन लाइफच्या धर्तीवर असलेला 'कचऱ्यातून सोने' स्वरूपाचा उपक्रम आहे. 30 एप्रिल 2018 रोजी सुरू करण्यात आला. जानेवारी 2026 पर्यंत, 189 संकुचित बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत.

**स्वच्छ भारत**

**12** कोटी पेक्षा जास्त शौचालयांचे बांधकाम



**262** कोटी झाडे लावण्यात आली 'एक पेड़ मां के नाम' अभियानांतर्गत

'नमामि गंगे' सारख्या मोहिमांना लोकचळवळीत रूपांतरित करून, आम्ही लोकांच्या सवयींमध्ये मोठ्या प्रमाणावर कायमस्वरूपी बदल घडवून आणला आहे.

> “'प्रकृती रक्षति रक्षिता', म्हणजेच जे निसर्गाचे रक्षण करतात, निसर्ग त्यांचे रक्षण करतो, हा मंत्र आपण लक्षात ठेवला पाहिजे. आमच्या 'मिशन लाईफ'चे पालन करून, आम्ही एक चांगले जग निर्माण करू, असा विश्वास मला वाटतो.
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

**विकास आणि पर्यावरण संरक्षण एकाच वेळी साध्य करणे शक्य आहे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने दाखवून दिले आहे. पर्यावरण कायद्यांमधील सुधारणांमुळे नियमांचे अधिक चांगले पालन आणि उद्योग सुलभता या दोन्ही गोष्टी साध्य झाल्या आहेत.**

## रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण...


178 कोटी लीटर डीझेलची एका वर्षात बचत





**3.61 लाख बायो-टॉयलेट्स बसवण्यात आली 2014 नंतर रेल्वेच्या प्रवासी डब्यांमध्ये, 2004 ते 2014 या काळात केवळ 9,587 बायो-टॉयलेट्स बसवण्यात आली होती.**

## सौर ऊर्जेने उजळली घरे

प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत 30 एप्रिल 2026 पर्यंत 36.88 लाख घरांमध्ये सौर यंत्रणा बसवण्यात आल्या. या योजनेअंतर्गत स्थापित क्षमता 10.77 गीगावॅट पर्यंत पोहोचली. 19,480 कोटींचे अनुदान वितरित करण्यात आले.




53 पट वाढली सौर ऊर्जा स्थापित क्षमता




सौर ऊर्जा दरात 65% कपात

## क्षमता विस्तारासह नियमांची सक्ती

केंद्र सरकारने घनकचरा व्यवस्थापन (SWM) नियम, 2026 अधिसूचित केले आहेत, जे घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 ची जागा घेतील. हे नियम 1 एप्रिल 2026 पासून पूर्णपणे अंमलात आले आहेत. या नियमांनुसार 'प्रदूषणकर्ता भरपाई देईल' या तत्त्वावर आधारित पर्यावरणीय भरपाईची तरतूद आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 नुसार ओला कचरा, सुका कचरा, स्वच्छताविषयक कचरा आणि विशेष काळजी घेण्याजोगा कचरा अशा प्रकारे कचऱ्याचे वर्गीकरण करणे अनिवार्य आहे.


### 5 पट झाले घनकचरा व्यवस्थापन




## कालांतराने इंधनाची झाली बचत

फास्टॅगमुळे टोल प्लाझावरील प्रतीक्षा वेळ 12 मिनिटांवरून 47 सेकंदांपेक्षा कमी झाली आहे, या आधुनिक प्रणालीमुळे दरवर्षी अंदाजे 1,500 कोटी रूपयांची इंधन बचत होते.

### 13 पट वाढ इथेनॉल मिश्रणात





**भारतातील 13 समुद्रकिनाऱ्यांना ब्लू फ्लॅग प्रमाणपत्र मिळाले आहे, जे स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, सुरक्षितता आणि सुधारित पर्यटन सुविधांसाठी दिले जाते.**

# वन्य जीवांचे कल्याण आणि संरक्षणाचा उपक्रम

*देशातील वनक्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे. संरक्षित जंगलांचे क्षेत्रही सातत्याने वाढत आहे. देशात केवळ रामसर स्थळेच जैवविविधतेला चालना देत नाहीत, तर प्रोजेक्ट टायगरमुळे देशातील वाघांची संख्याही वाढली आहे. आफ्रिकन चित्त्यांना भारतात आणण्याच्या आंतर-खंडीय पुढाकारामुळे देशातील जैवविविधतेला अधिक बळ मिळाले आहे. देशात केवळ चित्त्यांची संख्याच वाढत नाही, तर नव्या मोहिमेअंतर्गत माळढोकच्या (ग्रेट इंडियन बस्टर्ड) पिल्लाचाही जन्म होत आहे; कारण आपल्या शास्त्रांमध्येही जीवांच्या कल्याणाची कामना करण्यात आली आहे...*

## रामसर स्थळांपासून वाघ-डॉल्फिन संरक्षणापर्यंत भारत





***गेल्या 12 वर्षांत भारताने 73 नवीन रामसर स्थळांची भर घालून या दिशेने आपली वचनबद्धता लक्षणीयरित्या बळकट केली आहे.***

- भारतात गेल्या एका दशकात वाघांची संख्या दुप्पट किंवा त्याहून अधिक झाली आहे. 2022च्या गणनेनुसार वाघांची संख्या विक्रमी 3,682 झाली आहे.
- आज जगातील जवळपास 70% वाघ भारतात आढळतात. इतकेच नाही तर, 'प्रोजेक्ट टायगर' अंतर्गत संरक्षित जंगलांचे क्षेत्र वाढून सुमारे 85,000 चौरस किलोमीटर झाले आहे.



- 'प्रोजेक्ट चीता' हा जगातील पहिल्या आंतर-खंडीय मोठ्या जंगली मांसाहारी प्रजातीचा स्थलांतरणाचा प्रकल्प आहे. या पुढाकारामुळे देशातील वन्यजीव विविधतेला चालना मिळाली आहे.
- 2023 या वर्षामध्ये 70 वर्षांनंतर भारतात चित्त्याच्या पिल्लांचा जन्म झाला, कारण यापूर्वी देशातून चित्ते नामशेष झाले होते. आता भारतात जन्मलेल्या अशा पिल्लांची एकूण संख्या 37 पर्यंत पोहोचली आहे.




**13,874** ***आहे बिबट्यांची संख्या, भारतातील बिबट्यांच्या स्थितीबाबतच्या अहवालानुसार***



**ग्रेट इंडियन बस्टर्ड' (जीआयबी) म्हणजेच माळढोक पक्ष्याच्या एका पिल्लाचा गुजरातच्या कच्छमध्ये जवळपास एका दशकानंतर जन्म झाला आहे. ही कामगिरी 'जंपस्टार्ट अप्रोच' नावाच्या एका नाविन्यपूर्ण संवर्धन उपायामुळे शक्य झाली आहे. याचे नियोजन एक वर्षापूर्वी करण्यात आले होते. प्रोजेक्ट जीआयबीची संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2011 मध्ये गुजरातसह याच्या नैसर्गिक अधिवासांमध्ये 'ग्रेट इंडियन बस्टर्ड'च्या संवर्धनासाठी मांडली होती.**


***देशात प्रोजेक्ट टायगर, प्रोजेक्ट एलिफंट, प्रोजेक्ट लायन, प्रोजेक्ट स्नो लेपर्ड, प्रोजेक्ट डॉल्फिन अंतर्गत प्रमुख प्रजातींच्या संरक्षणाचे काम केले जात आहे. नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या 24 प्रजातींवर केंद्रित संरक्षणात्मक उपाय केले जात आहेत, ज्यामध्ये सागरी कासवाचाही समावेश आहे.***



## वन्यजीवांसाठी राबवण्यात आले उपक्रम

**1,134** झाली देशात वन्यजीवांची सुरक्षा, संवर्धन आणि विकासासाठी 2025 मध्ये संरक्षित क्षेत्रांची संख्या, जी 2020 मध्ये 921 होती.

देशात 2025 मध्ये व्याघ्र प्रकल्पांची संख्या 58 झाली, जी 2014 मध्ये 48 होती. तसेच 2020 ते 2025 दरम्यान हत्ती प्रकल्पांची संख्या 31 वरून वाढून 33 झाली आहे.





- राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाच्या 7व्या बैठकीत सुसरींच्या संरक्षणासाठी आणि त्यांच्या अस्तित्वाला असणाऱ्या धोक्यांचा सामना करण्यासाठी एका नवीन उपक्रमाला मंजुरी देण्यात आली आहे. आता सुसर केंद्र सरकारच्या 'वन्यजीव अधिवास कार्यक्रम' मधील प्रजाती पुनरुत्थान कार्यक्रमात समाविष्ट आहे.
- मानस-प्रोबितोरा-नामेरी-काजीरंगा-डिबू-सैखोवा वन्यजीव परिपथाचा विकास करण्यात आला.
- पन्ना-मुकुंदपुर-संजय-दुबरी-बांधगढ-कान्हा-मुक्की-पेंच येथे वन्यजीव परिपथाचा विकास करण्यात आला.

“

*आम्हाला याचा अभिमान आहे की भारतात जगातील काही सर्वात अद्भुत वन्य प्राणी आढळतात. जगातील 70% हून अधिक वाघ आमच्या देशात आहेत. आमच्याकडे एकशिंगी गेंड्यांची संख्या सर्वात जास्त आहे आणि आशियायी हत्तींची संख्या देखील सर्वाधिक आहे. भारत जगातील एकमेव असे स्थान आहे की जिथे वनराज आशियायी सिंह उत्तम स्थितीत विकसित होत आहेत.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**






द आर्ट ऑफ लिव्हिंगचा वर्धापन दिन समारंभ

# बंगळूरुने अध्यात्म आणि आध्यात्मिक चेतनेला नव्या उंचीवर नेले

*सॉफ्टवेअर आणि सेवांसाठी जगभरात प्रसिद्ध असलेल्या बंगळुरूने भारताची सांस्कृतिक ओळख, आध्यात्म आणि आध्यात्मिक चेतनेलाही नव्या उंचीवर नेले आहे. आज जगभरातील लोक भारताच्या आध्यात्मिक मूल्यांनी प्रभावित आहेत आणि याच प्राचीन मूल्यांमधून भारताच्या अनेक संस्था देखील प्रेरणा घेत राहिल्या आहेत. 10 मे रोजी कर्नाटकच्या बंगळुरूमध्ये 'द आर्ट ऑफ लिविंग'च्या 45व्या स्थापना वर्ष समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, जेव्हा संकल्प स्पष्ट असतो आणि कार्य सेवाभावाने केले जाते, तेव्हा प्रत्येक प्रयत्नाचा सुखद परिणाम मिळतो...*

द आर्ट ऑफ लिविंग'चे बीज 45 वर्षांपूर्वी श्री श्री रविशंकर यांनी पेरले होते, ज्याचे आज एका विशाल वटवृक्षात रुपांतर झाले आहे. 'द आर्ट ऑफ लिविंग'च्या स्थापना वर्ष समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'आज हे आपल्यासमोर एका विशाल वटवृक्षाच्या रूपात उभे आहे, ज्याच्या हजारो शाखा जगभरातील असंख्य लोकांच्या जीवनाला स्पर्श करत आहेत.' भारताच्या भाषा, परंपरा, रीतिरिवाज आणि उपासना पद्धतींनी समृद्ध अशी विविधता आहे. या सुंदर विविधतेला एका सूत्रात काय बांधते, याचे उत्तर आहे- स्वतःसाठी नाही, तर इतरांसाठी जगणे. भारताच्या मूल्यांमध्ये खोलवर रुजलेली योग, ध्यान आणि प्राणायामाची परंपरा.

> *बंगळुरूचा माहोल ... येथील वातावरण ... काही वेगळेच असते. हे शहर सॉफ्टवेअर आणि सेवांसाठी जगभरात ओळखले जाते. परंतु भारताची सांस्कृतिक ओळख... आध्यात्मिकता... आध्यात्मिक चेतनेलाही या शहराने एक नवी उंची दिली आहे.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पीएम मोदींनी यावर भर दिला की, आज जगभरातील लोक भारताच्या आध्यात्मिक मूल्यांनी प्रभावित आहेत आणि याच प्राचीन मूल्यांमधून भारताच्या अनेक संस्था देखील प्रेरणा घेत आल्या आहेत.

पुराणांच्या प्राचीन शिकवणीत असा उल्लेख आहे की इतरांची सेवा करणे हे पुण्य आहे, तर इतरांना त्रास देणे हे पाप आहे. सेवा हा भारतीय समाजाचा नैसर्गिक स्थायी भाव आहे. भारताच्या अनेक आध्यात्मिक चळवळींनी शेवटी मानवतेची सेवा म्हणून स्वतःला अभिव्यक्त केले आहे. हीच भावना 'द आर्ट ऑफ लिविंग'च्या प्रत्येक प्रयत्नातही दिसून येते. पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताच्या समग्र विकासाला पुढे नेण्यात 'द आर्ट ऑफ लिविंग'सारख्या संस्थांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यांनी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीशी जोडण्यावर भर देण्याचे आवाहन करत सांगितले की, शाश्वत शेती ही स्वतः 'आर्ट ऑफ लिविंग'चीच एक अभिव्यक्ती आहे तसेच रसायनांपासून धरती मातेचे रक्षण करणे हे आध्यात्मिक साधना आणि पर्यावरण संवर्धन या दोहोंचे प्रतीक आहे. नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे आणि धरती मातेला रसायनांपासून वाचवणे, हे देखील 'आर्ट ऑफ लिविंग' आहे.

पंतप्रधान मोदींनी 'पर ड्रॉप, मोअर क्रॉप' या उपक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये चांगल्या जल व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे हे देखील 'आर्ट ऑफ लिविंग' आहे. ■

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

# आधुनिक पायाभूत सुविधा उभारत आहे भारत

*भारत आज 'रिफॉर्म एक्सप्रेस' वर वेगाने पुढे जात जागतिक दर्जाच्या रस्ते, रेल्वे, हवाई आणि ऊर्जा संपर्क सुविधांचा विस्तार करत आहे. 'पीएम मित्र पार्क'च्या मदतीने भारताच्या समृद्ध वस्त्रोद्योग वारशाला पुन्हा बळकट केले जात आहे. याच मालिकेला पुढे नेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 10 मे रोजी तेलंगणच्या हैदराबादमध्ये सुमारे 9,400 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची केली पायाभरणी आणि उद्घाटन...*



*भूतकाळात जेव्हा भारत जगातील एक खूप मोठी अर्थव्यवस्था होता ... तेव्हा आपल्या वस्त्रोद्योगाची मोठी भूमिका होती. आता आपण आपल्या त्या वारशाला पुन्हा सक्षम करत आहोत. वारंगलचे 'पीएम मित्र पार्क', देशातील वस्त्रोद्योग क्रांतीला गती देईल.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

तेलंगणच्या लोकांचे जीवन सुकर करण्यासाठी आणि तरुणांसाठी रोजगाराचे नवीन मार्ग खुले करण्यासाठी 10 मे रोजी हैदराबादमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. या प्रकल्पांमुळे भविष्यात येथे तयार होणारी वाहने आणि यंत्रसामग्री, या झोनमध्ये सुरू होणारे अन्न प्रक्रिया उद्योग यासोबतच संपूर्ण औद्योगिक क्षेत्राचा विकास होईल. याचा फायदा सर्वसामान्य लोकांसोबतच तेलंगणातील कामगार आणि शेतकऱ्यांनाही होईल.

सायबराबाद, तेलंगणाच्या हैदराबाद शहराचे एक प्रमुख आयटी आणि व्यावसायिक केंद्र आहे. याच कारणामुळे सायबराबादमधून तेलंगणला देशातील एक मोठे मॅन्युफॅक्चरिंग पॉवरहाऊस बनवण्यासाठी अनेक प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. आज भारत रिफॉर्म एक्सप्रेसवर चालत आहे. सोबतच, आजचा भारत आधुनिक पायाभूत सुविधा देखील उभारत आहे. जहीराबाद औद्योगिक क्षेत्राच्या निर्मितीमागेही हेच उद्दिष्ट आहे. हा औद्योगिक विभाग, औद्योगिक मार्गिका विकसित करण्याच्या भारत सरकारच्या राष्ट्रीय मोहिमेचा भाग आहे. येथे जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा असतील. उत्तम वीज पुरवठा असेल आणि जगभरातील गुंतवणूकदारांसाठी येथे अशा सर्व सुविधा उपलब्ध असतील ज्या उद्योगांसाठी आवश्यक आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, वारंगलमध्ये उभारलेले 'पीएम मित्र पार्क' देशातील वस्त्रोद्योग क्रांतीला गती देईल. यामध्ये समाविष्ट होणाऱ्या युनिट्सना पीएलआय योजनेसह केंद्र सरकारच्या विविध योजनांचे लाभ मिळतील. लाभार्थी उद्योगांनी पीएलआय योजनेचा लाभ घेण्यास सुरुवातही केली आहे. हा वस्त्रोद्योग पार्क मोठ्या संख्येने (विशेषतः माता-भगिनींसाठी) रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देईल.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, रस्ते, रेल्वे आणि विमानतळांसारख्या आधुनिक संपर्क पायाभूत सुविधांमध्ये भारत सरकारने गेल्या 12 वर्षांत अभूतपूर्व गुंतवणूक केली आहे. केवळ राष्ट्रीय महामार्गांच्या विकासासाठीच सुमारे 1 लाख 75 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तेलंगणला या राष्ट्रीय केंद्रित दृष्टीकोनाचा मोठा फायदा झाला आहे. गेल्या 12 वर्षांत राज्याचे राष्ट्रीय महामार्ग जाळे दुप्पट झाले आहे. 2014 पूर्वी अविभाजित आंध्र प्रदेशचा रेल्वे अर्थसंकल्प 1,000 कोटी रुपयांपेक्षाही कमी होता, तर तेलंगणची सध्याची वार्षिक रेल्वे तरतूद 5,500 कोटी रुपयांपेक्षाही जास्त आहे. सुमारे 50,000 कोटी रुपयांचे रेल्वे प्रकल्प सध्या सुरू आहेत. तेलंगणमध्ये पाच वंदे भारत आणि सहा अमृत भारत रेल्वेगाड्या सुरू करण्यात आल्या आहेत.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.




## पीएम मित्र पार्कचे उद्‌घाटन

वारंगलमध्ये 1,700 कोटी रुपयांच्या खर्चातून विकसित करण्यात आलेल्या पीएम मित्र पार्कचे उद्घाटन. ज्याला 'काकतीय मेगा टेक्सटाईल पार्क' या नावाने देखील ओळखले जाते. हा पार्क भारताचा पहिला पूर्णपणे कार्यान्वित झालेला पीएम मित्र पार्क आहे. हा पार्क प्रस्तावित नागपूर-विजयवाडा ग्रीनफील्ड एक्सप्रेसवे (राष्ट्रीय महामार्ग-163जी) च्या जवळ आणि राष्ट्रीय महामार्ग-163च्या जवळ स्थित आहे. हा पार्क प्रमुख रेल्वे जाळे आणि बंदरांना उत्कृष्ट मल्टीमोडल संपर्क प्रदान करतो.

## कर्करोगग्रस्त रुग्णांच्या उपचारांची व्यवस्था

हैदराबाद येथील सिंधू रुग्णालय राष्ट्राला समर्पित करण्यात आले. हे रुग्णालय कर्करोगाच्या उपचारासाठी अत्याधुनिक मल्टी सुपर स्पेशालिटी संस्था आहे. या 18 मजली रुग्णालयात 1,500 खाटा, 150 हून अधिक डॉक्टर सल्लागार कक्ष आणि 29 प्रगत शस्त्रक्रिया कक्ष आहेत. रुग्णालयात किमोथेरपी, रेडिएशन थेरपी, कर्करोग शस्त्रक्रिया, अस्थि मज्जा प्रत्यारोपण, प्रगत अतिदक्षता विभाग आणि 33 हून अधिक वैशिष्ट्यांसह व्यापक देखभालीची व्यवस्था आहे.



## या प्रकल्पांमुळे विकासाला मिळेल वेग...

**₹3,175 कोटींपेक्षा जास्त** खर्चातून हैदराबाद-पणजी आर्थिक मार्गिकेवर गुडेबेलूर ते महबूबनगर दरम्यान राष्ट्रीय महामार्ग-167 च्या चौपदरीकरणाची पायाभरणी.

प्रवासाच्या वेळेत सुमारे 1 तास 30 मिनिटांची बचत होईल.

- रंगारेड्डी जिल्ह्यात हैदराबाद-नागपूर औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत (एचएनआयसी) विकसित केल्या जाणाऱ्या जहीराबाद औद्योगिक क्षेत्राची पायाभरणी. 3,245 एकरमध्ये पसरलेले हे क्षेत्र 2,350 कोटी रुपयांपेक्षा जास्त एकूण खर्चातून विकसित केले जात आहे.
- जहीराबाद औद्योगिक क्षेत्रात सुरू होणाऱ्या प्रकल्पांमुळे सुमारे 10,000 कोटी रुपयांची गुंतवणूक आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**₹1,535** कोटींचे रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्प राष्ट्राला समर्पित.

यामध्ये काजीपेट-विजयवाडा बहु-ट्रॅकिंग प्रकल्पाच्या 118 किमी लांबीच्या अनेक टप्प्यांचा समावेश आहे.

- हैदराबादमध्ये इंडियन ऑइलचा 600 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चातून विकसित करण्यात आलेला मलकापूर टर्मिनल प्रकल्प राष्ट्राला समर्पित. या टर्मिनलची एकूण टँक क्षमता 1,65,000 किलोलीटर आहे.

**पीएम मोदी म्हणाले, आपल्याला जितकी गरज आहे केवळ तितकीच ऊर्जा वापरण्याचा प्रयत्न केला पाहिजे, यामुळे परदेशी चलनाची बचत करता येईल आणि युद्धाच्या संकटांचे वाईट परिणाम कमी करता येतील.**

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

21व्या शतकाच्या जागतिक संदर्भात ऊर्जा सुरक्षेच्या महत्त्वावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, ऊर्जा पुरवठ्यात अडथळा आल्यास सर्व आर्थिक कामकाज ठप्प होऊ शकते. याच कारणामुळे भारत सरकार राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षा बळकट करण्यासाठी अभूतपूर्व गुंतवणूक करत आहे. मलकापूर येथील इंडियन ऑइलच्या नवीन टर्मिनलचे उद्घाटन म्हणजे एक महत्त्वाचे धोरणात्मक पाऊल असल्याचे सांगत पंतप्रधान मोदी म्हणाले की, हे टर्मिनल तेलंगणच्या वाढत्या ऊर्जाविषयक गरजांची पूर्तता करेल आणि पुरवठा साखळी मजबूत करेल. ▪

सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराची 75 वर्षे

# सोमनाथ अमृत महोत्सव

## भारताच्या अढळ भावनेचा उत्सव

*सोमनाथ केवळ एक मंदिर नाही, तर सनातन आस्थेच्या अमर ज्योतीचे प्रतीक आहे. भग्नावशेषांपासून पुनर्निर्मितीपर्यंतचा याचा प्रवास भारताचा अजेय वारसा आणि त्याचा अदम्य संकल्प दर्शवतो. गुजरातच्या सोमनाथ मंदिराच्या पुनर्स्थापनेला 75 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित 'सोमनाथ अमृत महोत्सवा'त सहभागी होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक संपादकीय लेख लिहिला. यामध्ये त्यांनी सोमनाथच्या संदर्भात 11 मे या दिवसाचे चिरंतन महत्त्व आणि भारताच्या सभ्यतेच्या महानतेवर भाष्य केले. सोबतच, गुजरात दौऱ्यादरम्यान त्यांनी वडोदरा येथे 'सरदारधाम वसतिगृहाचे' देखील उद्घाटन केले...*

आपल्या प्राचीन शास्त्रांमध्ये लिहिले आहेः प्रभासं च परिक्रम्य पृथिवीक्रमसंभवम्। म्हणजेच दिव्य प्रभास (सोमनाथ) ची परिक्रमा करणे हे संपूर्ण पृथ्वीची परिक्रमा करण्यासारखे आहे! जेव्हा लोक येथे दर्शन-पूजेसाठी येतात, तेव्हा त्यांना त्या सभ्यतेच्या अद्भुत निरंतरतेचाही अनुभव येतो, ज्याची ज्योत कधीही विझवणे शक्य झाले नाही. अनेक साम्राज्ये आली आणि गेली, काळ बदलला आणि इतिहासाने अनेक चढ-उतार पाहिले, तरीही देशाच्या नागरिकांच्या हृदयात सोमनाथ नेहमीच कायम राहिले. सोमनाथ मंदिर परिसरात याच्या पुनर्स्थापनेच्या 75व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, दादा सोमनाथचे अनन्य भक्त म्हणून मी कितीतरी वेळा येथे आलो आहे, त्यांच्यासमोर नतमस्तक झालो आहे. परंतु, आज जेव्हा मी येथे येत होतो, तेव्हा ही यात्रा एक सुखद अनुभूती देत होती. काही महिन्यांपूर्वीच मी येथे आलो होतो. तेव्हा आपण 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' साजरा करत होतो. पहिल्या विध्वंसानंतर 1,000 वर्षांनंतरही सोमनाथच्या अविनाशी असण्याचा अभिमान आणि आज या आधुनिक रूपाच्या प्राणप्रतिष्ठेची 75 वर्षे, आपण केवळ दोन उपक्रमांचा भाग बनलो नाही आहोत, तर हजार वर्षांच्या अमृत प्रवासाचा अनुभव घेण्याची संधी आपल्याला मिळाली आहे.

75 वर्षांपूर्वी, 11 मे च्या दिवशी सोमनाथ मंदिराची पुनर्स्थापना ही काही साधीसुधी घटना नव्हती. जर 1947 मध्ये भारत स्वतंत्र झाला होता, तर 1951 मध्ये सोमनाथच्या प्राणप्रतिष्ठेने भारताच्या स्वतंत्र चेतनेची घोषणा केली होती. स्वातंत्र्याच्या वेळी, सरदार साहेबांनी 500 पेक्षा जास्त

पंतप्रधानांचा लेख वाचण्यासाठी QR कोड स्कॅन करा.




पंतप्रधानांचा लेख वाचण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

## वडोदरामध्ये सरदारधाम वसतिगृहाचे उद्घाटन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वडोदरा येथे 'सरदारधाम वसतिगृहाचे' उद्घाटन केले. या प्रकल्पामध्ये 1,000 मुले आणि 1,000 मुलींसाठी वसतिगृहाच्या सुविधेसोबतच मध्यवर्ती भोजन कक्ष, ग्रंथालय आणि सभागृह यांसारख्या सुविधांचाही समावेश आहे. सोबतच, त्यांनी सरदारधाम परिसरातील स्वागत क्षेत्र, नागरिक सुविधा, भोजन क्षेत्र आणि ई-ग्रंथालयासह विविध सुविधांची पाहणी देखील केली.




> आपण 'व्होकल फॉर लोकल'ला एक लोकचळवळ बनवावे ही आज काळाची गरज आहे. परदेशी वस्तूंच्या ऐवजी... स्थानिक उत्पादनांचा स्वीकार करावा. आपल्या गावातील, आपल्या शहरातील, आपल्या देशातील उद्योजकांना बळ द्या.
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



## सोमनाथ मंदिराशी संबंधित दिव्य आणि अद्भुत तथ्य

- दरवर्षी सुमारे 1 कोटी भाविक सोमनाथला भेट देतात. तर, महाशिवरात्री 2025 च्या पवित्र दिनी एकाच दिवसात 3.56 लाखांपेक्षा जास्त भक्तांनी भगवान शिवाचे दर्शन आणि पूजन केले.
- सोमनाथ ट्रस्ट दरवर्षी शेकडो महिलांना रोजगार आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने सक्षम बनवत आहे.
- सोमनाथ मंदिर परिसरात असलेले पवित्र 'बिल्व वन', जिथे सुमारे 1,700 बेल वृक्ष आहेत, त्याची देखभाल आणि संरक्षणाची जबाबदारी महिला रक्षक सांभाळत आहेत.
- सोमनाथचे मियावाकी वन दरवर्षी सुमारे 93,000 किलोग्रॅम कार्बन डायऑक्साइड शोषून घेते.
- सोमनाथमध्ये दरमहा प्लास्टिक कचऱ्याचे पुनर्चक्रीकरण करून सुमारे 4,700 टाईल्स तयार केल्या जातात. या टाईल्सचा वापर मंदिर परिसरातील रस्ते आणि पायवाटांच्या बांधकामात केला जातो.

संस्थाने जोडून अखंड भारताचे आधुनिक स्वरूप घडवले होते. सोबतच, सोमनाथच्या पुनर्निर्मितीतून त्यांनी जगाला सांगितले होते की, भारत केवळ स्वतंत्र झाला नाही, तर भारत आपले प्राचीन वैभव पुन्हा प्राप्त करण्याच्या मार्गावरही आता पुढे सरसावला आहे. कार्यक्रमात पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज या प्रसंगी, मी केवळ 75 वर्षांची क्षणचित्रे पाहत नाही आहे. मी येथे पाहत आहे, विनाशात सृजनाच्या संकल्पाला, ज्याला सोमनाथाने प्रत्यक्षात आणले आहे. मी येथे पाहत आहे, असत्यावर सत्याच्या विजयाला, ज्याला प्रभास-पाटणने वारंवार अनुभवले आहे. मी येथे पाहत आहे, हजारो

## सरदार वल्लभभाई पटेल यांना श्रद्धांजलि

पंतप्रधान मोदी यांनी गुजरातच्या सोमनाथ येथे सरदार वल्लभभाई पटेल यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी सांगितले की, सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्मितीमध्ये सरदार पटेल यांच्या दूरदृष्टीने आणि दृढ संकल्पाने निर्णायक भूमिका बजावली. सोमनाथला भारताच्या सभ्यतागत सन्मानाचे आणि आध्यात्मिक निरंतरतेचे प्रतीक म्हणून त्याच्या पूर्ण वैभवासह पुन्हा प्रस्थापित झालेले पाहणे हे सरदार पटेल यांचे स्वप्न होते, यावर त्यांनी प्रकाश टाकला. देश सरदार पटेल यांचा हा दृष्टिकोन साकार करण्यासाठी सदैव वचनबद्ध राहील.

## रोमांचक हवाई संचलनाची केली पाहणी

सोमनाथ अमृत महोत्सवाच्या शुभ प्रसंगी पंतप्रधान मोदी यांनी भारतीय वायू सेनेच्या 'सूर्यकिरण एरोबेटिक टीम'द्वारे सादर करण्यात आलेल्या एका रोमांचक हवाई संचलनाची पाहणी केली. ते म्हणाले की, आकाशातील गौरव आणि शौर्याचा हा भव्य संगम सोमनाथ मंदिरावर केशरी आणि तिरंग्याचे तेज पसरवत होता. भक्ती आणि शक्तीचे हे अद्भुत रूप प्रत्येक हृदय अथांग आनंदाने भरून टाकते आणि प्रत्येक भारतीयात गौरवाची भावना निर्माण करते.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



वर्षांच्या आध्यात्मिक चेतनेला, जिने संपूर्ण विश्वाला मानव आणि इतरांच्या कल्याणाची शिकवण दिली आहे. मी येथे पाहत आहे, भारताच्या त्या अविनाशी रूपाला, ज्याला शतकांच्या कुटिल प्रयत्नांनंतरही कोणी नष्ट करू शकले नाही, ना हरवू शकले. आणि मी येथे पाहत आहे, सोमनाथ अमृत-महोत्सव; हा केवळ भूतकाळाचा उत्सव नाही, तर हा पुढील एक हजार वर्षांसाठी भारताच्या प्रेरणेचा महोत्सव देखील आहे.

### सोमनाथ अमृत महोत्सवात पीएम मोदी झाले सहभागी

भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आणि भारताची अढळ श्रद्धा आणि सभ्यतागत वारशाचे प्रतीक असलेल्या पवित्र सोमनाथ मंदिरात पंतप्रधान मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात भाग घेतला. या समारंभाचा एक भाग म्हणून ते अनेक शुभ धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले आणि ध्वजारोहण समारंभातही ते सहभागी झाले. या प्रसंगी सोमनाथचा समृद्ध वारसा आणि आध्यात्मिक महत्त्व यांचे स्मरण करत एक स्मृती टपाल तिकीट आणि नाणे देखील जारी करण्यात आले.

### सोमनाथ मंदिरात महापूजा आणि कुंभाभिषेक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरात दौ-यात सोमनाथ मंदिरात महापूजा आणि कुंभाभिषेक देखील केला. त्यांनी सांगितले की, असे महान भाग्य लाभणे हा त्यांच्या जीवनातील सर्वात भावुक आणि अविस्मरणीय क्षणांपैकी एक आहे. पुनर्निर्मित सोमनाथ मंदिराला 75 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित या विशेष प्रसंगी महादेवाची पूजा करणे हा एक अविस्मरणीय अनुभव आहे. त्यांनी असेही म्हटले की, हे दर्शन आणि पूजन असीम आध्यात्मिक ऊर्जेचा स्त्रोत आहे.



### सोमनाथ मंदिराचे एक छायाचित्र केले सामायिक

सोमनाथहून वडोदराला जाताना घेतलेले सोमनाथ मंदिराचे एक छायाचित्र पंतप्रधान मोदी यांनी सामायिक केले. सोबतच त्यांनी उल्लेख केला की, प्रभास पाटणच्या किनाऱ्यावर वसलेले सोमनाथ मंदिर भक्ती, इतिहास आणि सभ्यतागत भावनेचे एक तेजस्वी प्रतीक म्हणून दिमाखात उभे आहे. हे शाश्वत मंदिर रानटी हल्ले, आक्रमणे आणि शतके उलटून गेल्यानंतरही अढळ राहिले आहे. सोमनाथ प्रत्येक भारतीयाला शक्ती, धैर्य आणि आशा प्रदान करते, यावर त्यांनी भर दिला. ▪



Narendra Modi
@narendramodi

देशभरातील शेतकरी बंधू भगिनींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी आम्ही सातत्याने महत्त्वाचे निर्णय घेत आहोत. याच दिशेने आमच्या सरकारने 2026-27 च्या पणन हंगामासाठी खरीप पिकांच्या किमान हमी भावात म्हणजेच एमएसपीमध्ये वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे देशातील कोट्यवधी अन्नदात्यांना त्यांच्या उत्पादनाची योग्य आणि लाभदायक किंमत मिळेल, तसेच त्यांच्या जीवनात अधिक समृद्धी आणि आनंद येईल.



Rajnath Singh
@rajnathsingh

महिलांचा सन्मान हा आपल्या सभ्यतेचा आत्मा आहे आणि कोणताही समाज याशिवाय प्रगती करू शकत नाही. पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वात भारत सरकार महिला सक्षमीकरणाबरोबरच महिला आरक्षणासाठी (33%) देखील वचनबद्ध राहिले आहे. हे विधेयक केवळ कायदा नाही तर आपल्या सामूहिक इच्छाशक्तीचे प्रतीक होते, जरी ते संमत होऊ शकले नसले तरी महिलांना राजकीय अधिकार मिळवून देण्याचा संकल्प आणखी मजबूत झाला आहे.



Amit Shah
@AmitShah

मी दररोज माझ्या आईच्या पावलांना हात लावून नमस्कार करायचो आणि त्या या जगात नसतानाही दररोज त्यांच्या फोटोसमोर दिवा लावतो. आपल्या देशात प्रत्येक दिवस मातांना समर्पित आहे.



Nitin Gadkari
@nitin_gadkari

मल्टी लेन फ्री फ्लो (MLFF) तंत्रज्ञानासह टोलिंगची एक नवी संकल्पना - कोणताही अडथळा नसलेली, विनाखंड, न थांबता प्रवासाची सुविधा देणारी प्रणाली FASTag, AI आणि नंबर प्लेट ओळखण्याच्या तंत्रज्ञानाच्या मदतीने शून्य प्रतीक्षा वेळ, जलद प्रवास आणि कमी खर्च सुनिश्चित करते. 80 km/h पर्यंतच्या वेगाने गाडी चालवा आणि भारताच्या महामार्गांवर भविष्यातील स्मार्ट, कार्यक्षम टोल संकलनाचा अनुभव घ्या.



Jyotiraditya M. Sc...
@JM_Scindia

भारत देशात जर रक्ताचा संचार कोणी हृदयाच्या रूपात करत असेल तर ते माझे @IndiaPostOffice करते.



Hardeep Singh Puri
@HardeepSPuri

देशात कोणत्याही पेट्रोलियम उत्पादनाची कमतरता नाही...
भारताकडे 60 दिवसांचे कच्चे तेल, 60 दिवसांचा LNG आणि 45 दिवसांचा LPG चा साठा उपलब्ध आहे.
पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर विना अडथळा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी भारताने आपल्या दैनिक LPG उत्पादनात अभूतपूर्व वाढ (35,000 टन वरून वाढवून 54,000 टन) केली आहे.



# दुनिया की कोई ताकत भारत को झुका नहीं सकती : मोदी

कोरोना जैसे कायदे: वैश्विक संकट को देखते हुए पीएम मोदी की अपील

# एक साल सोना नहीं खरीदें, वर्क फ्रॉम होम और ऑनलाइन मीटिंग करें : मोदी

# विकसित भारत के लिए मिलकर करें काम

आर्ट ऑफ लिविंग के 45 वर्ष पूरे, पीएम ने सेवा भाव को सराहा

रूसी विदेश मंत्री ने पीएम से की मुलाकात, यूक्रेन युद्ध व प. एशिया संकट पर चर्चा

# किसी युद्ध से नहीं, कूटनीति और संवाद से सुलझेगा विवाद : मोदी

# आतंकवाद पर चीन और पाकिस्तान बेनकाब: भारत

# संकट में भी अर्थव्यवस्था मजबूत'

PM की अपील, माननीयों का काफिला कम

# तेल की बचत: प्रधानमंत्री ने अपना काफिला 50% घटाया, साथ चलीं सिर्फ 4 गाड़ियां



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 7 आवाहने

# राष्ट्रहित जाणून पुढाकार घेण्याची वेळ

*विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भारताने सक्षम, समर्थ आणि सशक्त पाया तयार केला आहे. देशाने आपल्या विकास प्रवासात प्रत्येक नागरिकाला सारथी बनवले आहे, ज्याचा मूळ आधार लोकसहभाग हाच आहे. याच कारणामुळे, जागतिक आव्हानांच्या काळात भारताला मजबूत बनवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 7 महत्त्वपूर्ण आवाहने केली आहेत. पूर्वीच्या दशकांमध्येही जेव्हा-जेव्हा देश युद्ध किंवा इतर कोणत्याही मोठ्या संकटाला सामोरा गेला आहे, तेव्हा सरकारच्या आवाहनावर प्रत्येक नागरिकाने अशाच प्रकारे आपले दायित्व चोख बजावले आहे. ज्या वेळी कोट्यवधी भारतीय एकत्र येऊन लहान-लहान बदल करतील, त्यावेळी राष्ट्राला आत्मनिर्भर आणि सशक्त बनवण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही...*

**140** कोटी लोकांचे सामूहिक प्रयत्न हीच भारताची सर्वात मोठी ताकद आहे. छोट्या-छोट्या जबाबदाऱ्या पार पाडा...

## चला, भारताला आणखी सक्षम बनवूया

**7 अपील**

1. जिथे शक्य असेल तिथे वर्क फ्रॉम होमला प्राधान्य द्या.
2. वर्षभर सोने खरेदी टाळा.
3. पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करा- मेट्रो आणि सार्वजनिक वाहनांचा वापर करा.
4. खाद्य तेलाचा मर्यादित वापर करा आणि अनावश्यक उपभोग कमी करा.
5. रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करा आणि नैसर्गिक शेतीला प्राधान्य द्या.
6. परदेशी ब्रँडच्या वस्तूंचा वापर कमी करा आणि स्वदेशीचा स्वीकार करा.
7. पुढील एक वर्षापर्यंत परदेश प्रवास टाळा.

न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 1-15 जून, 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 (प्रकाशन दिनांक-19 मे 2026, एकूण पृष्ठे-78)

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद, महासंचालक,
केंद्रीय संचार ब्यूरो

खोली क्रमांक 278, केंद्रीय संचार ब्यूरो, सूचना भवन, दुसरा मजला, नवी दिल्ली 110003 येथून प्रकाशित